साप्ताहिक

# माणूस

चित्रवार्ता पुस्तक पुरवणीसह ◎ तेरा सप्टेंबर ◎ एक रुपया.




कोणतीही राजकीय हालचाल ज्याकाळी अशक्य होती, देश थंड गोळ्यासारखा निपचित पडला होता तेव्हा टिळकांनी गणेशोत्सव सुरू केले. लोक यामुळे एकत्र जमू लागले, आपल्या देशास्थितीचा विचार करू लागले. उत्सवातून लोकोत्साह निर्माण झाला आणि या उत्साहाचा उपयोग टिळकांनी स्वराज्याची चळवळ हळुहळु तीव्र करण्यासाठी करून घेतला.

गणेशोत्सवांनी जी कामगिरी
टिळकांच्या काळात बजावली
ती कामगिरी चालू काळात
ग्रामायन, ग्राहकपंचायत
अशासारख्या उपक्रमांनी
बजावली पाहिजे.
त्याशिवाय स्वराज्याचे सुराज्यात
रूपांतर होणार नाही.




६ सप्टेंबरला ........
ग्राहक चळवळीला
१ वर्ष पूर्ण झाले
• • •



ग्राहक पंचायत स्थापना
न्या. छागला.




ग्राहक शिबिर
गांधीभवन
१५-१२-७४.

कोंढाण - दाभखिंड भागातील आदिवासी नेते
श्री काकुराम घोरडे.






ग्रामायन मेळावा दिनांक ३०/३१ ऑगस्ट.
कार्यकर्त्यांची उपस्थिती खूप होती.




मेळाव्यात समाजकल्याण
विभागाचे सचिव
श्री. पळणीटकर.



# सुराज्य याचा अर्थ

हे

भीकबळी होणे संपले पाहिजे.



हे

अथांग दारिद्र्य हटले पाहिजे.

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंधरावे – अंक पंधरावा

१३ सप्टेंबर १९७५

मूल्य : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी

वीस रुपये

परदेशची वर्गणी

पंचावन्न रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

छायाचित्र मांडणी : सुनिल कुरणे


# ग्रामायन मेळावा

शनिवार, दि. ३० ऑगस्टला दुपारी चार वाजता भारतीय इतिहास संशोधक मंडळाच्या सभागृहात ग्रामायनचा चौथा मेळावा सुरू झाला. जमलेल्या कार्यकर्त्यांत ग्रामायनच्या मित्रपरिवारातील परिचित मंडळी तर होतीच; परन्तु नवीन कार्यकर्तेही बरेच दिसत होते. आदिवासी विकासासाठी महाराष्ट्र सरकारची उपयोजना (सब-प्लॅन) हा मेळाव्यातील चर्चेचा मुख्य विषय असल्याने आदिवासी भागातील कार्यकर्ते अधिक संख्येने उपस्थित होते. त्यातही प्रत्यक्ष आदिवासी समाजातील कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षात येण्याजोगी होती. स्वतःच्या विकासासाठी स्वतःच पुढे येणारी ही आदिवासी मंडळी म्हणजे त्यांच्या विकासाच्या वाटचालीतील मोठेच सुचिन्ह होते असे म्हटले पाहिजे.

ग्रामायनचे अध्यक्ष श्री. व. द. देशपांडे यांनी पहिल्या चर्चासत्राची सुरुवात केली. त्यानंतर नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आदिवासी विभागात प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपापल्या प्रकल्पांचा परिचय करून दिला. ह्या वेळी असे कार्यकर्ते जवळजवळ २५-३० होते. कार्यकर्त्यांच्या निवेदनातून कार्याची व्याप्ती व अडचणींची विविधता लक्षात आली.

त्यानंतर चहापानाचा कार्यक्रम होऊन दुसरे सत्र सुरू झाले. ह्या सत्रात ग्रामायनचे कार्य व कार्यकर्त्यांच्या अपेक्षा यावर चर्चा प्रा. स. ह. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. श्री. व. द. देशपांडे यांनी प्रथम कार्याचा आढावा घेतला. केवळ दीड वर्षाच्या कालावधीत ग्रामायनने ह्या प्रकारचे चार मेळावे आयोजित केले. ग्रामीण भागात स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र आणणे व त्यांच्यात अभिसरण घडवून आणणे ह्या उद्देशाने 'ग्रामायन' काम करते. आत्तापर्यंत 'रोजगार हमी योजना' व 'आदिवासी समस्या' हे दोन विषय 'ग्रामायन' ने हाताळले.

मेळाव्यांशिवाय इतर कामेही ग्रामायनने हातात घेतली आहेत. ग्रामीण विकासकार्यासाठी विद्यार्थ्यांचे नेतृत्व जोपासणे व कार्यकर्ते तयार करणे ह्याकरिता विद्यार्थ्यांची शिबिरे व पदयात्रा अशा प्रकारचे कार्यक्रम ग्रामायनने सुरू केले. एक विद्यार्थ्यांचा गट सध्या खेडेगावांतून 'गोबर गॅस प्लॅन्ट' 'गाव तेथे ग्रंथालय' इ. योजनांचा प्रचार करीत आहे. अभ्यासमंडळे चालविणे हा देखील ग्रामायनच्या कामाचा एक भाग आहे. शिवाय ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरतील अशा 'आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतर-नवा कायदा' व 'रोजगार हमी' या दोन पुस्तिका प्रसिद्ध करून ग्रामायनने एक महत्त्वाचे मार्गदर्शनपर काम केले आहे.

ग्रामायनकडून आणखी काय अपेक्षा ठेवता येतील यावर जी चर्चा झाली त्यात अनेक कार्यकर्त्यांनी भाग घेतला. कार्यकर्त्यांना प्र-शिक्षण, त्यांना आधार-मानधन, प्रकल्पांना देणग्या मिळवून देणे या कामी ग्रामायनने पुढाकार घ्यावा अशा मागण्या प्रामुख्याने करण्यात आल्या. श्री. बिंदुमाधव जोशी यांनी, ग्रामीण आदिवासी भागातील उत्पादकांना असे आवाहन केले की ग्राहकपंचायतीशी त्यांनी योग्य वेळी संपर्क साधावा म्हणजे ग्राहक पंचायत या उत्पादकांना रास्त भाव मिळवून देईल. या चर्चेचा समारोप करताना प्रा. स. ह. देशपांडे यांनी असे सुचविले की, ग्रामायनने नवीन स्वयंस्फूर्त संस्था निर्माण करण्याच्या कामातही लक्ष घालावे.

दुसरे दिवशी म्हणजे रविवार दि. ३१ ऑगस्टला सकाळी साडेआठ वाजता तिसऱ्या चर्चासत्राची सुरुवात श्री. एस्. डी. कुलकर्णी यांनी केली. आदिवासी समाजाची दारुण परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने जी आदिवासी विकास योजना आखली आहे, त्या योजनेचा परिचय कार्यकर्त्यांना करून देऊन ह्या योजनेवर साधकबाधक चर्चा या सत्रात अभिप्रेत होती. त्या दृष्टीने तयार केलेल्या

टिपणावर प्रथम श्री. एस्. डी. कुलकर्णी यांनी त्यांचे विचार मांडले. यावरील चर्चेचे वैशिष्टय म्हणजे ही विकासयोजना तयार करण्यात ज्यांचा प्रामुख्याने हातभार होता असे श्री. माधवराव पळणीटकर, सचीव समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र सरकार, हे स्वतः चर्चेला हजर होते. प्रा. एस्. एस्. काळे यांनी त्यांचा परिचय करून दिला.

त्यानंतर श्री. पळणीटकरांनी आदिवासी विकास योजनेची रूपरेषा सांगितली. ते म्हणाले की, अशा प्रकारची आदिवासी विकास योजना आतापर्यंत कुठेही आखलेली नाही. ती पूर्णपणे नवीन असल्याने अंदाज व आडाखे यावरच ती आधारावी लागली. तिच्यात अनेक त्रुटी व उणीवा असण्याची शक्यता आहे, हे त्यांनी मान्य केले. देशभर पंचवार्षिक विकासयोजनांचे वारे खेळत असले तरी आदिवासी मनुष्य या साऱ्यापासून पूर्ण वंचितच राहिला आहे. त्याचे अज्ञान, दळणवळणाचा अभाव समाजाकडून त्याची होणारी उपेक्षा व शोषण ह्या अनेक कारणांनी आदिवासी समाज मागे पडला. त्याच्याशी आपल्याला संवाद प्रस्थापित करावयास हवा. काल-परिमाणात ( Time Dimention ) हा गट खूपच मागे पडला आहे. त्याला आपल्या बरोबरीला आणण्यासाठी अतिशय निकराचे प्रयत्न करायला हवेत. ह्याकरिता आदिवासींवर प्रेम करणारी माणसे या कामात यायला हवीत. आदिवासींशी मित्रत्व निर्माण करावयास हवे. आदिवासींची भौतिक प्रगती व्हायला हवी; पण त्याहीपेक्षा त्यांची मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक जागृती होणे महत्त्वाचे आहे. शासन ह्याकरिता कटिबद्ध आहे. ह्या कार्याची क्षमता वाढविण्याकरिता एकसूत्री अधिकारयंत्रणा ( Single line of Command ) निर्माण करण्यात येणार आहे. एकाच अधिकाऱ्याकडे गेल्यावर आदिवासींची सर्व प्रकारची कामे व्हावीत अशी सोय यातून होणार आहे. शोषणाने पीडलेल्या आदिवासीला त्याच्या परिस्थितीतून मुक्त करून त्याचा पिचलेला आत्मविश्वास त्याला परत मिळवून देणे हा या योजनेचा प्रमुख भाग आहे.

आदिवासीशी संवाद साधणे फार महत्त्वाचे आहे. हा संवाद जितका पारदर्शक ( Transperent ) राहील तितका चांगला ठरणार आहे. ह्या संवादात गैरसमजाचे धूसर वातावरण राहू नये याकरता साऱ्यांनी प्रयत्नशील असणे जरूर आहे. स्वयंस्फूर्त कार्यकर्त्यांनी ह्या विकासयोजनेत मूल्यमापन व देखरेख ही दोन कामे पार पाडावीत असे आवाहन त्यांनी केले.

या योजनेवरील चर्चेत, धुळे आदिवासी विभागात काम करणारे श्री. अशोक मनोहर, जुन्नर भागातील श्री. सुदाम पवार, नासिक भागातील श्री. सीताराम मोतीराम पवार इ. कार्यकर्त्यांनी भाग घेतला. त्यांच्या शंकांना उत्तर देताना श्री. पळणीटकरांनी सांगितले की, भूमिहीन शेतमजुरांचा प्रश्न, धंदेशिक्षण, तांत्रिक शिक्षण या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यात एस्. टी. महामंडळ आणि इतर काही उद्योगपतींनी मदतीचे आश्वासन दिले आहे.

मनोर वन्य गटात काम करणारे श्री.आबा करमरकर यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की, ही योजना राबविण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावयाचे आहे. आदिवासी माणूस समजावून घेऊन त्याच्या मनात विकासाची इच्छा निर्माण करणे हे आपले काम आहे. आश्रमशाळा हा या विकासाचा केंद्रबिंदू करता येईल. सामाजिक व सांस्कृतिक मागासपणा भरून काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी सतत जागृत रहावयास हवे. नुसत्या सरकारी नोकरशाही चौकटीतून किंवा सदिच्छेतून हे कार्य पार पडणार नाही.

म्हैसाळचे कार्यकर्ते श्री. मधुकर देवल यांनी सरकारी नोकरांच्या दिरंगाईने ही योजना कोसळू नये याकरिता performance Budget आणि penalty हे दोन उपाय सुचविले. ठराविक काळात ठरलेले काम पार न पाडल्यास संबंधित अधिकाऱ्यांना काही तरी शिक्षा असावी असे त्यांनी सुचविले.

समारोपाच्या भाषणात श्री. पळणीटकरांनी महत्त्वाच्या सूचना शासनासमोर मांडण्याचे आश्वासन दिले व ते म्हणाले की, स्वयंस्फूर्त सामाजिक संस्थांचे कार्य विचारात घेतले जाईल; परंतु ते संख्येने इतके कमी आहे की त्यांच्यावर फारसे अवलंबून राहता येणार नाही. या गटांनी मुख्यत्वेकरून मूल्यमापन व देखरेख ही कामे हातात घ्यावी अशी त्यांनी पुस्ती जोडली.

यानंतरच्या चर्चेत अनेक कार्यकर्त्यांनी प्रकल्पातील अडचणी समर्थपणे मांडल्या. या मेळाव्यात कार्यकर्त्यांनी आपली मते तळमळीने मांडली आणि सहकार्याची व इतरांच्या मदतीची मागणी केली. अनेक ठिकाणी आदिवासींच्या प्रेमाने प्रेरित झालेले कार्यकर्ते काम करीत आहेत हे दृश्य दिलासा देणारे वाटले. (शासनालाच या ठिकठिकाणी आपापल्या कुवतीप्रमाणे काम करणाऱ्या स्वयंस्फूर्त लोकसंस्थांचा पत्ता कसा काय लागला नाही याचे आश्चर्यच वाटत होते.) त्यांच्यात अभिसरण घडले पाहिजे, परस्परसंबंध प्रस्थापित झाले पाहिजेत, एकमेकांची कामे एकमेकांना मार्गदर्शक व सहाय्यभूत ठरली पाहिजेत याकरिता 'ग्रामायन' ने मध्यवर्ती संस्था या नात्याने त्यांचा संबंध घडवून आणावा अशी साऱ्यांचीच इच्छा दिसली. यासाठी एखादे नियतकालिक व स्वयंस्फूर्त कार्यकर्त्यांची व त्यांच्या प्रकल्पांची माहिती देणारी सूची (Directory of Voluntary Agencies) तयार करावी, अशी एक कल्पना यातून बळावली आहे.

ग्रामायनला सूचना करताना कार्यकर्त्यांनी सांगितले की सरकारी कायदेविषयक व त्यांच्या अंमलबजावणीविषयक प्रसिद्धी ग्रामायनने करावी. तसेच तालुका जिल्हापातळीवर ग्रामायनच्या कचेऱ्या असाव्यात. दारुबंदीबाबत ग्रामायनने शासनाकडे प्रयत्नशील असावे. शिक्षक नेमताना नेमणूक ही त्यांची पात्रता पाहूनच करावी असे शासनाचे निदर्शनास आणून द्यावे. बऱ्याच अधिकारीवर्गांना आदिवासी भागाची कल्पना नसल्यामुळे त्यांच्यासाठी ट्रेनिंग सुरू करण्यास सरकारला सुचवावे. तसेच ग्रामायनने कार्यकर्त्यांसाठी ६ दिवसांचा मेळावा आयोजित करावा. हा मेळावा ट्रेनिंग या स्वरूपाचा असावा. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासंबंधी सरकारकडे इतरत्र चांगली व्यवस्था होईल यासाठी वारंवार प्रयत्नशील रहावे. तसेच सामुदायिक लग्नाची प्रथा, शहरी आदिवासी मुलांचे मेळावे आदिवासी भागातून आयोजित करावेत अशा नानाविध सूचनाही पुढे आल्या. शेवटी श्री. शरद कुलकर्णी यांनी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानले व असेच सहकार्य देण्याविषयी सांगून सदर मेळाव्याचा समारोप केला.

—कुसुम कर्णिक

# मुक्काम पुणे

**प्रकाश जोशी**

□ लहान मुलांना खरोखरीच चांगले दिवस येणार असे वाटू लागले आहे. कारण बाल-साहित्य, बाल-रंगभूमी, बाल-कलाकार यांच्या बाबत बाबा मंडळी आता सिरियस्ली विचार करायला लागलीत.

बाल-साहित्याचा परिपूर्णपणे विचार करण्यासाठी दोन दिवसांचे पहिले मराठी बालकुमार साहित्यसंमेलन नुकतेच पार पडले. या संमेलनामुळे बालसाहित्य लिहिणारे, त्यात आस्था असणारे ते प्रकाशित करणारे असे अनेकजण एकत्र आले. त्यावर सर्व बाजूंनी विचारविनिमय झाला.

दोन दिवसांतील चर्चा, भाषणे व खाजगी गप्पातून एक सूर मात्र कायम होता तो म्हणजे आपले बाल-साहित्य आज उपेक्षित आहे. त्याची अनेक कारणं देण्यात आली. चांगलं बालसाहित्य लिहिणारे लेखक नाहीत, त्याला प्रकाशनाची संधी नाही, बालवाचकवर्ग मोठा असला तरी पुस्तक खरेदी करणारी वडीलधारी मंडळीच असतात. ती लहान मुलांसाठी पुस्तके खरेदी करण्यात विशेष रस घेत नाहीत वगैरे वगैरे.

बाल कुमार साहित्य संमेलनाच्या उद्घाटनसमारंभाचे अध्यक्ष गोपीनाथ तळवलकर यांनी नेमके वर्मावर बोट ठेवले. प्रतिभावंत व प्रतिथयश लेखकमंडळी बालवाङमयाकडे दुर्लक्ष करीत असून त्याला सामान्य दर्जाचे उपेक्षित समजत आहेत असे मत स्पष्टपणे व्यक्त केले. ते म्हणाले, प्रतिभावान लेखक जर बालवाङमयाकडे वळले नाहीत तर मराठी बालवाङ्मय हे भाषांतराच्या कचाटयातून सुटणार नाही, त्यात जिवंतपणा येणार नाही. अर्थात ही प्रतिथयश मंडळी बालवाङमयाकडे का फिरकत नाही याला कारणंही सरळ आहेत. एक तर मराठी साहित्यिकाला मग तो मोठयासाठी लिहीत असो नाही तर छोटयांसाठी पैसा कमीच मिळतो. त्यांना बालवाङमय म्हटले की प्रसिद्धी, पैसा, मानमरातब जवळजवळ नाहीच. त्यामुळे ही मोठी मंडळी बालवाङमयाकडे वळत नाहीत अशी तक्रारही तळवलकरांनी केली. दोन दिवसांच्या संमेलनात साहित्यिक, चित्रकार, प्रकाशक व हितचिंतक यांच्यातील चर्चेतून स्वस्त किंमतीत जास्तीत जास्त दर्जेदार पुस्तके मुलांसाठी निर्माण करण्याच्या दृष्टीने किती प्रगती झाली हा एक प्रश्नच आहे; परंतु या निमित्ताने त्या दृष्टीने वाटचाल तरी सुरू झाली हे निश्चित.

या संमेलनाला जोडूनच, राज्यशास्त्र शिक्षणसंस्थेने आयोजित केलेल्या 'पुस्तक हंडी'च्या कार्यक्रमाने धमाल उडवून दिली. ही 'पुस्तकहंडी' फोडून 'खजिना' लुटण्यासाठी बाल-गोपालांनी व त्यांच्याबरोबर आलेल्या पालकांची इतकी प्रचंड झुंबड उडाली की त्यांना आवरता-आवरता संयोजकांच्या नाकी नऊ आले. या बोलक्या उदाहरणावरून बाल-गोपालांना पुस्तक किती हवे-हवेसे वाटते याचा धडा लेखक, प्रकाशक व पालकांनी घेतला तरी या साहित्यसंमेलनाचा हेतू निश्चितपणे पूर्ण होईल.

या बालकुमार साहित्य संमेलनाचे वैशिष्टय म्हणजे त्याचे कल्पक संयोजन. कोणतेही संमेलन म्हटले की तीच तीच रटाळ लांबलचक भाषणे, चर्चासत्र व बडया पाहुण्यांची गडबड आपल्या डोळयांपुढे येते; परंतु या संमेलनाचे संयोजन फक्त व्यवस्थितच होते असे नव्हे तर त्यात जागोजागी कल्पकताही आढळून आली. सुरेख पद्धतीने सजविलेले व्यासपीठ, 'पुस्तक-हंडी'सारखे कार्यक्रम नऊवारी पातळ नेसलेल्या लहान मुलींच्या हस्ते बालसाहित्यप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासारखे अभिनव उपक्रम वाखाणण्यासारखे झाले.

बालसाहित्यात मोलाची भर घालणाऱ्या २१ दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. एक एक साहित्यिकाचे नाव पुकारले जाई. एक लहान मुलगी सोनेरी स्वस्तिकाच्या पट्टीवर एक दीप पेटवून ठेवी. पार्श्वभूमीवर करुण संगीत. अस्थायी समितीचे अध्यक्ष अमरेंद्र गाडगीळ यांनी नवे अध्यक्ष भा. रा. भागवत यांच्याकडे अशाच कल्पकतेने सूत्रे सोपविली. त्यांनी पेटविलेल्या दीपाने श्री. भागवत यांनी आपला दीप पेटविला. अशा कल्पक उपक्रमांमुळेच हे संमेलन फक्त रटाळ चर्चा करणारे व्यासपीठ ठरले नाही. अर्थात या कल्पकतेचा वाटा नेतृत्ववर्धिनीचे मनोहर पटवर्धन व थिएटर ॲकॅडमीचे श्रीधर राजगुरू यांनी उचलला. तेव्हा बालसाहित्याला चांगले दिवस येतील असे मानायला हरकत नसावी. □

## पुढचे काय ?

□ सावकाराच्या दारापुढे कर्ज मिळवण्यासाठी भांडीकुंडी, दागदागिने घेऊन येणारे लोक आपण पाहिलेत. पण सध्या सावकाराच्या दारापुढे रांगा लागल्यात त्या वेगळया कारणासाठी. कर्जमुक्तीच्या वटहुकूमानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तसे आदेश काढल्यावर दुसऱ्याच दिवशी पुण्यातील सावकारांच्या दारावर रांगा लागल्यात. कारण कर्जे काढण्यापूर्वी प्रत्येकाला काहीना काही चिजवस्तू ही गहाण ठेवावीच लागली. आता नव्या आदेशानुसार ५०० रुपये उत्पन्न असणाऱ्या कामगार मजूर व लहान धंदा करणाऱ्या गोरगरिबांची कर्जे माफ झाली आहेत.

रविवार, गंजपेठ, खडकमाळ आळी, या भागात सावकारी मोठया प्रमाणावर होते. आपल्या चिजवस्तू परत नेण्यासाठी त्या भागात सावकारांच्या दारासमोर लोक कित्येक तास ताटकळत उभे होते. त्यात महिला, मुले, वृद्धां यांचाच भरणा जास्त होता. काही ठिकाणी सावकाराने दमदाटी केली तर काही ठिकाणी सावकाराला दमदाटी झाली. बहुतेक ठिकाणी पोलिस उपस्थित होतेच. काही सावकारांनी गहाण ठेवलेल्या वस्तूंच्या पावत्याच दिलेल्या नाहीत तर काहीजण उत्पन्नाचे दाखले आणा म्हणून अडून बसले आहेत. तर काही सावकारांकडून लोकांनी जबरदस्तीने हाताला लागेल तो माल उचलून नेला आहे.

शहरी भागातसुद्धा कर्जबाजारी फार मोठया प्रमाणावर आहेत. त्यात झोपडपट्टीत राहणारे बहुसंख्य आहेत. काही जण अडीअडचणीला तर काही व्यसनाधीन झाल्यावर कर्जबाजारी झालेले आढळले आहेत.

कर्जमुक्तीच्या वटहुकमाची माहिती अद्यापि सर्व थरापर्यंत जाऊन पोहोचलेली दिसत नाही. गरीब अशिक्षित कर्जदारालाच हे सावकार बाटेल तसे लुबाडत असतात. या कर्जदारांना सहाय्य करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था पुढे आल्या आहेत, अपक्ष खासदार मोहन धारिया यांनी आपल्या निवासस्थानी एक माहिती केंद्र उघडले असून हजाराच्यावर अर्ज तेथे जमले आहेत. कर्जमुक्तीच्या वटहुकुमानुसार ज्यांची कर्जे माफ ठरली आहेत त्यांना त्यांच्या वस्तू परत करण्यास आम्ही पूर्णपणे तयार आहोत परंतु आम्हाला काही ठिकाणी लोकांच्या जबरदस्तीस तोंड द्यावे लागते. काही ठिकाणी मारहाणही झाली आहे; अशी तक्रार मनीलेंडर्स असोसिएशनचे माजी चिटणीस शहा यांनी केली आहे.

अलका टॉकीज समोरच्या सावकाराच्या दुकानासमोर लागलेली अशीच एक रांग. अनेक ताटकाळत उभे आहेत आपला नंबर केव्हा लागतो याची वाट पाहात.

दापोडीचा एक कामगार कडेवर लहान मुलगी आहे. चेहरा जरा त्रासलेलाच.

काय कर्ज माफ झाले कां ?

होय ! त्याला फारसा आनंद झालेला नाही. आश्चर्य वाटले.

तोच पुढं म्हणाला, 'आता आमचा माल परत मिळेल. पण आम्ही गरीब माणसं कवा नड पडल सांगता येणार नाही. उद्या जायचं कुणाकडे ? असलनसल ते इकाव लागल.'

खरच. कर्जमुक्ती तर झालीच. पण पुढे कर्ज लागलं तर त्याची सोय काय ? ह्याचाही विचार आज ना उद्या करावाच लागणार. □

# इस्लामिक संस्कृती परिचय लेखमाला

## लेखांक दोन । इस्लामिक संस्कृती आणि तत्त्वज्ञान

रझिया वझिफदार

इस्लामच्या सारभूत तत्त्वांचा विचार करताना, एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते. पवित्र कुराण हा इस्लामचा आधार आहे. इस्लाम फुलत असताना, इस्लामिक तत्त्वज्ञान जगभर पसरत असताना, इस्लामिक साम्राज्ये उभी राहत असताना, इस्लामिक कायदे निर्माण होत असताना, पवित्र कुराण हाच प्रमुख आधार राहिला. अशा तऱ्हेने इस्लाम फुलत असताना, विविध शिक्षितांची चर्चा अनिवार्य होती. बाह्य संस्कृतींचा, आचारविचारांचा परिणामही काही अंशी मुस्लिम समाजावर होणे साहजिक होते. उघडच, अल्लाहचा अंतिम शब्द म्हणून पवित्र कुराण, प्रेषित महंमदांनी जनतेला बहाल केल्यानंतर, सुरुवातीला जरी मागच्या लेखात म्हटल्याप्रमाणे, एक नवीन संस्कृती जन्माला आली तरी, नंतरच्या काळात ह्या संस्कृतीत काही बदल घडत गेले. कुराणाचे अर्थ लावून, स्वतःच्या विचारांनुसार, संस्कृतीला, तत्त्वज्ञानाला खतपाणी अनेकांनी घातले. ह्या प्रक्रियेत, इतर संस्कृतींची काही चांगली तत्त्वेही इस्लामने स्वीकारली व एकूण विचारमंथनातून एक अत्यंत प्रगत संस्कृती, विचारधारा ह्या भूतलावर स्थिरावली. परिपूर्ण असा इस्लामिक कायदा इथे तयार झाला. हे दोन्ही घडताना, वेगवेगळ्या विचारप्रणालींचा प्रभाव जसा पडला तसे स्वरूप बदलत गेले; पण हे सारे घडले ते मात्र इस्लामच्या मूळ चौकटीतच ! कुराणाच्या मर्यादेतच ! अशी ही फुलली–फळलेली संस्कृती इथे रुळली, रुजली आणि जवळजवळ तेराव्या-चौदाव्या शतकापर्यंत इस्लामचा जबरदस्त पगडा जगावर होता. विशेषतः पश्चिमी जगावर !

इस्लामच्या सुरुवातीच्या काळात, इस्लाम जगावर जबरदस्त पगडा बसला तो ग्रीक संस्कृतीचा व तोही प्रामुख्याने अॅरिस्टॉटलचा! अब्बासिद् खिलाफतचा (हिजरी शतक २ रे) काळ हा इस्लामिक संस्कृतीच्या व तत्त्वज्ञानाच्या प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णकाळ मानला गेला आहे, ह्या काळात खूपच चर्वितचर्वण झाले. ह्या काळात अनेक ग्रीक ग्रंथांचे अरेबीत भाषांतर झाले आणि इस्लाममध्ये विचाराचे एक नवीन दालन उघडले गेले. बसऱ्याच्या अल् जाहिझने ग्रीकांच्या ह्या ऋणाचा फार कृतज्ञतापूर्ण उल्लेख आपल्या लिखाणातून केला आहे. नंतरच्या मुस्लिम तत्त्वज्ञांनीही ग्रीकांचे हे देणे कधी छपवायचा प्रयत्न केला नाही. स्वतःच्या सिद्धांतांचे मूळ ग्रीक तत्त्वज्ञांच्या अभ्यासात आहे, लिखाणात आहे हेही त्यांनी खुल्लमखुल्ला मान्य केले आहे. असे असले तरी मुस्लिम तत्त्वज्ञांचे कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. किंबहुना अॅरिस्टॉटल आणि ग्रीक तत्त्वज्ञान आणि कुराणातल्या अल्लाहच्या अंतिम आज्ञांचा सुरेख संगम ह्या मुस्लिम तत्त्वज्ञान्यांनी साधला आणि उत्कृष्ट संस्कृती फुलवली.

दुसऱ्या हिजरी शतकात पेटवली गेलेली ही ज्ञानज्योत पुढे प्रज्वलितच राहिली. विचारवंतांनी आपापल्या परीनं ही ज्ञानज्योत प्रज्वलित ठेवली एवढेच नाही तर तिच्या प्रकाशात इतरांनाही आणायचा प्रयत्न त्यांनी केला. ग्रीक आणि रोमन धर्तीवर इस्लामिक विद्यापीठे त्यांनी प्रस्थापित केली आणि इस्लामच्या शिकवणुकीसाठी खास व्यासपीठ तयार करून दिले. हिजरी सनाच्या ४५७ व्या वर्षी पहिले निझामी विद्यापीठ, निजाम-उल्-मुल्काने बगदादेत प्रस्थापिले. बगदादच्या पाठोपाठ निशापूर, दमास्कस, कैरो, अलेक्झांड्रिया अशी मुस्लिम विद्यापीठांची साखळीच उभी राहिली. ह्या विद्यापीठांनी इस्लामच्या तत्त्वज्ञानात खूपच मोलाची भर घातली आणि इस्लामचा भरपूर प्रसारही केला. 'इस्लाम'च्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य अकराव्या शतकात स्पॅनिश मुसलमानांनी फार मोठ्या प्रमाणात केले.

अकराव्या–बाराव्या शतकात स्पेनमध्ये अरबांचे वर्चस्व होते. ह्याच काळात, इस्लामिक स्पेनमधल्या पंडितांनी अरब जगत् आणि पाश्चिमात्य जग ह्यांना जवळ आणलं. अल् फरेबीसारख्यांच्या लिखाणातून, पाश्चिमात्यांना अॅरिस्टॉटल उमगला. बगदाद, कैरोतल्या विद्यापीठांनी नवी दिशा दाखवून दिली. पाश्चिमात्य जगातल्या त्या काळच्या विद्यापीठांची उभारणी अरब जगातल्या ह्या इस्लामिक विद्यापीठांच्या धर्तीवर झाली होती, असे इतिहासाचा थोडा वेध घेतला तरी सहज लक्षात येऊ शकेल. पाश्चात्य जगावरही त्यामुळे त्या काळात, इस्लामचा जबरदस्त पगडा बसला होता. एडमंड बर्क-सारख्यांनी, ह्या संदर्भातच 'इस्लाम हे जगातले एक सर्वोत्कृष्ट तत्त्वज्ञान' असल्याचे म्हटले आहे ! स्पॅनिश मुस्लिमांनी आणखीही एक महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांच्या माध्यमातून अॅरिस्टॉटल, प्लेटो हे जसे पाश्चिमात्यांना गवसले, तसेच ते अरब जगतालाही ज्ञात झाले ह्या स्पॅनिश मुसलमान पंडितांमार्फतच ! ग्रीक, रोमन, हिब्रू ह्या जुन्या, अत्यंत प्रगत समजल्या गेलेल्या संस्कृतींची ओळख अरबी समाजाला अल् फरेबी, अली सिया, इब्न् रशीद, अवी-सिना वगैरेंच्या लिखाणांतून झाली. ह्या वैचारिक देवाण-घेवाणीतून, इस्लामवर आपोआपच (अर्थात पवित्र कुराणाच्या मर्यादा पाळून!) हिब्रू, रोमन, ग्रीक शिकवणुकींचा भरपूर परिणाम झालेला आहे. प्रत्येक मुसलमान उलेमा, कुराणाला व प्रेषित महंमदांना सर्वश्रेष्ठ मानत असतानाच, अॅरिस्टॉट्ल, प्लेटो आदींनाही गुरुस्थानी मानत

गेला. साहजिकच, कुराण आणि ह्या सर्वमान्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारसरणीचा सुरेख संगम त्या काळात, मुस्लिम उलेमांनी (पंडितांनी) घडवून आणला होता. इस्लामला जागजिक दर्जा मिळण्यात, ह्या वैचारिक प्रक्रियेचा मोठा हिस्सा होता.

जगन्नियंत्याचा मागोवा घेणे, सत्य शोधून काढणे, त्यासाठी पुरेसा तार्किक आधार उपलब्ध करून घेणे, हे साधारणपणे कुठल्याही तात्त्विक मतप्रणालीचे उद्दिष्ट असते. ही तात्त्विक मतप्रणाली मग कुठल्या तरी मूलभूत आधारावर पुढे सरकते आणि पुढे सरकताना इतरत्र पाहते, विचार करते, नवनवे विचार प्रसवते. इस्लामने कुराणाचा आधार घेऊन वाटचाल सुरू केली; पण लगेचच इस्लामिक पंडितांनी, ख्रिश्चनांमध्ये प्रचलित असलेल्या अध्यात्मवादाचा ध्यास घेतला. अल मोमीन ( १९८ ते २१८ हि. ), अबू युसूफ अल् किंडी ( इ. स. ८७५ ) इब्न रशीद आदींनी ख्रिश्चन तत्त्वज्ञान, ख्रिश्चन शास्त्र आदींवरील पुस्तकांचे अरेबीत रूपांतर केले.

ह्या व अशाच कार्यांमधून, चर्वितचर्वणातून, इस्लामच्या सुरुवातीच्या काळात, काही मूलभूत मुद्द्यांवरच, इस्लामच्या विविध शाखांतून मतभेदांचे रान उठले. मुळात 'अल्लाह्'च्या अस्तित्वावर, त्याच्या एकमेवत्वावर संशय उत्पन्न झाले. 'कुराण' हा एक लिखित ग्रंथ आहे. तो अल्लाहनी लिहिला वा सांगितला असे मानले, तर मग शिवाय दुसरी एक तितकीच श्रेष्ठ अशी शक्ती आहे की जी सारे व्यवहार नियंत्रित करते. साहजिकच दोन अल्लाहचे अस्तित्व आहे की काय ? ह्या द्वैतवादावर अर्थातच कडव्या धर्माभिमान्यांनी कडाडून हल्ला चढवला. ह्या मंडळींच्या मते 'अल्लाह्' हाच जगन्नियंता व त्यानेच, प्रेपित महंमदाच्या तर्फे 'कुराण' भूतलावर पाठवले—मानवाच्या कल्याणासाठी कुराणाचा शब्द हा अखेरचा शब्द ! ह्या वादावर पडदा पडला तो वाझिल्–विन्–आटा, अबुल् हुझेल आदींनी मांडलेल्या युक्तिवादानंतर. त्यांनी 'अल्लाह्'ला सर्वश्रेष्ठ तर मानलेच; पण आदिशक्ती मानून, त्याच्या कृत्यांना शाश्वत मानून, त्याच्या एकमेवतेचा जोरदार पुरस्कार केला. 'अद्वैत' सिद्धान्त रूढ केला.

महंमदानंतरच्या काही काळातच, इस्लामी जगात, वरील सैद्धान्तिक झगड्यांबरोबरच, राजकीय वादही निर्माण झाले. अली आणि मुआविया ह्या शिष्यांत इस्लामिक–धर्मप्रमुखाच्या पदाच्या झगड्यांना प्रारंभ झाला. ह्यातूनच, इस्लामिक राज्यप्रमुखांसाठी कोणते निकष अंगीकारावेत ह्याविषयीही वाद निर्माण झाले. ह्या वादांमधून, इस्लामिक समाजात अनेक गट निर्माण झाले. गटबाजीचे वेगळे राजकारण सुरू झाले ! खवारिझ् गटाने अली आणि मुआविया ह्या दोन्ही गटांना धुडकारून लावले आणि कुराण व प्रेषितांची परंपरा ह्यांना प्रमाण मानणाऱ्या इस्लामिक राज्यव्यवस्थेचा पुरस्कार केला. त्यांनी कडवेपणाने धार्मिकतेचा पुरस्कार केला आणि कुराणातल्या वचनांप्रमाणे पापी–नालायक ठरलेल्या माणसाला मुस्लिम मानायला विरोध केला—भले मग त्या माणसाची इस्लामवर कितीही का भक्ती असे ना ! मुरजाइट्सनी ह्याला विरोध केला; पापी व्यक्तींना सुधारून घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यांना धर्मातून हाकून द्यायला नकार दिला. खवारिझनी मुस्लिमांचा प्रमुख कुणीही होऊ शकतो, अगदी नीग्रो गुलामसुद्धा, अशी भूमिका घेतली, तर शिया लोकांनी ह्या भूमिकेला कसून विरोध केला. त्यांच्या मते, प्रेषितांच्या फातिमांच्या वारसांनाच 'खिलाफत'वर अधिकार मिळायला हवा. वांशिक परंपरा चालूच राहायला हवी.

'मुतिझिलाह्'नी 'अद्वैत अल्लाह्'ची कल्पना तर पुढे मांडलीच; पण त्याचबरोबर आचार–विचारस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. आध्यात्मिक बंधने आणि कर्मठता त्यांनी झुगारून दिली. शास्त्र–विज्ञान व त्यातल्या संशोधनांना त्यांनी प्रोत्साहन दिले. आचार–विचारस्वातंत्र्य व त्याचबरोबर ज्ञान–विज्ञानाची कास, ह्यामुळे आपोआपच, माणसाच्या बुद्धिमत्तेला, 'मुतिझिलाह्'च्या काळात वर्चस्व प्राप्त झाले. शिक्षण, बुद्धिमत्ता व वैचारिक प्रक्रियेतून 'अल्लाह्'ला जाणून घेण्याचा, 'अल्लाह्' विषयी सर्व समजून घेण्याचा माणसाचा अधिकारही ह्याच काळात मान्य केला गेला.

मतभेदांच्या ह्या गदारोळातच ग्रीक, लॅटिन, हिब्रू वगैरे संस्कृतींमधल्या लिखाणांचे अरेबिकमध्ये भाषांतर झाले. नवीन विचारांचे वारे इस्लाममध्ये वाहू लागले. ज्ञान-विज्ञानाला महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊ लागले. मुतिशिलाह आणि अब्बासिद् काळामध्ये शास्त्र आणि तार्किक विचारशास्त्र, तत्त्वज्ञान ह्यांच्यात ठोस प्रगती झाली. सुधारणावाद्यांचा एक प्रभावी गट निर्माण झाला. ह्या सुधारणावाद्यांवर ग्रीक आणि हेलेनिस्टिक तत्त्वज्ञांचा फार मोठा प्रभाव होता आणि सुधारणावाद्यांचा इस्लामी जगतावर ! अल्लाहच्या अद्वैत, आदिशक्ती, न्यायदेवता आदी मूलभूत विशेषांवर आधारित जी तात्त्विक प्रणाली, त्या 'कलाम' ला आधार मानून, मुस्लिम उलेमांनी ग्रीक-हिब्रू संस्कृतींमधून आयात केलेल्या विचारांद्वारे 'कलाम' लाच अधिक पुष्टी दिली. इस्लामला अधिक व्यापक बनवले ! हे घडत असताना, सुधारणावाद्यांमध्ये मतभेद अर्थात होतेच; पण असे मतभेद असतानाही, ह्या मुस्लिम विचारवंतांत काही बाबतीत एकमत होते. हे विचार मुस्लिम तत्त्वज्ञानाचे आधारभूत ठरले. प्रगत मुस्लिम संस्कृती यातने बहरली; सर्वोत्कृष्ट इस्लामिक कायदा त्यातने अवतरला.

इस्लामिक उलेमांच्या वादातून इस्लाम बहरत असताना, इस्लामची मूलभूत ठरणारी जी सर्वमान्य तत्त्वे पुढे आली त्यात 'अल्लाह्' च्या स्वरूपाचा ऊहापोह महत्त्वाचा ठरावा. द्वैत-अद्वैताच्या वादावर मात करून अद्वैत सिद्धांतावर सर्वच उलेमांनी शिक्कामोर्तब केले. अल्लाहची इतर कशाशीही तुलना ह्या मुस्लिम पंडितांनी फेटाळून लावली. अल्लाहचे स्वरूप अविनाशी असून, स्थळ-काळाच्या मर्यादा अल्लाहला रोखू शकत नाहीत हेही मत त्यांनी ठामपणे मांडले.

अल्लाहच्या ह्या सर्वश्रेष्ठत्वानंतर, मुस्लिम उलेमांनी ज्या महत्त्वाच्या सूत्राला एकमताने उचलून धरले ते सूत्र होते विचार-स्वातंत्र्याचे ! कृती-स्वातंत्र्याचे ! कुठलीही कृती 'अल्लाह्' माणसावर लादत नाही; तर अल्लाहनी चांगल्या-वाइटाचा विचार करण्याची जी शक्ती माणसाला दिली आहे, तिच्या आधारे, तिचे योग्य प्रकारे आकलन होण्याच्या त्याच्या कुवतीनुसार, माणसाची प्रत्येक कृती घडत असते.

अशी कृती घडत असताना, चांगल्या-वाईट कृत्यांची मोजदाद करून, त्यानुसार त्याचे बरेवाईट परिणाम घडवून आणण्याचा 'अल्लाह्' च्या शक्तीलाही ह्या पंडितांनी ( उलेमांनी ), इस्लाम-

मध्ये महत्त्वाचे स्थान दिले आहे. साहजिकच, अल्लाहची ही निर्णायक शक्ती मान्य केल्यानंतर, पापी व्यक्तींना समाजाने धर्माबाहेर. जातीबाहेर फेकण्याला ह्या उलेमांनी विरोध दर्शविला आहे. मात्र ह्या साऱ्यांचा साधकबाधक विचार करून, माणसांनी पवित्र कुराणाच्या मार्गदर्शनानुसार चांगल्या गोष्टी करण्याची व अनुचित गोष्टी टाळण्याची आवश्यकताही ह्या उलेमांनी प्रतिपादिली आहे.

वर उल्लेखलेली ही सर्वमान्य सूत्रे आणि मागील लेखांकात व्यक्त केलेली इस्लामची सारतत्त्वे, ह्यातूनच प्रामुख्याने इस्लामिक संस्कृती बहरत गेली. श्रेष्ठतम इस्लामिक कायदा आकार घेत गेला.

इस्लामिक संस्कृतीवर काही मर्यादा त्यामुळे आपोआपच पडल्या आहेत. सर्वसामान्य हिताच्या कुठल्याही गोष्टींना इस्लाम वाव देत असला, तरी जिथे इस्लामच्या वर व मागील लेखात उल्लेखिलेल्या मूलभूत कल्पनांना विरोध असेल तिथे त्या त्या गोष्टींना इस्लाममध्ये वाव राहणार नाही. 'अल्लाह' ला आव्हान इस्लाम मान्य करणार नाही ! त्याच्या अस्तित्वाबद्दलची शंकाही इस्लाम खपवून घेणार नाही ! इस्लामने त्याच्या चढत्या-उतरत्या काळात, शास्त्रांना, विज्ञानाला भरपूर वाव दिला. किंबहुना माणसाला 'अल्लाह' ने उपलब्ध करून दिलेले एक महत्त्वाचे साधन म्हणूनच इस्लामने ज्ञान-विज्ञानाकडे पाहिले. तथापि विज्ञान सर्वश्रेष्ठ आहे असे इस्लामने कधीच मानले नाही. पूर्णत्वाकडे जाण्याच्या, 'अल्लाह' ला समजून घेण्याच्या ज्ञान-विज्ञान ह्या केवळ शिड्या आहेत; ज्ञान-विज्ञान स्वतः मात्र अंतिम नाहीत. जिथे त्यांनाच, 'अल्लाह' च्या ऐवजी अंतिम मानायचा प्रयत्न केला जातो तिथे इस्लामचा विरोध आहे.

'अल्लाह'च्या ह्या 'अद्वैता'वर सर्वश्रेष्ठत्वावर इस्लामिक संस्कृतीने, इस्लामिक तत्त्वज्ञानाने जेवढा भर दिला आहे तेवढाच तो 'अल्लाह'च्या निर्मितीवर, विशेषतः माणसावर दिलेला आहे. माणसाचा ऐहिक-पारमार्थिक उत्कर्ष ह्यावर कुराणात, हादितमध्ये ठिकठिकाणी ऊहापोह आहे. कुराण, हादित् त्यावर आधारित इस्लामिक कायदा ही त्याची प्रमाणे आहेत.

आदिमानवाच्या काळापासून काही ना काही कायदे कळत-नकळत अस्तित्वात आहेत, पाळले जात आहेत. 'मुळात मनुष्यजात हे एक मोठे कुटुंब होतं. अल्लाहनं वेळोवेळी आपले प्रेषित ह्या माणसाच्या उत्कर्षासाठी पाठवले. नव्या नव्या चांगल्या कल्पना घेऊन ! त्यांच्या द्वारे 'अल्लाह'नी वेळोवेळी चिरंतन सत्याचे नवनवे धागे उकलून मानवासमोर ठेवले. त्याद्वारे मतभेदाच्या वेळी योग्य निर्णय घ्यायची कुवत माणसात निर्माण होत गेली.' (कुराण २/२१३.) प्रत्यक्ष पवित्र कुराणातच वर्णिल्याप्रमाणे 'अल्लाह'नी देखील माणसाच्या उत्कर्षालाच अधिकाधिक महत्त्व देऊन त्यानुसारच प्रेषितांद्वारे सत्य आणि न्याय, चांगुलपणा ह्या आधारांवर मूलभूत प्रेरणा माणसाला दिल्या ! तत्त्वज्ञान, कायदा, संस्कृती त्यातने वाढत गेली.

इस्लामिक संस्कृती, इस्लामिक तत्त्वज्ञान ह्यांचा काही विचार आपण ह्याआधी केला आहेच. इस्लामिक कायद्याचा 'शर'चा विचारही त्याचबरोबर केला पाहिजे. प्रेषित महंमदांच्या पूर्वी अरब जगातले सामाजिक जीवन खूपच विस्कळित होते. 'अल् मुरियत' (al Muru'ah)च्या आधारे काही रिती-रिवाज, नैतिक बंधने अस्तित्वात होती एवढेच. महंमदानंतर इस्लामच्या शरियतनी (Shari'ah) अल्-मुरियत्ची जागा घेतली. शरियत् साधारणतः कुराणावर आधारित पहिला संपूर्ण इस्लामिक कायदा मानायला हरकत नाही. ह्यामध्ये 'अल्लाह' हा न्यायाधीश, कुराण हाच शर (कायदा) किंवा 'दलिल' किंवा हुज्जत' आणि ह्या साऱ्यापासून फायदा मिळणारा तो 'माणूस' असे तीन घटक मानले गेले आहेत. कुराणात किंवा महंमदाच्या 'हादित्'मधून दाखवल्या गेलेल्या मार्गानुसार, 'शर'नुसार अल्लाहचे प्रेषित किंवा अल्लाहच्या खऱ्या-खुऱ्या 'पाक' प्रतिनिधींनाही (Pious) न्यायदानाचा अधिकार देण्यात आला होता. ह्या उलेमांनी कुराणाचा हा कायदा पुढे इतक्या पूर्णत्वाला नेला की एडमंड बर्कसारख्यांनी त्याची 'जगातील सर्वोत्कृष्ट कायदा' अशी भलावण केली !

वर म्हटल्याप्रमाणे 'शर' म्हणजे पथ, मार्ग ! मानवी जीवन जगण्याचा, चांगल्या तऱ्हेने जगण्याचा मार्ग !! ह्या वाटचालीचे अंतिम ध्येय इस्लामने 'अल्लाह' मानले आहे !!! इस्लामिक कायद्याची सारी सूत्रे त्याच दृष्टीने मांडली गेली आहेत. 'तुम्हा सर्वांना परत अल्लाहकडेच पोचायचे आहे.' (प्रकरण ५/४८) असे खुद्द पवित्र कुराणातच म्हटले आहे. एका दृष्टीने इस्लामिक संस्कृती, इस्लामी तत्त्वज्ञान, कायदा, दलिल हा सारा 'शर' (वाटचाल) ह्याच अंतिम उद्दिष्टातून आहे. त्यातच मानवाचे पूर्णत्व आहे.

महंमदांच्या हयातीत, महंमद स्वतः मदिनेतून न्यायदानाचे काम बघत कुराणाच्या आधारे. हिजरी सनाच्या ११ व्या वर्षी, महंमदांना मृत्यू आला. त्यानंतर, पहिल्या खलिफाने कुराणात दाखवून दिलेला 'शर', महंमदांची 'हादिते' आणि सुन्नाह (महंमदांनी घालून दिलेल्या प्रथा !) ह्यांच्या आधारे न्यायदानाला सुरुवात केली. मात्र ह्या न्यायदानाच्या वेळी त्याने अन्य काही उलेमांशी सल्लामसलतही करायला सुरुवात केली. ज्या ज्या ठिकाणी पवित्र कुराणाचा स्पष्ट 'नास' (Clear Verdict) नसेल किंवा जिथे जिथे महंमदांचं स्पष्ट 'हादित' नसेल, तिथे तिथे ही मंडळी परस्पर सल्लामसलतींतून न्यायदानाचे काम करू लागली. खलिफा अबु बकरने तर, ज्या ज्या वेळी हादितवर किंवा नासांवर मतभेद निर्माण झाले त्या त्या वेळी अशा सल्लामसलतींद्वारे अशा हादितांवर, नासांवर खुलासेही प्रकाशित केले. कुराण आणि हादितच्या जोडीला, अशा तऱ्हेने उलेमांच्या सामुदायिक विचार–संस्थेलाही (म्हणजेच इजमालाही !) इस्लामिक न्यायव्यवस्थेत मानाचे स्थान मिळाले; परंतु इज्मानेही जनमतानुसार कार्य करावे असेही मार्गदर्शन कुराण व 'हादित' मधून मिळते. '......परस्पर सल्लामसलत व सहकार्य हीच त्यांची (उलेमांची!) कार्यपद्धती असावी (कुराण ४२।३८) असे सांगून, मुळात कुराणातच, इज्माची सूचना मांडली आहे. त्याचबरोबर, 'माझ्या चुकांना माझा समाज क्षमा करणार नाही' असे वेळोवेळी म्हणून महंमदांनी उलेमांच्या, सत्ताधिशांच्या एकूणच कार्यपद्धतीची सांगड जनतेच्या एकूण इच्छा–आकांक्षांशी निगडित करून टाकली आहे. इज्मातली विद्वत्मंडळी ही समाजाशी प्रामाणिक असणारी प्रातिनिधिक मंडळी असावी हेही गृहीत धरले गेले आहे. त्यामुळे 'जनेच्छा'ला 'अल्लाह'ने किती महत्त्व दिले आहे हेच सिद्ध होते !

इज्माला इस्लाममध्ये असे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले तरी, उलेमांना 'अल्लाह'चे अवतार वगैरे इस्लामने कधीही मानले नाही किंवा धार्मिक श्रेष्ठत्वासाठी वंशपरंपरेचा मार्गही कधी इस्लामने चोखाळला नाही. इतकेच काय, पण इज्मावरच्या उलेमांना खास अधिकारही इस्लामने कधी बहाल केले नाहीत. त्यांना समाजात मानाचे स्थान त्यांच्या ज्ञानाच्या जोरावर जरूर मिळे; पण खास दर्जा मात्र नाही. कुठलाही माणूस स्वतःच्या ज्ञानाच्या, शुचित्वाच्या

जोरावर इज्मावर प्रतिनिधित्व मिळवू शकत असे !

ह्याच्यात पुढे थोडा बदल होऊन, सार्वमताऐवजी, मतभेदांच्या वेळी स्वतःचे व्यक्तिगत मतही पुढे मांडायचा अधिकार उल्मांना देण्यात आला. असे मत मांडणारी व्यक्ती मुस्लिम असली पाहिजे, इस्लामचा तिचा अभ्यास असला पाहिजे एवढयाच अपेक्षा ह्या व्यक्तींकडून ठेवण्यात आल्या. अशा ह्या मुज्‌ताहिद्‌नी दिलेले स्वतंत्र मत म्हणजेच 'इज्‌तिहाद.' 'इज्‌तिहात'चा उपयोग चोखंदळ अभ्यासाच्या दृष्टीने फार चांगला झाला व त्याचाही इस्लामिक कायद्यावर खूपच परिणाम झाला.

कुराण, हादित्, सुन्नाह, इज्मा व इज्‌तिहाद् ह्यांच्याच आधारावर आजचा परिपूर्ण इस्लामिक कायदा उभा राहिला आहे. इस्लामची सारतत्त्वे, विविध तत्त्वज्ञांनी एकमताने पुरस्कारलेले सिद्धान्त ह्यांच्याप्रमाणेच इस्लामिक कायद्याच्या ह्या आधारस्तंभांनीही इस्लामिक संस्कृती व इस्लाम पूर्णत्वास नेण्यास खूपच हातभार लावला आहे. ☐

## काही इस्लामिक तत्त्वज्ञ

**अल् फरेबी :** (मृत्यू हि. स. ३३९) मूळचा तुर्की. ॲरिस्टॉट्ल आणि प्लेटो ह्यांचा हा गाजलेला भाष्यकार. ह्याच्या लिखाणामुळे अरब जगात तर नवीन वैचारिक दालन उघडलेच; पण पाश्चात्य जगालाही ॲरिस्टॉट्ल–प्लेटो ह्यांचे विचारधन खुले झाले. 'Republic of Plato'वरून त्याने लिहिलेले 'आदर्श नगरी' पुस्तक खूपच गाजले. शिवाय विज्ञान, तर्कशास्त्र वगैरेंवरचीही पुस्तके त्याने लिहिली.

**अव्हिसेन्ना :** हा पाश्चात्य जगाला अल् फरेबीपेक्षाही अधिक परिचित झाला तो त्याला असलेल्या दिलखुलास लेखणीच्या देणगीमुळे. त्याच्या लिखाणामुळे, समजावून देण्याच्या हातोटीमुळे तो खूपच लोकप्रिय झाला होता. त्याचे खरे नाव अबू अली इब्न सिना (मृत्यू हि. स. ४२८) त्याचे प्राथमिक शिक्षण वडिलांच्याच हाताखाली झाले आणि नंतर त्याने वैद्यकीय व्यवसायाला प्रारंभ केला. बादशाह नुह (Nuh) वर वैद्यकीय उपचार करत असतानाच त्याला 'इज्मा'त प्रवेश मिळाला. त्या वेळी त्याने बुखारा (Bukhara) इथे तत्त्वज्ञान, राजकारण वगैरेंवर अभ्यास केला. तिथून त्याची ख्वारिझ्म–बिरुनी–इस्फहान अशी खडतर वाटचाल सुरू झाली. तुरुंगवास आणि तुरुंगातून पलायन हेही त्याला अनुभवावे लागले.

अशा विविधतेने नटलेल्या, वेगवेगळ्या बादशाहांचा नूर बघितलेल्या अव्हिसेन्नाचे प्रमुख लिखाण प्रायः विज्ञानावर आधारित आहे. खेरीज तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, ज्योतिष वगैरेंवर मिळून त्याची शंभरावर पुस्तके उपलब्ध आहेत. शिवाय काही अरेबिक व पर्शियन काव्यासंग्रहही त्याच्या नावावर आहेत.

त्याच्या लिखाणावर प्रामुख्याने अल् फरेबी, ॲरिस्टॉट्ल ह्यांच्याच विचारांची छाप पडलेली आढळून येते.

**इब्न् रशीद :** (इ. स. ११२६–११९८) हा स्पॅनिश अरब तत्त्वज्ञ अव्हिसेन्नानंतर खूपच गाजला. साधकबाधक प्रतिक्रिया त्याच्या विचारांवर होत असली तरी त्याचा जबरदस्त वैचारिक पगडा जवळजवळ शंभर वर्षांपर्यंत इस्लामिक जगतावर बसलेला होता. तोही ॲरिस्टॉट्लचा भाष्यकार म्हणूनच गाजला. त्याच्या लिखाणामुळे तो अरब जगात फारसा लोकप्रिय मात्र नव्हता. तरीही त्याच्या विचारांचा प्रभाव मात्र दीर्घकाळ होता. अरब जगापेक्षा तो लोकप्रिय ठरला तो ख्रिश्चन युरोपात ! तो सुधारणावादी होता आणि तितकाच तो विशुद्ध ॲरिस्टॉटॅलियन होता ! त्याने सुरू केलेल्या बौद्धिक चळवळीने युरोप व्यापून टाकला होता. त्याच्या कार्यामुळेच प्रामुख्याने, मुस्लिम स्पेनला फार महत्त्व त्या काळी आले. मुस्लिम स्पेनने, अनेक मोठमोठाले तात्त्विक संघर्ष पाहिले, नव्या विचारांना खतपाणी घातले !

**अल् घझ्झली :** (हि. स. ४५८–हि. स. ५३२) याचा प्रभावही प्रामुख्याने पाश्चात्य जगावरच होता. त्याचा जन्म तुस (Tus) येथे झाला तर शिक्षण निशापूर येथे. तो वाढला सुफी वातावरणात, तरी त्याने स्वतःवर त्या वातावरणाचा फार मोठा पगडा बसू दिला नाही. निरीश्वरवादापासून सुरुवात करूनही शेवटी, अभ्यासांती तो पुन्हा सुफी पंथाकडे वळला. 'अल्लाह'चे अस्तित्व त्याने अभ्यासांती मानले. महंमदांची हादिते, अंतिम न्यायदानाचा दिवस या सिद्धांताशी तो सहमत झाला. अभ्यास आणि स्वानुभव ह्यांच्या जोरावरच त्याने ही मते बनवली आणि ह्याच पद्धतींचा त्याने इतरांसाठी पुरस्कार केला.

इमाम शफीच्या ह्या शिष्याची महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्याने इस्लाम सर्वसामान्यांपर्यंत नेऊन भिडवला. त्याचप्रमाणे त्याने गूढवादाचे कवचही फोडले. सामान्य माणसाला त्याने पुन्हा एकदा धर्मवादाकडे नेले. महंमदांच्या मूळ शिकवणुकीकडे नेले. घझ्झली मूलभूत इस्लामिक सिद्धांतांपासून कधीही ढळला नाही.

**इब्नुत अरेबी :** (इ. स. ११६५–१२४०) हा त्याच्या काळातला मोठा चमत्कारवादी (Mystic) मानला गेला. त्याच्या म्हणण्यानुसार 'अल्लाह' आणि 'आत्मा' (Spirit) म्हणजेच खराखुरा प्रकाश होय. कुठल्याही गोष्टीला कायम अस्तित्व असते असे तो मानीत असे व प्रत्येक गोष्ट कालमानानुसार पुढे येते व नंतर आपल्या जागी पुन्हा परतते असा त्याचा दावा होता. त्याच्या गूढवादी विचारसरणीचा फार मोठा प्रभाव प्रामुख्याने सुफी जगावर होता.

इब्नुत अरेबी हा झाहिरी मतप्रणालीचा होता. मुस्लिम तत्त्वज्ञानाचा जरी तो पुरस्कर्ता व प्रचारक म्हणवून घेत असे, तरी त्याचा भर होता चमत्कारवादावर. त्याला काही दिव्यशक्ती प्राप्त असल्याचा त्याचा दावा होता. विविध धर्मांना तो समान लेखीत असे. महंमदांना बघितल्याचा त्याचा दावा होता; तर 'अल्लाह' आपल्याला पूर्णपणे माहीत असल्याची त्याची खात्री होती.

'अल्फुतुहातिल् मक्काह', 'खुसुसुल हकम', 'तार्‌जुमनुल अश्वाक' ही त्याची गाजलेली पुस्तके–१००–१५० ज्ञात पुस्तकांपैकी ! एवढे असले आणि त्याच्यामागे त्याच्या चाहत्यांचा मोठा परिवार असला तरी, एकूण अरब पंडितांनी, विद्वानांनी मात्र त्याचा वेळोवेळी धिक्कारच केला. 'नास्तिक' (झिंडीक्) म्हणून त्याची अवहेलना केली. त्याच्या लिखाणालाही त्यांनी विरोध केला. एवढेच काय, पण त्या काळी इजिप्तमध्ये त्याच्या खुनाचेही प्रयत्न करण्यात आले. थोडक्यात, त्याच्या चमत्कारवादाने तो लोकप्रिय झाला, तरी त्याच्या विचारसरणीला इस्लामने फारसे प्रोत्साहन दिले नाही !

**'हातिमत्-ताई'** ह्या प्रसिद्ध चमत्कारवाद्याच्या वंशावळीतला **अबुल् बक्र मुहम्मद बिन् अलि मुहुद्दीन** अल् हातिमी (हि. स. ५६० ते ६३८) हाही त्याच्या काळातला गाजलेला चमत्कारवादी होऊन गेला. हादित् आणि 'फिक्'चा त्याने लहानपणीच अभ्यास केला आणि ट्युनिस, मक्का, बगदाद, करत करत त्याने पूर्वेकडे मुस्लिम तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. त्याच्याही नावावर मोठा ग्रंथसंग्रह असून, चमत्कारवादाबरोबर इस्लामिक तत्त्वज्ञानाचा भाष्यकार म्हणूनही तो गाजला. ☐

# सोलकढी

## □ जादूच्या जांभया देणारे वडील

पोटापाण्यापुरते मिळाले की सुखात डुंबत राहणारी कोटयवधी माणसे या सुजलसुफलमलयजशीतल भारतात आहेत. पोटापाण्यापुरते मिळाल्यावरसुद्धा पैसे जोडत बसायचा सोनेरी छंद काही देशांनी जसा जोपासला आहे तसा भारताने कधीही जोपासला नाही. येथे, पैसे मिळवणे या गोष्टीला मूल्य नाही; मूल्य आहे पैसे न मिळवणे, या गोष्टीला. इथली काही माणसे तर पैसे न मिळवण्याचा खटाटोप आयुष्यभर करत असतात. पैसा हे सर्व दुःखांचे मूळ आहे अशी आमच्या ज्ञानधन पूर्वजांची शिकवण आहे. ती शिकवण आम्ही इतकी अंगी बाणवली आहे की इथल्या अतिसामान्य माणसालाही पैशाचा लोभ नाही.

या एका बाबतीत मी परदेशी आहे की काय असा संशय मला एकसारखा येत असतो. पैसा म्हटला म्हणजे माझ्या तोंडालाच काय, सर्वांगाला पाणी सुटते. आपल्याला सारखे पैसे मिळत राहावे, असे मला वाटत असते. पैशाने डावीउजवी, अल्याडपल्याडची सगळी सुखे विकत घेता येतील, अशी माझी भाबडी पण ठाम समजूत आहे. पैसे मिळवण्यासाठी मी काय एकेक लाफेलटपटी करतो; पण माझ्या खिशाला यश नाही हेच खरे. नाही तर काहीकाही माणसे असे भाग्याचे भद्रायू असतात की नुसत्या जांभया दिल्या तरी त्यांच्या बिनभोक खिशात मोहोरा जमतात. काही ठिकाणी तर जांभया बापाच्या आणि मोहोरांचा खिसा बेटयाचा, असा चावट प्रकार असतो. अशा जादूच्या जांभया देणारे वडील लाभले नाहीत याची मला निरंतर खंत वाटते. ज्यांना असे वडील लाभले त्यांचा जळजळीत मत्सर वाटतो.

एका अरब बेटयाचा असाच मत्सर सध्या मला वाटतो आहे. त्याचा बाप सौदी अरेबियातला एक शेखसाहेब आहे. तेलखाणींच्या मक्तेदारी मालकीमुळे अनेक शेखसाहेब तोबातोबा गबर झाले आहेत. त्यांच्या स्वतःच्या प्रदेशात पैसे उधळायच्या चांगल्या सोयी फारशा उपलब्ध नाहीत. अमेरिकेत त्या आहेत. म्हणून ते मधूनमधून अमेरिकेची यात्रा करतात. जुगारात, एका रात्रीत दहा लाख डॉलर्स हरले तरी त्याचे त्या बेटयांना ( म्हणजे बापांना हो ) काहीच वाटत नाही. त्यांच्या आलिशान कॅडिलॅक वा रोल्स रॉईस मोटारींवर सजावटीसाठी अत्यंत मौल्यवान हिरे जडवलेले असतात. अशा एका अरब शेखसाहेब बापाला अमेरिकेतला अलामो किल्ला विकत घ्यायचा आहे. कशासाठी ? शेखसाहेब बापाचा लाडका बेटा अलामो किल्ल्याच्या परिसरात विमान चालवायला शिकला. आता त्याला काही तरी बक्षीस द्यायला हवे तेव्हा हा किल्लाच द्यावा, असा फाकडा विचार शेखसाहेबांच्या पागोटयाखालच्या भक्कम डोक्यात आला आहे.

मागे शिवाजीमहाराजांसारखा माणूस काही लक्ष होन खर्चून असा किल्ला विकत घ्यायचा म्हणे. तेव्हाचे ठीक होते. आता सुद्धा किल्ला विकत मिळतो हेच मुळी माझ्या वडिलांना ठाऊक नसेल. आणखी असे की मी कुठे अलामोच्या अमेरिकन परिसरात विमान चालवायला शिकलो आहे ? शिवाय बक्षिसादाखल पुस्तकच विकत घ्यायचा रिवाज आमच्या घराण्यात आहे.

' एक अरब शेखसाहेब बाप आणि त्याचा बेटा ' ही गोष्ट वाचून आमच्या देशबांधवांना तुच्छतेचे हसू येईल. मला मात्र त्यांचा मत्सरच वाटला. वडलांनी आपल्याला फार मोठा नाही फार लहान नाही असा बेताचा एक किल्ला विकत घेऊन दिला आहे, असे स्वप्न मला वारंवार पडते. एकदा बेताचा का होईना किल्ला मिळाल्यावर हो काय, मी त्याच्यावर सर्व सुखसोयींनी सज्ज अशा विलोरी नावाच्या पाचसात हौसिंग कॉलन्या उभारून टाकतो. हे एकदा यथास्थित पार पडले की तिथे एखादे मुक्तांगण, ग्राहक चळवळीसाठी एक अद्यावत कचेरी आणि प्रायोगिक रंगभूमीसाठी एक वऱ्यापैकी नाटयगृह या गोष्टी कशा बसवता येतील याचा विचार मला करायचा असतो; पण माझे स्वप्न बहुधा त्यापूर्वीच विराम पावते.

—अनंतराव

---

¤ एक बातमी : कलकत्ता विद्यापीठाच्या एम्. ए. च्या परीक्षेत कॉपीचे व सामुदायिक कॉपीचे एकही उदाहरण यंदा घडले नाही.

कलकत्ता विद्यापीठ एवढे मागासलेले आहे, याची इथे कोणाला फारशी माहिती नाही.

¤ चित्त्याचे मूत्र, अस्वलाचे केस, हत्तीची विष्ठा आणि त्याने पायांखाली रगडलेली माती यांच्यात औषधी गुण असतात असा अनेकांचा समज आहे व या वस्तू अगदी अल्प किंमत घेऊन पुण्याच्या पेशवेपार्कमधल्या प्राणिसंग्रहालयात अधिकृतपणे विकण्यात येत असतात अशी बातमी आहे. या बातमीवर मल्लिनाथी करताना 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'धावत्या जगा'तल्या 'अजब व्यापार' या स्फुटात म्हटले आहे : वैदूंच्या ठकबाजीला आळा घालायचे उद्दिष्ट या वस्तू अधिकृतपणे विकून काही प्रमाणात साध्य होईल असा जो संग्रहालयाच्या चालकांचा दावा आहे त्यातही काही तथ्य आहेच. अस्वलांच्या केसांच्या लहानशा जुडीला वैदू–बाजारात दोन रुपये पडतात म्हणे !

अहो, बाळ 'दूर्वांच्या जुडी'चे तर सवलतीचे दर पाच–चार–तीन–दोन–एक असतात म्हटलं.

¤ कोल्हापूरला नुकताच 'पुस्तकांचा दुष्काळ येणार काय ?' या विषयावर एक परिसंवाद झाला. त्यात, प्रकाशकांच्या वतीने बोलणारे वक्ते म्हणाले : कादंबरीचा अपवाद सोडला तर कविता वगैरे ग्रंथांचे प्रकाशन म्हणजे वाळवीचीच सोय !

भ्रम आहे हा. कवितांच्या पुस्तकांना अलीकडे वाळवीसुद्धा शिवत नाही हो.

¤

# बांगला देश

## लष्करी क्रांतीवर प्रकाश

वा. दा. रानडे

बांगला देशमधील नव्या राजवटीस जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी आता मान्यता दिली असून ती स्थिर होत असल्याचे दिसत आहे. मुजीबच्या धोरणांपेक्षा नव्या राजवटीच्या धोरणांचा निराळेपणा गेल्या काही दिवसांतील घोषणांनी जाणवू लागला आहे. त्यातील सर्वांत महत्त्वाची घोषणा म्हणजे मुजीब यांची एकपक्षीय राजवट नवे अध्यक्ष खोंडकर मुश्ताक अहमद यांनी रद्द केली आहे; पण त्या जागी कोणती पद्धती येणार हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. उलट याआधीच्या एका हुकुमाने कोणताही राजकीय पक्ष स्थापण्यास बंदी केली. या दोन हुकुमांची संगती कशी लावावयाची? मुजीबच्या राजवटीत निदान एका पक्षास तरी परवानगी होती; नव्या राजवटीत सर्वच पक्षांना बंदी आहे. याचा अर्थ बांगला देशात पक्षहीन राजवट नवे सत्ताधारी आणू पहात आहेत काय? पण तशीही स्पष्ट घोषणा त्यांनी केलेली नाही. कदाचित याबाबत निश्चित भूमिका त्यांना अजून ठरवावयाची असेल; पण पक्षहीन राजवटीतून सत्ताधारी व्यक्तीची हुकुमशाही प्रस्थापित होण्याचा धोका दिसतो.

बांगला देशातील या नव्या क्रांतीमागच्या परिस्थितीची अधिक कल्पना देणारी माहिती आता प्रकाशात येऊ लागली आहे. मूठभर कनिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी ही क्रांती घडवून आणली. मुजीब कुटुंबातील एकूण ४६ लोकांची त्यांनी कत्तल केली. मुजीबना ठार केल्यानंतरच त्यांच्या सरकारमधील मंत्री व वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांचा पाठिंबा या कनिष्ठ अधिकाऱ्यांनी क्रांतीस मिळविला. यापैकी काही अधिकाऱ्यांना नोकरीतून बडतर्फ करण्यात आल्याने त्यांचा मुजीबवर रोष होता. मेजर सैफुल दलील त्यांपैकीच एक. त्यांना गेल्या वर्षी लष्करातून बडतर्फ करण्यात आले होते. बांगला देश रेडिओवर क्रांती झाल्याची पहिली घोषणा त्यांनीच केली. क्रांतीत त्यांची कामगिरी कितपत महत्त्वाची होती हे त्या वेळी स्पष्ट झाले नव्हते; पण आता उपलब्ध झालेल्या माहितीवरून असे दिसते की मुजीब मंत्रिमंडळातील मंत्र्यांचा पाठिंबा क्रांतीला मिळविण्याचे महत्त्वाचे काम मेजर दलील यांनी केले. दलील यांच्या इतर सहकाऱ्यांनी मुजीब व त्यांच्या नातलगांच्या निवासस्थानी हल्ले केले त्याच वेळी मेजर दलील यांनी मंत्र्यांशी संपर्क साधला.

एका भ्रष्टाचारप्रकरणात मुजीब यांनी स्वीकारलेल्या तडजोडीच्या धोरणाने काही तरुण लष्करी अधिकाऱ्यांवर अन्याय झाला. त्याचा सूड म्हणून त्यांनी मुजीबचा बळी घेऊन हे सत्तांतर घडवून आणले. एका वर्षापूर्वी डाक्क्यातील एका विवाहाच्या स्वागतसमारंभाच्या वेळी झालेल्या भांडणातून या उठावाचे बीजारोपण झाले.

तांदूळ व तागाची भारतात मोठ्या प्रमाणावर चोरटी निर्यात करण्यात येत होती व त्यावर गबर झालेला एक नवा वर्ग बांगला देशात उदयास येत होता; पण देशाच्या अर्थव्यवस्थेवर मात्र याचा घातक परिणाम झाला होता. दुष्काळाचे आणि ग्रामीण भागातील उपासमारीचे ते एक प्रमुख कारण होते. कोमिल्ला भागात या चोरट्या व्यापाराविरुद्ध मोहिमेची सूत्रे मेजर दलील यांनी आपल्या हाती घेतली. धान्य व तागाचे मोठे साठे बेकायदा जवळ बाळगल्याबद्दल काही प्रमुख अवामी लीग कार्यकर्त्यांना त्यांनी अटक केली. त्यात अवामी लीगच्या महिला खासदार बेगम मुस्ताफा होत्या. बेगम मुस्ताफांच्या घराच्या झडतीत त्यांनी नातलगांना लिहिलेले एक पत्र मिळाले. साठेबाजीविरुद्ध लष्कराने मोहीम सुरू केली आहे. तेव्हा तुम्ही आता पांगा व साठे दडवून ठेवा असा इशारा त्यात दिलेला होता.

हे प्रकरण दडपून टाकण्याचा प्रयत्न होत आहे असे दिसताच मेजर दलील संतापले. ते काही अधिकाऱ्यांसह डाक्क्यास गेले व आपल्याजवळचे बेगम मुस्ताफांचे पत्र त्यांनी 'इत्तेफाक' या प्रमुख बंगाली दैनिकाच्या संपादकांना दिले. त्यांनी ते प्रसिद्ध केले. इत्तेफाक त्या वेळी सरकारविरोधी पण स्वतंत्र मताचे वृत्तपत्र होते. ही बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर बेगम मुस्ताफा व आणखी एका खासदाराचे पक्षाचे सभासदत्व स्थगित करण्यात आले; पण काही महिन्यांनंतर त्यांना पक्षात पुन: घेण्यात आले. चोरटा व्यापार विरोधी मोहीम दोन आठवड्यांतच मागे घेण्यात आली. या व्यापारात हात गुंतलेल्या अवामी लीगनेत्यांचे मुजीबवर दडपण आले व मुजीब त्यापुढे नमल्याचे पाहून लष्करी अधिकाऱ्यांचा व रक्खीवाहिनीच्या अधिकाऱ्यांचा भ्रमनिरास झाला.

पण प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. मेजर दलील व त्यांच्या काही सहकाऱ्यांचा गेल्या उन्हाळयात गाझी गुलाम मुस्ताफा यांच्याशी झगडा झाला. गाझी बांगला देश रेड क्रॉसचे प्रमुख, डाक्का आवामी लीगचे अध्यक्ष व मुजीब यांचे सहकारी होते. 'बांगला देशातील सर्वात भ्रष्ट माणूस' असे त्यांचे वर्णन युनोच्या एका अधिकाऱ्याने केले आहे. मुस्ताफांनी औषधे व इतर मदतसाहित्य विकून लाखो रुपयांची कमाई केली असा या अधिकाऱ्यांचा आरोप आहे. एवढे गंभीर आरोप असता मुस्ताफाविरुद्ध मुजीब यांनी कारवाई कशी केली नाही? मुस्ताफा सबंध डाक्का शहराचे दादा होते. त्यांच्या शब्दाशिवाय तेथील पान हलत नसे. आपल्या या वजनाच्या जोरावर निवडणुकीत डाक्का शहरात मुजीब यांच्या अवामी लीगला त्यांनी प्रचंड विजय मिळवून दिला होता. त्यांचा असा उपयोग होत असल्याने मुजीबनी त्यांच्या चोरट्या व्यापाराच्या व्यवहारांकडे दुर्लक्ष केले होते अशी मुजीब-विरोधकांची टीका आहे.

गेल्या जूनमध्ये डाक्क्यातील एका विवाहाच्या स्वागतसमारंभात दलीलची बेगम मुस्ताफा व त्यांच्या मुलाशी चांगलीच बाचाबाची झाली. बेगम व त्यांचा मुलगा संतापाने निघून गेले. या प्रकारानंतर गाझी अनेक मोटारीतून गुंडांना घेऊन आला. त्यांनी दलील व त्यांच्या पत्नीस फरपटत बाहेर नेले. दलीलना मारहाण केली आणि नंतर मोटारीतून मुजीबच्या घरी नेले. यानंतर काय घडले याबद्दल दोन हकीकती सांगितल्या जातात. एका हकीकतीप्रमाणे मुजीबनी गाझी मुस्ताफांना शांत केले व दलीलची मुक्तता केली तर दुसऱ्या हकीकतीप्रमाणे दलीलच्या

पृष्ठ २८ वर



# पीळ

' भाई, ह्या उतार वयात असे कार्यक्रम–सभा–व्याख्यानं ही दगदग कशाला करता तुम्ही ? निवान्तपणे थोडा आराम घ्यायचा पहा जरा ?'
अन् खरंच, भाई म्हातारे झाले होते. त्यांच्या डोईवर छानपैकी टक्कल पडले होते.

● महादेव मोरे ●

फार पूर्वीची आठवण–बारा–तेराचं माझं वय. शाळेजवळच 'लक्ष्मी सॉ–मिल' ही लाकूडवखार. दुपारची वेळ न् अचानक मिलला आग लागली. आसपासच्या लोकांप्रमाणे आम्ही पोरंही धावलो. भरभर रॉकेलचे डबे फोडले नि त्यातून जवळच असलेल्या विहिरीतील पाणी आणून आग विझवू लागलो. हां हां म्हणता विहिरीपासून मिलपर्यंत माणसांच्या दोन माळा तयार झाल्या...नगरपालिकेचीही गाडी आली. चार–पाच तास शेकडो लोकांचे श्रम खर्ची पडल्यावर अखेर आग विझली.

आणि मग काही दिवसांनी समजले–मिलचा विमा उतरविलेला होता अन् तिच्या मालकाने विमाकंपनीकडून दामदुप्पट नुकसानभरपाई उकळली !

आम्हांसारख्या अनेकांचे तळवे मात्र मधल्यामध्ये कापले होते–पाण्यासाठी वापरलेल्या डबड्यांच्या धारदार काठाळ्यांनी !

या मिलचे मालक म्हणजेच 'भाई.' ह्या नावानंच सारं गाव त्यांना ओळखे.

व्यवहारचातुर्यामुळे असेल किंवा अन्यही काही कारणांमुळे असेल, भाईंचा जम बसत गेला. वाढला. पैसाही साठला. त्यालाही अनेक फाटे फुटले–फियाटकार, नवी ट्रक, साठसत्तर एकर शेतीखरेदी, त्यात नवीन विहिरी. आजवर भाड्याच्या घरात दिवस घालविलेले; पण आता प्रशस्त प्लॉटची खरेदी केली गेली. लगोलग त्यावर टुमदार बंगलाही उठविला; मग चौफेर बगीचाही आला.

स्वकर्तृत्वाने भाईंनी अशी आपली उन्नती करून घेतली. श्रीमंतीमागोमाग प्रतिष्ठा आपसूक येणं तर अपरिहार्य; पण श्रीमंतांच्याही दोन जाती असतात. फक्त पैसा न् पैसाच कमविणे; त्याच्यापलीकडे काहीही न पहाणे–ही एक; अन् दुसरी म्हणजे–पैसा मिळविण्याबरोबरच सामाजिक–राजकीय कार्यातही भाग घेणे.

भाई ह्या दुसऱ्या जातीतील. त्यामुळेच मागासलेल्या जमातीसाठी काढलेल्या एका प्राथमिक शाळेचे ते चेअरमनही झाले होते आणि आपलेपणाने त्या शाळेच्या उसाभरीत भाग घेत होते. कुणीही गरीब विद्यार्थी मदतीसाठी त्यांच्याकडे गेल्यास त्याला विन्मुख होऊन परतावे लागत नसे.

अशा स्वभावामुळेच रंगा चौगुलेस भाईंनी

जवळ केलं. रंगा माझा बालमित्र व वर्गमित्रही. कॉलेजच्या पहिल्या वर्षात शिकत असलेला. दणकट बांध्याचा. फुटबॉल–चॅम्पिअन म्हणून ओळखला जाणारा...हायस्कूलमध्ये शिकत असताना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सक्रीय भाग घेणारं आम्हा सात-आठ विद्यार्थ्यांचं जे टोळकं होतं, त्यात रंगाही एक होता...ह्या रंगाला भाई शिक्षणासाठी मदत करीत. लागेल ती. वाटेल ती. रंगा वॉर्ड नं. ५ मध्ये रहाणारा. ह्या वॉर्डाला दुभागत एक मेनरोड गेलेला. त्या रोडवर पूर्वेकडे तोंड करून राधाकृष्णाचं छोटं देऊळ होतं. रंगाच्या मदतीनं भाईंनी एके दिवशी सायंकाळी ह्या देवळापुढे वॉर्ड नं. ५ मधील नागरिकांची सभा घेतली. अशा सभा भरविणं, व्याख्यानं देणं, ह्याचा तर भाईंना भलता सोस. भाईंचं व्याख्यान श्राव्यपेक्षा दृश्यच जास्त होई. व्याख्यानाच्या वेळी त्यांचे हातवारे प्रेक्षणीय असत. तलवारीसारखे ते हात सारखे लवलवत, केव्हा आपल्या ओठांवरून, केव्हा नाक खाजविण्याच्या निमित्तानं नाकावरून, केव्हा डोईवरून, केव्हा हनुवटीवरून असे सारखे चालू. भाईंचे हातवारे लोकांना इतके परिचित होते की, ते सुरू होताच त्यांचे चेहरे मिस्किल होत. मग तर बोलण्याच्या वेगापेक्षा ह्या हातवाऱ्यांचा वेग वाढत जाई अन् श्रोत्यांच्या चेहऱ्यांवर हास्याच्या मंद–मंद लाटा उठू–विरू लागत...वॉर्ड नं. ५ मधील त्या सभेतही भाईंनी 'वाचनालय व त्याचा समाजाला उपयोग' ह्या विषयावर असेच आपले प्रसिद्ध हातवारे करीत व्याख्यान दिले. मग, शाळकरी पोराने घरी पाठांतर करून आलेले भाषण वादविवादाच्या सभेत ठोकावे, तशा ठेक्यात रंगाचेही भाषण झाले ...आणि दुसऱ्या दिवसापासून त्या राधाकृष्णाच्या देवळात, पुढील ओटचावर, सार्वजनिक वाचनालय सुरू झाले. वाचनालयात जिल्हापत्रांप्रमाणेच पुण्या–मुंबईची दैनिकंही येत. वाचनालयासाठी भाईंनी चार–पाच उभे स्टॅण्ड करून दिलेले, त्यांवर दैनिकं लावली जात; पण दैनिकांचा वाचनापेक्षा रद्दीसाठीच जास्त चांगला उपयोग होऊ शकतो, असा काही तरी लोकांनी सोइस्कर गैरसमज करून घेतला असावा. कारण वाचनालयातील दैनिकं दुपारपर्यंत कशी तरी तग धरून स्टॅण्डवर रहात, पण दुपार ओसरेल तशी त्यांनाही ओहटी लागे आणि रात्रीचे सात–आठला दैनिकं गोळा करायला गेलेला भाईंचा नोकर हात हलवीत तसाच परत येई !

हे असे होऊ लागल्यावर भाईंनी हा सारा खटाटोप बंदच करून टाकला. देवळातील सारी स्टॅण्डस् आपल्या मिलमध्ये आणून टाकली.

लोक म्हणत, नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीवर डोळा ठेवून भाई अशा हालचाली करीत आहेत. वाचनालय काढण्यामागे भाईंचा असाच डाव. त्यांच्या सॉ–मिलमध्ये सारी दैनिकं येतच. दिवसभरच्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना ती वाचावयास मिळत नसत, रात्री जेवणानंतर ती सारी मग ते चाळीत. तेव्हा दिवसभर ती तशीच पडून रहाण्यापेक्षा चार लोक वाचू देत; तेवढेच जरा वातावरण तयार होईल...तर अशा हिशेबाने, भावी इलेक्शनवर डोळा ठेवून भाई रंगासारखी बाहुली नाचविताहेत. कारण पाचव्या वॉर्डातून त्यांना स्वतःला उभं रहावयाचं आहे.

आणि लोकांचा अंदाज थोड्याबहुत फरकानं खराही ठरला ! निवडणुकीत भाई स्वतः उभे राहिले नाहीत, तर त्यांनी आपली तीन प्यादी उभी केली. अर्थात त्या तिघात एक रंगाही होता. निवडणुकीस भाई स्वतः उभे राहिले नाहीत, ह्याचंही उत्तर लोकांकडे होतंच–गावातील नगरपालिका ही शेठ जयपुरीया यांची जणू खाजगी मालमत्ता...शेठ जयपुरीया गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत विजयी होऊन काँग्रेसचे आमदार झाल्यापासून ते स्वतः नगरपालिकेच्या निवडणुकीस उभे रहात नसत; तरीही नगरपालिकेत त्यांचेच वर्चस्व असे.

ते नगराध्यक्ष असताना त्यांच्या पॅनेलमध्ये जे लोक होते, तेच प्रत्येक वॉर्डातून निवडून येत. विरुद्ध बाजूचे सारे उमेदवार पडले वा पाडले जात ! शेठ जयपुरीयांच्या कंपूला नगरपालिका म्हणजे यथेच्छ चरायचं कुरणच...तेव्हा ह्या कंपूशाही विरुद्ध टक्कर देण्यासाठी भाईंचा हा एक प्रयत्न...पण भाई स्वतःच खुल्या मैदानात का येत नव्हते ? शेठ जयपुरीयांमुळे भाई उभे राहायला धजावत नव्हते, असे कारण सांगून लोक जुना इतिहास उगाळीत राहत; 'लक्ष्मी सॉ-मिल' स्थापन झाली तेव्हा भाई व शेठ जयपुरीया ह्यांची तीत भागीदारी. जयपुरीयांचे भांडवल, भाईंचा अनुभव; मिल चांगलीच जोरात चालली, तसे भाईंनी जयपुरीयांना उडविले. तेव्हा दोघात मिलच्या मालकी हक्कासंबंधाने खटला सुरू झाला आणि तो भाईंनी जिंकला ! उभ्या आयुष्यात कसल्याही बाबतीत पराभव ठाऊक नसलेले जयपुरीया ह्या खटल्यापासून भाईंना पाण्यात पाहू लागले होते; तेव्हा भाई उभे राहिले असते तर त्यांना पाडण्यासाठी जयपुरीयांनी आपली सारी ताकद न् प्रतिष्ठा पणास लावली असती; म्हणून तर...लोक चर्चा करीत...

निवडणुका झाल्या, अन् नेहमीप्रमाणे शेठ जयपुरीया ह्यांचंच पॅनेल निवडून आले. भाईंची प्यादी अर्थातच पडली. हे असेच होणार होते. जयपुरीया आहेत तोवर नवीन रक्ताला नगरपालिकेत शिरकाव नाही. भाईंनी उगीच ऊर-फोड करून घेतली, व्यर्थ पैसा दवडला . शेठ जयपुरीया न् कंपू म्हणजे एक पोलादी भिंत आहे, तिच्यावर डोके आपटून काय होणार ? लोक बोलत...

ही भिंत उखडून टाकण्यासाठी भाई प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. समाजाच्या अगदी खालच्या थरात मिसळून कार्यकर्ते तयार करीत होते. शाळा–कॉलेजाच्या विद्यार्थ्यांत हे लोण पोहोचवीत होते; पण दुर्दैवाने, त्यांनी तयार केलेली कार्यकर्त्या विद्यार्थ्यांची तुकडीच्या तुकडी आपले शिक्षण संपल्यावर नोकरी वगैरेच्या निमित्ताने बाहेरगावी विखुरली जाई आणि भाई परत एकटे पडत. मग पहिल्यापासून पूर्वीच्याच चिकाटीने परत प्रयत्नांना सुरुवात होई...असे चाललेले ! केव्हाही पाहावे, भाईंच्या आजूबाजूस पाच-सात विद्यार्थी घोटाळताहेत, नि भाई त्यांना कुठल्याशा कार्यासंबंधी फार-फार जिव्हाळ्याने व पोटतिडकीनेही काही सांगताहेत, असे दृश्य दिसे.

भाईंनी ट्रक विकत घेतल्यापासून रंगा चौगुलेचे वडील त्या ट्रकवर ड्रायव्हर होते. बॉम्बे-बेंगलोर लाइनवर ट्रक फिरे. ट्रक फिरवून तीत गुंतलेले भांडवल मोकळे झाले की, ट्रकमध्ये रंगाच्या वडिलांची निम्मी वाटणी सुरू, अशा प्रकारचे बोलणे झालेले. त्याच वर्षी रंगा बी. ए. झाला; अन् एका तालुक्याच्या गावी मास्तरकी करीत हायस्कूल-

मध्ये पाटचा टाकू लागला. भाईंच्या उपकाराच्या ओझ्यामुळे असेल, वर्षअखेरच्या हायस्कूलमधील स्नेहसंमेलनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून त्याने भाईंना त्या गावी नेले. स्वतःबरोबर फोटोग्राफर वगैरे घेऊन भाईही गेले अन् व्याख्यान ठोकून, फोटो वगैरे काढून घेऊन कृतकृत्य होतात्से परतले...रंगाही गावी आल्यावर भाईंना भेटून जात होता... असे चाललेले...आणि मग काय बिनसले कोणास ठाऊक, रंगाच्या वडिलांना भाईंनी नोकरीवरून दूर केले. ट्रकचे आता सर्व हप्ते फिटत आलेले, तेव्हा रंगाचे वडील वाटणीचा प्रश्न उपस्थित करणार, म्हणून वेळीच त्यांना असे हाकून दिले... अर्थात् वाटणीसंबंधाने सर्व काही भाईंच्यावरील गाढ विश्वासापोटी तोंडीच झाले असल्याने रंगाच्या वडिलांनाही दातओठ चावीत मुकाट बसावे लागले...हे समजताच आपल्या बलदंड भावांना घेऊन भाईंना मारण्यासाठी रंगा मिलमध्ये घुसला होता; पण भाई आदल्याच दिवशी कसलेसे काम काढून दूरच्या गावी निघून गेले होते ! त्यामुळे त्यांच्या अपरोक्ष शिव्या न् धमक्या देऊन रंगा परतला होता...भाईंच्या मदतीने पुढे आलेल्या रंगानेही उलटावे, म्हणजे ह्या प्रकरणात भाईंचेही हात तेवढे स्वच्छ नक्कीच नव्हते...कुणी पृच्छा केल्यास भाई सहज सांगत—अरे वाटणी ! कसली वाटणी ? त्याच्या बापाला वाटणीत सामील करून घेण्यासाठी माझ्याकडे तेवढा पैसा नव्हता का ? दोन-चार ट्रक्स सहज खरेदी केल्या असत्या मी स्वतः ! केवळ ड्रायव्हर म्हणून त्याचा बाप होता. तरीही मी त्याला ड्रायव्हर म्हणून कधी वागविले नाही. पगार नव्हे तर प्रत्येक दिवाळीला पाचसहा हजार रुपये जादा मी त्याला देई. मुंबईला लग्न झालेल्या त्याच्या मुलीचा सारा लग्नखर्च मी केला आहे...इतके सारे आपुलकीने करूनही ह्यांना ट्रकमध्ये भागीदारीची हाव सुटली. तीही मी पुरी करावी ? हा कुठला न्याय ?

रंगानंतर भाईंनी सूर्यकांत सावळेला जवळ केले. भाईंच्या पाठिंब्यावर गरिबीत धडपडणारा सूर्यकांत भरभर परीक्षा पास होत गेला. बी. ए. बी. कॉम् झाला. हायस्कूलमध्ये आमच्यानंतर जी पिढी तयार झाली, तीत तो प्रामुख्याने चमकायचा. हायस्कूल व नंतर कॉलेजमध्येही तो जी. एस्. म्हणून निवडून आला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही त्याने थोडाबहुत भाग घेतला होता...

कोजागरी पौर्णिमेचा दिवस. भाईंचा नोकर हाती आमंत्रणाची वही घेऊन शहरभर फिरत होता. भाईंनी तयार केलेल्या यादीनुसार तो सर्वांच्याकडे गेला. माझ्याकडेही आला. त्याने वही दाखविली—' आज रात्रौ आमच्या घरी कोजागरी पौर्णिमा साजरी करावयाचे ठरविले आहे, तरी आपण उपस्थित राहून कार्यक्रमाला शोभा आणावी. कळावे, आ—एम्. जे मेहता ' असं स्वतः भाईंनी वहीत लिहिलेलं आणि ते आमंत्रण ज्यांना पोहचलंय् त्यांच्या खाली सह्या घेण्यात आलेल्या...

रात्री नऊच्या सुमारास मी भाईंच्या घरी गेलो. अनेक आमंत्रित, अनेक व्यवसायातील, अनेक स्तरातील. विद्यार्थी, व्यापारी, शिक्षक, कार्यकर्ते, नगरपिते...सुरुवातीला सर्व प्रौढ, प्रतिष्ठित माणसे चिवडा झोडून व वेलदोडे घातलेला मघाळ चहा पिऊन निघून गेली. उरलो केवळ आम्ही दहा-बारा जण तरुण. आल्यावर सर्वांनीच चिवडा-चहा झोडला होता; तरीही परत एकदा पुन्हा त्याची फैर झडली. मग गप्पांना सुरुवात झाली .. बाहेरील पौर्णिमेचं चांदणं खिडकीतून आत झिरपत असलेलं, अन् टेबलावर ठेवलेल्या रातराणीच्या घमघमाटाने वातावरणाला एक न्यारीच सुगंधी किनार लाभलेली. साऱ्यांची पोटं तृप्त झालेली, अन् हरएक विषयावर गप्पा झडत असलेल्या...देशापुढील समस्या, भोंदू पुढारी, सरकारचे धोरण, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन अशी वळणे घेत गप्पा गावच्या राजकारणावर आल्या; अन् मग भाई तळमळीने बोलू लागले. गावच्या नगरपालिकेत काही ठराविक लोक निवडून येण्याची अनिष्ट रूढी कशी आहे, ती का मोडायला हवी, अन् ही रूढी मोडण्यासाठी आपण आजवर कसे प्रयत्न केले, ह्याचाही पाढा भाईंनी वाचला. एका एकांड्या, एकाकी सैनिकाने दिलेल्या झुंजीची ती कहाणी. भाई एक करायला गेले की बेक व्हायचे. काही चांगले करू म्हटले की, ऐन वेळी त्यांचे पाय ओढले जायचे; हे असे आजवर झालेले.

आजवर अंधुक, धूसर असलेले भाईंचे व्यक्तिमत्त्व त्या वेळी बरेच स्पष्ट होत गेलेसे वाटले.

सार्वत्रिक निवडणुका आल्या आणि भाईंनी पुन्हा कंबर कसली. समितीतर्फे तिकीट मिळविण्यासाठी खटपट सुरू केली. समितीचा अधिकृत उमेदवार ठरविण्याची मुदत पंधरा दिवस पुढे असतानाच भाईंनी आपणास अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी आपल्या माणसांना आजुबाजूंच्या खेड्यांवर धाडले. समितीतर्फे ठरायिक गोटातील व्यक्तींनाच प्रत्येक निवडणुकीत कसं उभं केलं जातं, अन् ही रूढी मोडण्यासाठी भाईंना तिकीट मिळणं कसं आवश्यक आहे. वगैरे प्रचार. खेड्यापाड्यांवरील धुरळा—फुपाटा उडवीत भाईंच्या गाड्या फिरल्या. प्रचार चांगला झाला, आजूबाजूचं वातावरण आपणास अनुकूल होऊन आपण निम्मी लढाई जिंकली, अशा कल्पनेत भाई राहिले. पण शेठ जयपुरीसाठी काही गप्प नव्हते. भाईंच्या सर्व हालचालींकडे त्यांची सूक्ष्म नजर होतीच. त्यांनी भाईंच्या ह्या डावास प्रतिडाव टाकून त्यांच्या साऱ्या प्रयत्नांवर पाणी टाकले. जयपुरी यांनी डॉ. देशपांडे ह्या लोकप्रिय व्यक्तीस पुढे केले, अन् त्यांच्या सोबत गावातील आणखी दोघा मातब्बर व्यक्तींस समितीकडे तिकिटांसाठी अर्ज भरावयास लावले... मीटिंगच्या वेळी होतो तसा मग घोळम घोळ झाला. सर्वांनी डॉ. देशपांडेंना पाठिंबा द्यायचा, त्यासाठी त्या दोघा मातब्बरांनी आपले अर्ज मागे घेण्याची तयारी दाखवायची नि ह्या देखाव्याचे दडपण भाईंवर आणून त्यांनाही आपला अर्ज मागे घेण्यास भाग पाडावयाचे; आणि सर्वानुमते डॉ. देशपांड्यांना समितीचा अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करावयाचे. अर्थात् शेठ जयपुरी यांच्या अशा मुरब्बी आडाख्यानुसारच मीटिंगमध्ये पाऊले पडली. भाईंना आपला अर्ज मागे घेऊन डॉ. देशपांड्यांना पाठिंबा द्यावा लागला, नि मग समितीचा भगवा ध्वज लावून भाईंची कार प्रचारार्थ खेड्यापाड्यांवर फिरू लागली...शेठ जयपुरीया स्वतः मीटिंगला हजर नव्हते; पण त्यांच्या अदृश्य हातांनी मिटींगची सारी सूत्रे हलविली

गेली अन् भाईंना असे पराभूत करून टाकले होते !

भाईंची निष्ठा खरी असेल; तळमळ सच्ची असेल; पण कुठं तरी काही तरी चुकत होतं अन् भाईंनाही ते समजून येत नव्हतं... वास्तविक–कौटुंबिक जीवनात भाई सुखी न् फार–फार समाधानीही होते. रूपवान गृहलक्ष्मी, मुळगांवकरांच्या चित्रातल्यासारखी देखणी व गोरीपान मुले...खरे तर ह्या सुखी प्रपंच व मिलचा वाढता व्याप ह्यातच भाई रमून–बुडून जायला हवे होते...पण त्यांच्या स्वभावातील पीळ...तो जिथे–तिथे डोके वर काढून नव्या व्यथा–विवंचना उरावर ठेवीत होता.

भाईंच्या उदार आश्रयाखाली वाढलेल्या सूर्यकान्त साबळेने आता जिल्ह्याच्या गावी एक सोसायटी स्थापन केली होती आणि ह्या सोसायटीमुळेच त्याचे व भाईंचे फाटले होते...एका भेटीत भाईंनी आपली व्यथा बोलून दाखविली,

'ह्याला त्या सोसायटीच्या कामाची काही माहिती वगैरे नाही, तरीही ह्याने हे नस्ते धंदे का करावेत, समजत नाही ! माझे म्हणणे होते, ' तुला चांगली नोकरी लावून देतो, ती कर, नीट संसाराला लाग. ' पण ह्याचे काही वेगळेच ! सोसायटीला असा माझा विरोध असल्याचे पाहून तो येथे आल्यावर मला भेटतही नाही आता ! पूर्वी येई तेव्हा माझी भेट घेतल्याशिवाय जात नसे आणि आता पहा...! माझे दुर्दैव हे की, मी तयार केलेली माणसे अशी मोठी झाल्यावर माझ्यावरच उलटतात !'

पुढे मग साबळेने त्या जिल्ह्याच्या गावी 'यूथ काँग्रेस' स्थापन केली होती. मग जिल्हा परिषदेच्या निवडणुका आल्या तेव्हा तरुण रक्ताला काँग्रेसमध्ये वाव देण्यासाठी ह्या यूथ काँग्रेसमधील तरुणांनाच विशेषकरून तिकिटे देण्यात आली. अर्थात् साबळेलाही तिकीट मिळाले आणि तो आपल्या जन्मगावच्या मतदारसंघातून उभा राहिला. सोसायटीच्या वेळचे मतभेद विसरून त्याच्या प्रचारार्थ भाईही धावले. साबळेच्या विरुद्ध समितीचा उमेदवार होता. काही महिन्यांपूर्वीच भगवा ध्वज लावून समितीचा प्रचार करणारी भाईंची गाडी आता काँग्रेसपक्षाचे निशाण फडकावीत खेड्यापाड्यांतून फिरू लागली !

ह्या विपरीत दृश्याने भाईंबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल थोडाबहुत आदर असलेल्या लोकांनी आपल्या कपाळावर हात मारून घेतले ! एखाद्या सरड्याप्रमाणे परिस्थितीनुसार असे रंग बदलणे हे भाईंच्या स्वभावातच होते का ? भाईंचा मुंबईला असलेला थोरला भाऊ प्रजासमाजवादीपक्षात होता; पण मधल्या अवधीत मंत्रिपदाच्या आमिषाने काँग्रेसवाल्यांनी त्याला आपल्या कळपात ओढले होते. भावाचे असे हे होकायंत्र काँग्रेसकडे फिरल्यावर भाईही त्याच दिशेने गेले !

ह्या एकाच घटनेमुळे भाई लोकांच्या मनातून उतरले. पार उतरले आणि भाईंनी आपल्या प्रचाराने गाजवून प्रतिष्ठेने बनविलेल्या निवडणुकीत भाईंचा साबळे प्रचंड मतांनी पराभूत झाला, तेव्हा भाईंचेच नाक तळापासून कापल्यासारखे झाले. जणू खुद्द साबळे नव्हे तर भाईच पराभूत झाले होते !

वाटले, भाई स्वतःच्याच हातांनी स्वतःसाठीच एक खड्डा खणताहेत, अन् मग एके दिवशी त्या खड्ड्यात स्वतःच स्वतःला गाडून घेणार आहेत !

मध्ये एका मोटारअपघातात साबळेचं निधन झालं. मागे विधवा बायको, एक मुलगा, वृद्ध आई. मोठमोठ्या काँग्रेस पुढाऱ्यांच्या सह्यानं एक पत्रक काढून भाईंनी कै. साबळेच्या निराधार कुटुंबियांसाठी एक निधी जमा करण्याचा प्रयत्न केला. देवराम भांबुर्डीकर ह्या साबळेच्या वाङ्मयप्रेमी मित्राचे सहाय्य घेऊन एक स्मरणिकाही प्रसिद्ध केली. ह्या निमित्ताने देवरामने व भाईंने स्वतःच्याच प्रसिद्धीच्या टिमक्या वाजविल्या, अन् ती स्मरणिका ज्याच्या स्मरणार्थ काढली होती त्या कै. साबळेचं चरित्र मात्र तीत अंग चोरून अनाहूत परकेपणानं उभं होतं ! ह्या स्मरणिकेत भाईंनी साबळेवर एक लेख लिहिला होता; त्यांत त्यांनी बेचाळीसच्या आंदोलनात मी यंव् केलं न् त्यंव् केलं, अशी लांबण लावीत स्वतःचंच चरित्र सांगितलं होतं नि शेवटच्या तीन–चार परिच्छेदांत केवळ नाइलाजाने लिहिल्यासारखे साबळेविषयी चार




शब्द लिहिले होते. ह्या लेखाने भाई आणखी एकदा गावभर चर्चेचा विषय झाले...

भाईंच्या मळ्याजवळ शिवापूरवाडी हे खेडेगाव होतं, तेथे खेडुतांना स्वस्त धान्य देण्यासाठी भाईंनी एक सोसायटी स्थापन करून रेशनदुकानही काढलं...पण दुकानासाठी मंजूर झालेला कोठा परस्पर बॉण्ड्रीपलीकडील महाराष्ट्रात विकला जात असल्याची आवई होती...बॉण्ड्रीवर एकदा सोसायटीचा ट्रकही पकडला न् ते प्रकरण मधल्यामध्ये दाबून टाकण्यात आलं...

त्यात कुणाचं काहीच अंग नाही म्हटलं तर अशा आवई तरी कशा उठविल्या जातात ह्या प्रश्नाला समाधानकारक काहीच उत्तर मिळत नव्हतं...

भाई आता म्हातारे होऊ लागले होते, आणि आयुष्यभर जे काही थोडंफार चांगलं समाजकार्य करून त्यांनी थोडं नाव मिळविलं होतं; त्यावर स्वतःच असा बोळा फिरवीत पुढे चालले होते...कळत-नकळत भाईंचा असा नैतिक अधःपात होत होता... आम्हां परिचितांमधील व त्यांच्यामधील दरी अशी वाढतच होती...

एके रात्री भाईंच्या सॉ-मिलला, पूर्वीसारखी परत एकदा आग लागली... जिल्ह्याच्या गावाहूनही फायर ब्रिगेडच्या मोटारी आल्या, न् पाच-सहा तास झोंबी देऊन आग विझविण्यात आली...ह्या वेळीही भाईंना विम्याचे दामदुप्पट पैसे मिळतात काय, हे काय गौडबंगाल आहे! खरोखरीच आग लागते, की लावली जाते?

...असे पैसे उकळण्यासाठी एकाहून एक नामांकित मार्ग काढता येतात... ते काही जरी असले तरी ह्या आगीमुळे भाईंच्या चारित्र्यावर आणखी एक डाग पडला. पूर्वीच्या डागात हीही आणखी भर पडली.

भाईंचा मंत्री असलेला भाऊ आपल्या गावगन्ना सभातून अलीकडे सवर्णांकडून दलितांवर होत असलेल्या अत्याचारांचा निषेध करीत फिरत असे अन् इकडे भाई आपल्या बंगल्याभोंवती असलेल्या बागेच्या मेंदीच्या कुंपणाच्या वाळलेल्या काटक्या गोळा करणाऱ्या दलित समाजातील डोंबारी न् गारुडी लोकांच्या स्त्रियांना पकडून आपल्या नोकरांकरवी बेदम मारहाण करीत होते...दलितसमाजातील मुलांसाठी शाळा सुरू करणारे भाई खरे, की दलित स्त्रियांवर अत्याचार करणारे भाई खरे? म्हणजे, समाजाला दाखवायचा त्यांचा एक मुखवटा होता अन् बागण्याचा दुसरा! खरोखरीच भाई असे सरड्याप्रमाणे वेळोवेळीं रंग बदलत होते! इतर किरकोळ बाबींत हजारोने खर्च करणारे भाई, कुंपणाच्या कडेला पडलेल्या काटक्या गोळा करणाऱ्या दलित स्त्रियांना गड्याकरवी मारहाण करतात, हें कसे पटावे? तरीही हे सत्य होतं; जेवढं माथ्यावरचं आभाळ न् पायाखालची धरती सत्य असते, तेवढं!

एकदां डोंबारी-मांगगारुड्याचीच स्त्री समजून भाईंनी आपल्या गड्याकरवी मराठा समाजातील एका वृद्ध स्त्रीस मारहाण केली. ती बिचारी गुरे घेऊन आपल्या शेताकडे चालली होती, अन् बागेच्या कुंपणामागील बोळकुंडीतून वासरू पलीकडे गेले होते, त्याला अडवायला-आवरायला चालली होती... बंगल्याच्या खिडकीजवळ भाई गड्याकडून डोक्याची मालीश करून घेत बसले होते, त्यांना ती वृद्धा दिसताच गड्याला त्यांनी फर्मावले,

'अरे, डोंबारीण आली पहा; पळ. धर. पळेल! पळ; सोडू नको.! दोन लगाव कानफाडात; चांगली अद्दल घडायला हवी!'

भाईंच्या अशा उत्तेजनाने गड्याला दुप्पट उत्साह संचारला...

अशा निरपराधी स्त्रीस मारलंय् म्हटल्यावर मराठे खवळून उठले. हां हां म्हणता दीड-दोनशेच्या जमावाने भाईंच्या बंगल्याला घेरलं...' गड्याला आमच्या ताब्यात द्या,' अशी मागणी होऊं लागली...बाहेरील रागरंग पाहून भाईंनी लगेच आपला रंग बदलला अन् त्या गड्याला आपण स्वतःच तडातड मारत बाहेर आणले. 'माफी माग-त्या बाईची! माफी माग!!' म्हणत आणखीन् मारू लागले...शेवटी त्या गड्याने त्या गरीब वृद्धेच्या पाया पडून माफी मागितली...त्या नाटकाने भोळसट मराठे शांत झाले...निघून गेले...

वास्तविक, चूक भाईंची. कारण गड्याला त्यांनीच भरीस घातलं होतं; तेव्हा स्वतः भाईंनी माफी मागणं सयुक्तिक ठरलं असतं; पण स्वतःच्या चुकीबद्दल गड्याला बळी देऊन भाईंनी संतापलेल्या जमावाला शांत केलं होतं! स्वतःची चामडी बचावली होती!

चाळीस-पन्नास हजार वस्तीच्या ह्या गावंढ्या गावात एक लेखकही होता; तर त्याच्या कुठल्याशा एका कृतीला कसलंसं पारितोषिक मिळालं, अन् ह्याबद्दल त्याचा घरगुती स्वरूपाचा सत्कार भाईंनी आपल्या अलीशान बंगल्यात आयोजित केला होता. गावातील काही ठराविक लोकांना आमंत्रण होतं. मलाही. भाईंच्या बुद्धिमत्तेचं कौतुक करीतच मी बंगल्याकडे निघालो. कारण त्या लेखकाने भाईंच्या राजकीय चारित्र्यावर अनेक वेळा टीका केली होती; जवळजवळ शत्रू मानावा, अशा माणसाचा भाई खुल्या दिलाने सत्कार करीत होते! आपण तर मानलंच! केवळ पैशावरच चरून अळीप्रमाणे पुष्ट जिणे जगणाऱ्या गावातील अनेक

लक्षाधीशांपेक्षा भाई किती तरी जिवंत न् वेगळे वाटत होते—त्यांच्या आजवरच्या गुण-दोषांसहही ! वाङ्मयाविषयी अतीव प्रेम, हाही भाईंचा एक वीक पॉइंट होता. अनेक नवी पुस्तके स्वतः विकत घेऊन ते वाचत...

सत्कारसमारंभ चालू झाला. काहीजण बोलले. भाईंचा मुलगा कुमारही बोलला. सध्याच्या भ्रष्टाचाराबद्दल तो पोटतिडकीने बोलत होता.

खुद्द भाईंच्या मुलाचे हे वक्तव्य ऐकून मी मनोमन चमकलो...भाई व मुलांच्यामध्येही एक दरी निर्माण झाली होती तर! स्वातंत्र्यापूर्वीची पिढी व स्वातंत्र्यानंतरची पिढी...आचार-विचारात—कृतीत—वक्तव्यात केवढा फरक ! समारंभानंतर फराळ. तेव्हा मी कुमारला विचारले,

'तसं नाही रामभाऊ, तुम्ही ज्याला सुख समजता, तेच आम्हाला सतत बोचत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या २७–२८ वर्षांत काहींनी इतका गडगंज पैसा कमाविला आहे की, त्यांच्या दोन-तीन पिढ्यांना तो पुरून उरेल ! अशांच्या मुलांना दिवसातून दोन-तीन वेळा खाण्यापलीकडं काही कामच उरत नाही आयुष्यभर...तर ह्यात माझ्यासारखी काही स्वतंत्र विचाराची मुलं असली म्हणजे ती अस्वस्थ होतात; बापकमाईवर जगण्या-पेक्षा आपण स्वतः काही धडपड करावीशी वाटते; ह्यासाठीच मी बाबा आमटयांच्या श्रमशिबिरातही जाऊन—राहून आलो आहे;

पुढल्या आठवड्यात बिहारलाही जाईन—जयप्रकाशजींच्या आंदोलनात सहभागी होण्या-साठी ! मला स्वतःला असं वाटतं की, आज-वर कॉंग्रेसनं काय किंवा ह्या अनेक विरोधी पक्षांनी काय, देशाचं जेवढं नुकसान केलं तेवढं बस्स झालं ! हे पक्ष न् त्यांचे पुढारी ह्यांना आपण एकदा अरबी समुद्रात नेऊन बुडवू आणि भ्रष्टाचाररहित, पक्षातीत अशी एक वेगळी लोकशाही भारतात आणू !'

...तर भाई, आयुष्यभर तुमच्यासारख्या पुढाऱ्यांनी जे राजकारण केलं, ते आता बस्स झालं; तुम्ही म्हातारे झालात भाई, दमलात आता; तेव्हा खांद्यावरील निशाण आणा इकडे; ते पेलण्यासाठी समर्थ पिढी आता भारतात तयार झाली आहे, केवळ बाहेरच नव्हे, तर खुद्द तुमच्याच घरात...भाईंच्या-जवळ हे सारं हृद्‌गत व्यक्त करावंसं वाटलं; पण काळ—वेळ पाहून बोलावं लागतं आणि ही तर तशी वेळ नव्हती.

फराळ वगैरे आटोपल्यावर सारे परतायला लागले......मीही भाईंचा निरोप घेताना म्हणालो,

'भाई, ह्या उतारवयात असे कार्यक्रम—सभा—व्याख्यानं ही दगदग कशाला करता तुम्ही ? निवान्तपणे थोडा आराम घ्यायचा पहा जरा !'

अन् खरंच, भाई म्हातारे झाले होते. त्यांच्या डोईवर छानपैकी टक्कल पडले होते, त्यांच्या गोऱ्यापान रंगाला ते शोभूनही दिसत होते. राजिनामा देऊन पक्षातील बंडखोर सभासद बाहेर पडावेत, तसे दातही पडले होते आणि चेहऱ्यावर सुरकुत्या आपलं जाळं विणू लागल्या होत्या...भाई खूपच थकले होते.

तरीही भाई तरुणाच्या उत्साहाने म्हणाले,

'असे कार्यक्रम, सभा—समेलनं ही तर वरचेवर हवीतच, रामभाऊ ! असे समाज-कारण—राजकारण हे हवेच, नाही तर सारं आयुष्य अळणी होऊन जाईल ! राजकारण खेळण्यात एक धुंदी असते, एक मस्ती असते रामभाऊ ! झुंजण्यात, लढण्यात, पराभवाने खचून न जाण्यात, विजयाने भान न सोड-ण्यात ! आणि हा पीळ तर माझ्या स्वभावाला जन्मापासून पडलेला आहे, जन्मभर त्याने माझी सोबत केलीय्, तेव्हा हा माझ्याबरो-बरच खतम होणार, रामभाऊ !' □ □



जखमी आणि अशक्त मुलांना काम करता येत नसे. त्यामुळे राहिलेल्या मुलांवर ती संपूर्ण जबाबदारी पडे. त्यातून समज-गैरसमज निर्माण होत; परंतु ते विकोपाला कधीच गेले नाहीत. त्यात नोगायराचा मृत्यू झाल्यामुळे, मुलांच्यात समजूतदारपणा आणि जबाबदारीची जाणीव वाढली. १७ नोव्हेंबरला पहिली तिघांची तुकडी चिलीच्या रोखानं निघाली. मार्गात विमानाचं तुटलेलं शेपूट सापडल्यामुळे त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यांच्या अंदाजाप्रमाणे दरी पश्चिमेकडे जात नव्हती. त्यामुळे त्यांना मागे वळावं लागलं. एक रात्र विमानाच्या शेपटात विश्रांति घेऊन ते विमानाकडे परतले. बॅटऱ्या सापडल्याची आनंददायक वार्ता मुलांना ऐकायला मिळाल्यामुळे ती निराश झाली नाहीत. जादा कपडे आणि सिगारेटचा साठाही भरपूर वाढला होता.


**मूळ लेखक : पियर्स पॉल रीड**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**
**लेखांक : सात**

: १ :

पहिल्या तुकडीनं फेअरचाइल्ड सोडलं, त्याच दिवशी मॅडेलॉन रोड्रिगेझ आणि एस्टेला पेरेझ या दोघी चिलीला पोचल्या. त्यांच्याबरोबर रॅफेलचे वडील रिकार्डो इचॅव्हेरन, मार्सेलोचा भाऊ जुआन आणि 'प्लूना' चा सर्वांत अनुभवी वैमानिक 'राऊल' हे देखील होते.

चि. जिरार्ड क्रॉयसेटची भविष्यवाणी खोटी पाडायचा चंग बांधून मॅडेलॉन आली होती. छत्तीस दिवसांपूर्वी त्या दोघींना आपली मुलं जिवंत असल्याची खात्री वाटत होती, ती अद्याप कायम होती. बाकीच्यांना फेअरचाइल्डचं नक्की झालं तरी काय हे जाणून घ्यायचं होतं.






१८ नोव्हेंबरला सर्वजण टॅल्का येथे पोचले. जवळपासच्या विभागात, एक विमान भाड्यानं घेऊन, त्यांनी पहिल्या दिवशी बऱ्याच फेऱ्या मारल्या. नंतर काही वाटाडे बरोबर घेऊन आणि घोड्यांवरूनच जवळून तपास करावा असं ठरून, त्याप्रमाणे ते निघाले. अरुंद पर्वत-मार्गावरून जाण्याचं खास प्रशिक्षण घोड्यांना दिलेलं होतं. खोल दऱ्यांमुळे डोळे फिरून जात. त्यांना ' व्हर्टिगो ' होऊ नये म्हणून डोळ्यांवर पट्ट्या बांधून घ्याव्या लागल्या. एक दिवसभराच्या मोहिमेनंतर त्यांना परतावं लागलं.

अशा रीतीनं शोध चालू ठेवून पावीजण २५ नोव्हेंबरला मॉन्टेव्हिडिओला परतले. श्री. पेझ व्हिलॅरो ब्राझीलकडे रवाना झाले होते. विमान बेपत्ता झाल्यानंतर प्रथम असा दिवस उगवला की चिलीमध्ये कोणीही शोध घेत नव्हता; पण टॅल्काभोवतीच्या पर्वतमय प्रदेशात हजारो पत्रकं विमानातून टाकण्यात आली होती. त्यात विमानाविषयी खरी माहिती देणाऱ्याला ३,००,००० एस्क्युडॉसचं बक्षीस जाहीर केलं होतं. त्याचा उपयोग होईल अशी आशा पालकांना वाटत होती. नाही तरी प्रार्थनेशिवाय आता त्यांच्या हातात काय होतं ?

' मला स्वतःला असं वाटतं की...... मुलं ठार झाली आहेत. ' या जिरार्डच्या संदेशानंतर त्याच्याशी संपर्क संपला होता. त्याच्या अंतर्ज्ञानाविषयी शंका असली तरी अद्याप मुलांच्या सुरक्षिततेविषयी बऱ्याच जणांना खात्री होती. अर्थातच त्यांनी चर्चकडे धाव घेतली. घराघरातून रात्री प्रार्थना होऊ लागल्या. साखरपुडा झालेल्या मुलींना आपले भावी नवरे सुखरूप परततील असा विश्वास वाटत होता.

ईश्वरी उपाययोजनेबरोबरच, विमानाला काय झालं असावं याचं स्पष्टीकरण मिळवण्याचा प्रयत्न रॉबर्टोची आई ' मेका ' करीत होती. तिनं असा अंदाज बांधला की कोणी तरी विमान पळवून नेऊन, पैशाच्या मागणीसाठी योग्य संधीची वाट पहात असावेत. द. चिलीमधेच कुठे तरी ते उतरलं असेल. इ. चिली आणि युरुग्वे या दोन्ही देशांत राजकीय अस्थैर्य असल्यामुळे शंकेला जागा होती. म्हणून वैमानिकांच्या राजकीय पार्श्वभूमीबद्दल चौकशी करण्यात आली; पण त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही.

एक डिसेंबरच्या वर्तमानपत्रात जाहीर झालं की, ' युरुग्वे एअर फोर्स, टिम्बिरिरिका ज्वालामुखीच्या आसपास शोध घेण्यासाठी लवकरच एक विमान धाडणार आहे. ' बातमी अनधिकृत होती; पण लगेच आयांच्या आशा उंचावल्या. वेळ न गमावता तसा शोध का सुरू करू नये अशी त्यांची रास्त अपेक्षा होती.

शेवटी ५ डिसेंबरला, ब्रिगेडिअर पेरेझ काल्डस यांना भेटायला पालकांचं एक शिष्टमंडळ गेलं. चिलीमध्ये तोपर्यंत काय काय प्रयत्न करण्यात आले याचा अहवाल त्यांना सादर करण्यात आला. ज्वालामुखीच्या परिसरात कसून शोध घ्यायला पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. वैयक्तिकरीत्या तसा प्रयत्न करणं कोणालाही शक्य नव्हतं.

सॅंटियागोहून नुकत्याच परतलेल्या साहाय्यक अधिकाऱ्याला ब्रिगेडर काल्डस यांनी बोलावून घेतलं. फेब्रुवारीपूर्वी काहीच हालचाल करणं शक्य नसल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या तीस वर्षांतील हिमवर्षावाचा उच्चांक त्या वर्षी मोडला होता. त्यात विमान पूर्णपणे बुडून जाणार आणि कोणीही बचावण्याचा संभवच नाही असं त्याचं मत होतं.

शिष्टमंडळानं हे सर्व ऐकून घेतलं. या वेळी शोध घेऊन काही फायदा होणार नाही हे मनोमन जाणूनही त्यांनी आपलं म्हणणं पुढे चालू ठेवलं. काल्डस नकार देऊ शकले नाहीत. उभं राहून ते म्हणाले, ' सद्गृहस्थहो, तुम्ही विनंती केल्याप्रमाणे युरुग्वे एअरफोर्सचं एक विमान तुमच्या मदतीला देण्यात येईल. '

आणि अखेरचा तपास जारी झाला.

¤

## : २ :

सी–४७ हे खास विमान फेअरचाइल्डच्या शोधाला निघणार हे ऐकून सर्वांना अत्यानंद झाला. मोहिमेत भाग घेण्यासाठी स्वयंसेवक म्हणून अनेक मुलांचे वडील तयार झाले. नोकरवर्गाखेरीज विमानात पाच जण जाऊ शकणार होते. त्यात श्री. पेझ यांचा समावेश असणं अगत्याचं होतं; पण ते अद्याप ब्राझीलहून परतले नव्हते. बाकी चार जणांची निवड झाली. एक रोड्रिगेझ एस्कालँडा आणि कॅनेसा, रॉय, निकोलिश या तीन मुलांचे वडील. त्याशिवाय मिथॉल, एबल, पेरेडो, व्हॅलेटा आणि अनेक कुटुंबांनी आर्थिक हातभार लावला. रॅफेल पॉन्स आपली रेडिओची जबाबदारी पार पाडत होताच.

पायलट मेजर टेरा यांच्या सहकार्यानं योजनेचे आराखडे तयार झाले. ८ डिसेंबरलाच श्री. पेझ परत आले. एअरफोर्सच्या विमान-दलाविषयी त्यांच्या मनात अविश्वास असूनही ते लगेच तयार झाले.

निघण्याची पूर्ण तयारी झाली. निकोलिश यांच्या प्रशस्त बंगल्यात १० डिसेंबरच्या दुपारी पालकांनी अखेरची सभा घेतली. दोन तज्ज्ञ वैमानिकांनाही पाचारण करण्यात आलं होतं. डॉ. सुरेको यांनी नकाशाच्या साहाय्यानं समजावून सांगितलं की विमान ज्वालामुखी आणि सॉसनीडो पर्वतांच्या दरम्यान कोसळलं असण्याची त्यांची खात्री होती. यावर कोणीच मतप्रदर्शन केलं नाही. संध्याकाळपर्यंत चर्चा चालू राहिली.

वॉल्टर हार्ले म्हणाले, 'ऐका. मी संपूर्ण अँडीज पर्वत पालथा घालणार आहे. मुलं सापडेपर्यंत मी इंच आणि इंच तपास करीन; पण तुम्ही सुद्धा एक गोष्ट ऐकून ठेवा! या खेपेला दुर्दैवानं अपयश आलं तर कटू सत्याचा तुम्ही स्वीकार केला पाहिजे. खोट्या अपेक्षा बाळगून जगण्यात नंतर काहीच अर्थ नाही.'

दुसऱ्या दिवशी, ११ डिसेंबरला, सकाळी सहा वाजता सी–४७ या विमानानं सँटियागोच्या दिशेनं उड्डाण केलं. मेजर टेरा, चार नोकरमंडळी आणि पाच पालक. त्यांना निरोप द्यायला, पहाट असूनही, बरेच लोक आले होते.

मिलिटरीचं विमान असल्यामुळे आतल्या सीटस् आरामशीर नव्हत्या. दोन आडव्या बाकांवर पाच मध्यमवयीन लोकांना बसावं लागलं. आवाजही खूप होत होता, तरीही त्यांची काहीच तक्रार नव्हती. कारण कित्येक दिवसांनंतर फेअरचाइल्डचा शोध सुरू होत होता. अँडीजच्या पर्वतशिखरावरून त्यांना जायचं होतं. विमानात पुरेशा ऑक्सिजनची आणि हवेचा दाब उंचीवर टिकवण्याची खास सोय होती. त्या दिवसाच्या वर्तमानपत्रात मोहिमेची माहिती झळकली होती.

अर्जेंटिनाचा किनारा दिसू लागला. ब्यूनोस आयर्सवरून विमान जाऊ लागताच श्री. पेझ वैमानिकाच्या केबिनकडे गेले.

'हॅलो, आजचं वर्तमानपत्र पाहिलं का? त्यात या विमानाचं खूप कौतुक केलंय्.'

'होय,' मेजर टेरा म्हणाला.

'तुमचं काय मत आहे?' श्री. पेझनी विचारलं.

'उत्तमच आहे.'

आपले भरदार खांदे श्री. पेझ यांनी किंचित उडवले.

वैमानिकानं ते पाहिलं असावं. तो म्हणाला, 'उदाहरणार्थ, एकदा दोनपैकी एक इंजिन नादुरुस्त झालं होतं तरीही मी एका विमान-तळावर सुरक्षितपणे–'

हे तो बोलत होता, तेवढ्यात विमानाला एक हिसका बसला अन् ते थडथडू लागलं. पेझनी मागे वळून पंखांकडे पाहिलं. एक इंजिन खरोखरच पुन्हा बंद पडलं होतं.

वैमानिकाकडे वळून ते म्हणाले, 'छान, परत तेच घडलं.'

या आणिबाणीमुळे त्यांना 'एल पालोमार' या मिलिटरी विमान-तळावर उतरावं लागलं. तिथून वैमानिकानं मॉन्टेव्हिडिओला नव्या इंजिनासाठी तार ठोकली; पण ते येईपर्यंत वाट बघायला पाचजण तयार नव्हते. एक छोटं विमान भाड्यानं घेऊन ते 'एझिना' तळा-पर्यंत जाऊन पोचले. तिथे सँटियागोकडे जाणारं नियोजित विमान मिळालं. सायंकाळी सात वाजता मुक्कामाला ते पोचले. लगेच 'लॉस सेरिलॉस'मधील एस. ए. आर. च्या मुख्य कार्यालयात मोटारीनं दाखल झाले.

'कोण, तुम्ही?' कमांडर मॅसा श्री. पेझना पाहून आश्चर्यानं म्हणाले, 'पुन्हा इथे आलात? या वेळी खरं म्हणजे शोध सुरूच करता येणार नाही. योग्य वेळी तुम्हाला कळवू असं मी सांगितलं नव्हतं का?'

कमांडरचं म्हणणं रास्तच होतं. अँडीजमधे विमान अदृश्य होणं ही अधूनमधून घडणारी घटना होतीच; पण दोन महिन्यांनंतर त्याच्या तपासासाठी धडपडावं ही वेगळी गोष्ट या वेळी घडत होती. १९६८ मधे कोसळलेल्या अमेरिकन एअरफोर्सच्या विमानाचा तपाससुद्धा इतके दिवस चालला होता आणि हे युरुग्वेचे सामान्य नागरिकही आकाशपाताळ एक करत होते.

'कमांडर, मला एक सांगा.' वॉल्टर हार्ले म्हणाले, 'पर्वतावर अडकलेलं किंवा बर्फावर उतरावं लागलेलं विमान सापडण्याची शक्यता किती?'

'नशिबानं हात दिला तरच हजारात दोन.'

'आम्हाला हजारात एक ही शक्यतासुद्धा पुरेशी आहे!'

त्यांचं बोलणं कमांडर मॅसा शांतपणे ऐकत होते; पण एस. ए. आर. कडून पालकांनी केलेली हेलिकॉप्टरची मागणी त्यांनी मंजूर केली नाही. 'तुमच्या लक्षात येत नाही.' ते म्हणाले, 'त्या प्रदेशात हेलिकॉप्टर उडवणं धोक्याचं आहे. नक्की कोणत्या जागी विमान कोसळलंय् हे जोवर ठाऊक नाही, तोवर माझ्या वैमानिकांचे जीव मी धोक्यात घालणार नाही. तुम्ही ती जागा सांगू शकत असाल तर मी अवश्य मदत करीन, अन्यथा...क्षमस्व!'

पाचीजण अर्धवट आश्वासन घेऊन हॉटेलमधे परतले; पण ते निराश झाले नाहीत. प्रवासाचा शीण अजूनही गेला नव्हता, तरीही लगेच पुढचा कार्यक्रम ठरवण्यासाठी ते बसले. एकेकट्यानं स्वतंत्रपणे निर-निराळ्या भागात शोध घ्यायचं त्यात ठरलं. सी–४७ विमान सँटि-यागोला पोचलं की आकाशातून आणि शिवाय पायीसुद्धा. एकजण, विमान कोसळताना पाहिल्याचा दावा करणाऱ्या इसमाला गाठणार होते. अशी अँडीजवर तिहेरी चढाईची योजना तयार झाली. त्याला त्यांनी नाव दिलं 'ऑपरेशन ख्रिस्मस्.' ◻

## : ३ :

दिनांक २३ नोव्हेंबर रोजी बॉबी फ्रँकॉईसचा एकविसावा वाढदिवस होता. म्हणून त्याच्या सोळा सहकाऱ्यांनी त्याला एक सिगारेटचं पाकिट खास भेट दिलं. त्याच वेळी कॅनेसा आणि पेरॅडो वैमानिकाच्या केबिनमधून रेडिओ सोडवून घेण्याचं काम करत होते.

मदतीला स्क्रूड्रायव्हर आणि दोन चाकू होते; पण उजेड नसल्यामुळे काम करणं अवघड जात होतं. शिवाय साठ-सत्तर तारा त्यातून बाहेर आल्या होत्या. त्या जोडणं आवश्यक होतं. फक्त 'इयरफोन' आणि 'मायक्रोफोन' विनासायास निघाले. बाकी इतक्या वस्तू तिथे पडल्या होत्या की कशाचा उपयोग करावा हेच समजत नव्हतं. अखेर डोकं चालवून ते काम कसंबसं पुरं केलं. तारांवर पुसट खुणा होत्या, त्यामुळे ते जमलं.

रेडिओच्याबाबत कॅनेसा अत्यंत उत्साही होता. पर्वतावर अडकून जीव गमावण्याची पाळी सर्वांवर आली होती, अशा वेळी वाट्टेल ती खटपट करणं जरुरीचं होतं. बाहेरच्या जगाशी संपर्क साधता आला तर उत्तमच. खूपजण त्याच्याशी सहमत होते. बाकीच्यांनी ती आशा सोडली होती. रेडिओबाबत जाणकार असलेल्या रॉयलाही शंकाच वाटत होती. शिवाय अशक्तपणामुळे तो मनातूनही पार खचला होता. शेपटापर्यंत जाऊन बॅटरीचा वापर करायचा होता. या कामासाठी त्यानं जावं असा सर्वांचा आग्रह होता; पण त्याचा आत्मविश्वासच ढासळला होता. 'तुमच्याइतकंच मला त्यातलं कळतं.' तो वारंवार म्हणे; पण नाकारणंही अशक्य होतं. 'तुला जायलाच पाहिजे!' बॉबी त्याला म्हणाला, 'कारण रेडिओ हीच आता सुटकेची एकमेव आशा आहे. तू, मी, कोच असल्या मुलांना इथून पायी बाहेर पडणं अशक्यच आहे—ते कधीच जमणार नाही.'

शेवटी रॉय नाखुषीनंच कसाबसा तयार झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता विमानाच्या शेपटाकडे निघण्यासाठी मुलं तयार झाली. पुढे व्हिजिंटिन, मधे खिशात हात घातलेला हार्ले आणि पाठीमागे कॅनेसा आणि पेरॅडो. सोबत रेडिओ आणि सामानाच्या पिशव्या.

त्यांना खाली उतरताना पाहून राहिलेल्या तेरा जणांना समाधान झालं. विमानात जागाही रिकामी झाली. मदत येण्याची अखंड आशा मनात होतीच.

पण स्वप्न पाहत नुसतं स्वस्थ बसून चालणार नव्हतं. पोटपूजेसाठी रोजचं काम करावंच लागणार होतं. मांसाचा पुरवठाही अपुरा होता. अर्थात मृत शरीरांचा तुटवडा नव्हता; पण आता बर्फामधे ती सापडत नव्हती. कारण ती खूप खोल गाडली गेली होती. एकदोनच हाताशी होती; पण पुढच्यासाठी आताच शोध घ्यावा लागणार होता.

म्हणून पेझ आणि अल्गोर्ताच्या नेतृत्वाखाली प्रेतांचं उत्खनन मुलांनी सुरू केलं. अंदाजानं बर्फात खड्डा खणला जाई. बऱ्याच वेळा तिथे काहीच मिळत नव्हतं. त्यातून बर्फ अत्यंत टणक झालेला. काम मोठं मुष्किल झालं होतं. शिवाय सगळीच मुलं अशक्त बनलेली. शेवटी एक प्रेत कसंबसं हाताला लागलं खरं; ते निघालं लिलियाना मिथॉलचं; पण जेव्हियरच्या भावनांचा विचार करून 'तिला' न खाण्याचा मुलांनी निर्णय घेतला.

खणलेल्या खड्डयांचा लघवीसाठी वापर केला जाई. काही काही वेळा त्यासाठी सकाळपर्यंत कळ काढणं असह्य होई. नाइलाजास्तव मग आतल्या आतच ते 'काम' उरकावं लागे.

डोक्याचा मेंदू खाण्यासाठी उपयोगी पडत नसल्यामुळे, धडाचा वापर करून डोकी एके ठिकाणी पुरून ठेवण्यात आली होती. इतरही फेकून दिलेल्या सांगाडयांचा शोध घेऊन, त्यातून मिळेल ते गुपचुप वापरण्यात येई. अल्गोर्ता त्यात तयार झाला होता. स्ट्राउचबंधू प्रेतांचा शोध घेण्यात दंग असताना, हा चरबीचे जुने तुकडे हुडकून काढी. उन्हात वाळवून त्यांचा उपयोग होई. असे तुकडेही आपापसात वाटले जात.

काम करणारांचे आणि स्वस्थ बसणाऱ्या मुलांचे असे दोन वर्ग पडले होते. इन्शार्ते दुसऱ्या वर्गात असूनही त्याच्या सरळ स्वभावामुळे किंवा स्ट्राउचबंधूंच्या मैत्रीमुळे त्याच्यावर रागावता येत नसे. तो नेहमी हसतमुख असे आणि इतरांनाही प्रसन्न ठेवी. तुर्कोटीप्रमाणे त्याचीही स्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली होती; दोघांनाही कच्चं मांस आवडत नसे. बऱ्याच वेळा इन्शार्तेची शुद्ध हरपे. गुंगीत तो काही तरी बडबडे. एक दिवस त्यानं जाहीर केलं की आज आपण मरणार! पण दुसऱ्या दिवशी सकाळी त्यानं डोळे उघडलेले पाहून सर्वांनी विचारलं, 'कसं काय, कोच; मेल्यावर कसं काय वाटतं?' तोही इतरांबरोबर हसू लागला.

सिगारेट्स, हे तणावाचं एक कारण होतं. आपला साठा पुरवून सिगारेटचा आस्वाद घेताना बाकीची 'उधळी' मुलं हेवा करीत, हे फिटोसारख्या मुलांनी अनेक वेळा पाहिलं होतं. आळशी आणि जखमी मुलं पहिल्या दिवशी जवळचा साठा फस्त करीत. मग उद्या. इन्शार्ते दुसऱ्या दिवशी पेद्रोला सिगारेटसाठी गळ घाली. 'मॉन्टेव्हिडिओला परतलो ना, की आमच्या काकांच्या घरी मी तुला मस्त मेजवानी देईन.' या आश्वासनाला पेद्रो बळी पडे. तसंच पँको सॅबेलाला पकडे. नाना गोष्टी ऐकवून एक-दोन पदरात पडतात का ते पाही. नाही तर पुढचा पुरवठा आगाऊच मागे. तो फर्नांडेझला म्हणे, 'असं पाहा, विशेषत: कोच आणि मी फारच भावनाप्रधान आहोत. प्लीज...'

पुढे पँको डेलगॅडोलाच सिगारेट्सचा ताबा मिळाला. म्हणजे चोराच्या हातात जमादारखान्याची किल्लीच की. एका रात्री हिमवादळाचा जोर वाढला. कडे कोसळण्याच्या भीतीनं बरेच जण धूम्रपान करत रात्रभर जागले. त्या रात्री खूपच सिगारेट्स खलास झाल्या.

वास्तवापासून दूर नेणारी काल्पनिक किंवा पूर्वायुष्यातील संभाषणं नेहमीच चालत; पण ज्या वेळी प्रत्येकजण रात्री एकटा पडे आणि विचार करू लागे तेव्हा त्याला प्रचंड यातना होत. विशेषत: दुर्बल मनाच्या मुलांवर त्याचा फारच परिणाम होई. त्यातल्या त्यात इन्शार्तेच्या मनावर. म्हणून स्ट्राऊचबंधूंनी तशा प्रकारच्या चर्चा बंद केल्या. डेलगॅडोला तसं बोलत बसायची फार सवय होती. मुलांचा त्याच्यावरील विश्वास अलीकडे उडत चालला होता.

एकदा काहीजण विमानाबाहेर बसले असताना विमानात असलेल्या मुलांना हाक मारून, त्यांच्या वाट्याचं 'जेवण' बाहेर मागवलं. पँको डेलगॅडोनं ते काम स्वीकारलं. फिटोजवळ जाऊन तो म्हणाला,

'मीसुद्धा आत्ता एक तुकडा घेऊ ना ?'

'अर्थातच.' फिटोनं परवानगी दिली.

'सगळयात चांगला घेतला तर चालेल ?' पँको.

'घे वाटलं तर.'

फिटो आणि दोनचार मुलं विमानाच्या टपावर बसून खात होती. खालच्या मुलांसाठी पँको मांस घेऊन गेला. थोड्या वेळानं डॅनियलनं फिटोला विचारलं, 'आज तू आम्हाला इतकं थोडं का खायला पाठवलंस ?'

'मी बारा तुकडे दिले होते.' फिटो म्हणाला.

'बारा कुठले, आठच तर होते. मला त्याचे आणखी भाग पाडावे लागले.'

फिटोनं खांदे उडवले. तो काहीच बोलला नाही. संशय व्यक्त करणं त्याच्या स्वभावाविरुद्ध होतं. प्रत्येकानं जबाबदारीनं वागलं पाहिजे, शिकवायची काय आवश्यकता, असं त्याचं मत होतं.

कार्लिटसला मात्र गप्प बसवलं नाही. 'मग काय भुतानं उचलून नेलं काय ?' पँकोकडे बघून तो म्हणाला, 'चार तुकडे गेले कुठे ?'

'तुझं म्हणणं तरी काय आहे ?' पँकोनं चिडून विचारलं, 'तुझा रोख माझ्या लक्षात आलाय्. माझ्यावर तुमचा इतका विश्वास नाही?'

त्यांच्यात अजूनही बाचाबाची झाली असती; पण डॅनियलनं कार्लिटसला चूप केलं. ती गोष्ट वाढवण्यात अर्थ नव्हता. ¤

## : ४ :

विमानात या घटना घडत असताना, तिकडे शेपटाच्या भागात रॉय हार्ले आणि मोहिमेतील तीन वीर पोचले. केवळ दीड तासात ते तिथे पोचले. वाटेत पेरॅडोच्या आईची सूटकेसही सापडली होती. त्यात बऱ्याच गोळ्या आणि कोकाकोलाच्या दोन बाटल्याही मिळाल्या.

राहिलेला दिवस त्यांनी तिथे आरामच केला. आसपास विखुरलेल्या बॅगाही पुन्हा तपासल्या. इतर काही वस्तूंबरोबरच एक फिल्म भरलेला कॅमेरा पेरॅडोला आढळला. शिवाय एका एअरबॅगमधे तीन रमच्या बाटल्याही जमा झाल्या. आश्चर्य म्हणजे त्या फुटल्या नव्हत्या. आनंदाच्या भरात एक बाटली तेव्हाच रिकामी झाली.

कॅनेसा आणि हार्ले दुसऱ्या दिवशी सकाळी रेडिओच्या मुख्य कामगिरीला लागले. आधी ते काम सोपं वाटत होतं; कारण ट्रान्समीटरच्या मागच्या बाजूला खुणा केलेल्या होत्या. त्यामुळे बॅटरीला वायर्स कशा जोडायच्या आणि 'अँटिना' कशी अडकवायची हे वरकरणी सुलभ दिसत होतं; पण इतरही काही वायर्स बाहेर आलेल्या होत्या. त्यांच्याविषयी अज्ञान होतंच. इतकंच काय त्यातल्या पॉझिटिव्ह कुठल्या आणि निगेटिव्ह कुठल्या, याचाही पत्ता नव्हता. त्या जोडल्यावर अनेक वेळा त्यांच्या डोळयांवर ठिणग्या उडाल्या.

व्हिजिंटिनला फेअरचाइल्डची मार्गदर्शिका बर्फात अचानक मिळाली. त्यामुळे सर्वांना यशाची खात्रीच वाटू लागली. त्यातल्या चौथ्या प्रकरणात 'कनेक्शन्स'वर बरीच माहिती दिली होती; पण याही खेपेला दुर्दैव आड आलंच. त्यातली काही पानं वादळात फाटून निघून गेली होती. त्यातच आवश्यक माहितीही 'उडून' गेली.

त्यामुळे अंदाजपंचे काम करण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता. काम जिकिरीचं होतं. ते चालू असताना राहिलेले दोघं मांस भाजण्याच्या उद्योगात गुंतले. सांगाड्यातल्या मुलांइतका त्यांच्यावरही ताण होताच; जोडीला जबाबदारी.

रॉय रेडिओ चालू करू शकला तरच त्याचा उपयोग होता. अन्यथा त्याला पायी मोहिमेत जावं लागणार नव्हतंच. म्हणून पेरॅडोनं त्याला गरजेपुरता मांसाचा तुकडा दिला. सिगारेट तर अजिबात दिली नाही. साहजिकच त्याला राग येणारच. लायटर फक्त एकच होता. त्याची आवश्यकता अखेरपर्यंत असल्यानं तसे निर्बंध अनिवार्य होते. त्यामुळे रॉय आणि तिघांच्यात किरकोळ बाचाबाचीही झाली. कॅनेसानं शेवटी प्रकरण थोपवलं. 'त्याच्याकडे लक्ष देऊ नका आणि त्याच्या मदतीनं रेडिओ सुरू झाला तर पर्यायानं सर्वांचे प्राण वाचणार आहेत, हेसुद्धा विसरू नका.'

तीन दिवसांत काहीच प्रगती होऊ शकली नाही. मांसाचा साठा अत्यंत अपुरा असल्यामुळे पेरॅडो आणि व्हिजिंटिननं विमानाची दिशा धरली. मागे सांगितल्याप्रमाणे दरीतून वर चढण हे उतरण्याच्या हजारपटींनी कष्टाचं काम होतं. अंतर संपता संपेना. विमान दृष्टिपथात येईना. सगळीकडे नुसतं बर्फच बर्फ. त्यात काही मोठे उंचवटे.

त्याच्या मनाला शंका चाटून गेली, विमानावर कडे तर कोसळले नसतील ना ? पण लगेच लक्षात आलं की नव्यानं हिमवर्षाव कुठेच झालेला दिसत नव्हता. थोडं पुढे गेल्यावर एका टेकडीपलीकडे एकदाचं ते दिसलं.

ते दोघं इतक्यात परततील ही अपेक्षा नसल्यामुळे मांस तयार नव्हतं. प्रेतांचा शोध घेण्यातही मुलांच्या शक्तीचा खूपच ऱ्हास झाला होता. मग पेरॅडो आणि व्हिजिंटिनच बर्फ खणायला बसले. सुदैवानं एक प्रेत थोड्याच अवधीत मिळालं. लगेच स्ट्राऊचबंधूंनी त्याचे नेहमीप्रमाणे तुकडे तयार केले. दोन रात्री विमानात घालवून दोघंजण पुन्हा शेपटाकडे निघाले.

परतेपर्यंत रॉय आणि कॅनेसानं रेडिओ 'तयार' केला होता. त्यांच्या समजुतीनुसार तरी त्यात काहीच दोष राहिला नव्हता; परंतु 'इयरफोन' कानाला लावून बराच वेळ झाला तरी कसलेच संदेश ऐकू येत नव्हते. अँटीनात काही दोष असावा हा विचार करून त्यांनी उंच खडकावर साठ फूट लांबीची एरिअल बसवली. एवढं झाल्यावर मात्र चिली, अर्जेंटिना आणि युरुग्वेतील अनेक रेडिओस्टेशन्स सुरू झाली; पण हवे ते संदेश देण्याचं किंवा घेण्याचं काम होतच नव्हतं. त्यामुळे कंटाळून थोडा वेळ कुठल्या तरी स्टेशनवरचं हलकं संगीत ते ऐकू लागले.

तेवढ्यात पेरॅडोची आरोळी तिघांच्या कानावर पडली. एका सूटकेसमधे त्याला लहान मुलाचा वाढदिवशी काढलेला फोटो सापडला होता. तो हातात घट्ट धरून त्याकडे पेरॅडो आधाशासारखा पाहू लागला. कारण त्यात एका टेबलावर अनेक खाद्यपदार्थ मांडलेले दिसत होते. त्या मेजवानीत बाकीचेही सामील झाले.

पोटावर हात फिरवीत कॅनेसा म्हणाला, काय झकास केक आहे रे ?'

'सँडविचेस तर बघ ?' पेरॅडो त्याला म्हणाला, 'मला वाटतं मी ती सँडविचेसच घेईन.'

'बिस्किटं,' व्हिजिटिन गुरगुरला. 'मला बिस्किटंसुद्धा चालतील.

रेडिओवरच्या बातम्यांमधून त्यांना हवी असलेली बहुमोल माहिती ऐकायला मिळाली. सी–४७ या युरुग्वेच्या विमानानं पुन्हा शोध केल्याचीच ती सुवार्ता. वेगवेगळ्या प्रकारानं तिचं स्वागत करण्यात आलं. हार्लेनं नाचून आनंदोत्साह साजरा केला. कॅनेसाला सुटकेचं समाधान झालं. व्हिजिटिननं काहीच प्रतिक्रिया दाखवली नाही, तर पेरॅडो उलटा निराशच झालेला दिसला. 'फार उड्या मारू नका,' त्यानं इतरांना बजावलं. 'ते पुन्हा शोध घेतायेत याचा अर्थ आपण त्यांना सापडूच असं नाही.'

तरीही त्यांनी असं ठरवलं की शेपटाजवळ एक मोठ्ठा क्रॉस काढावा. सूटकेसेचा वापर करून त्यांनी लगेच तसं केलंही. आतापावेतो त्यांनी संदेश मिळण्याची आशा सोडूनच दिली होती, किंबहुना देण्याची म्हणू या. तरी कॅनेसा विमानाकडे परतण्याचं नावच काढत नव्हता. पेरॅडो आणि व्हिजिटिन या दोघांनी मनोमन नव्या मोहिमेची तयारीही सुरू केली होती. पश्चिमेकडे चिली आहे एवढी एकच गोष्ट त्यांना माहीत होती. उपयुक्त सामानसुमानाची जमवाजमव झाली. व्हिजिटिननं एक मोठी पिशवी तयार केली. प्रवासात असताना रात्री कडक थंडीपासून संरक्षण हा प्रमुख प्रश्न होता. पिशवी शिवून झाल्यावर, त्यात रात्री शिरून बसलं तर थोड्याफार प्रमाणात ऊब वाढेल ही नवीनच कल्पना उदयास आली.

त्या वेळपर्यंत हवामानातील बदलामुळे बर्फ वितळायला सुरुवात झाली होती. फक्त शेपटाखालच्या भागाला ऊब मिळत नसल्यामुळे तिथे टणक पृष्ठभाग कायम राहिला. त्याचा परिणाम असा झाला की शेपूट हळूहळू खालीखाली सरकू लागलं. जोरदार वाऱ्यांनी त्याला साथ दिली. चौघेही जीव मुठीत धरून आत बसले होते. पेरॅडोला झोप लागणं अशक्य झालं. शेवटी तो मुलांना म्हणालाच, 'आपण बाहेरच जाऊन निजणं बरं, नाही का? लागली तर तिथेच झोप लागेल.'

व्हिजिटिन नुसताच कण्हला आणि कॅनेसा म्हणाला, 'हे बघ, नँदो, आपण मरणारच असलो तर कुठेही गेलो तरी मरणार. इथे निदान आडोसा तरी आहे.'

दुसऱ्या सकाळपर्यंत तरी शेपूट त्याच ठिकाणी थांबलं होतं; पण त्यात राहणं आता सुरक्षित नव्हतं हे निश्चित. रेडिओच्या नादी आणखी लागण्यातही अर्थ नव्हता. म्हणून फेअरचाइल्ड गाठणं आता हिताचं होतं. निघताना सिगारेट्सचा नवीन साठा घेऊन ते निघाले. गेल्या आठ दिवसांतील कष्ट आणि निराशा आठवून रॉयनं रेडिओचे निरनिराळे भाग रागारागानं इतस्तत: लाथाडले. त्यावर त्यांनी किती मेहनत घेतली होती!

पण त्यात त्याची खूपच शक्ती निष्कारण वाया गेली. ४५ अंशांतला चढ एक मैल होता. सुरुवातीला बर्फाचा पृष्ठभाग टणक असल्यामुळे अडचण आली नाही; पण पुढे पुढे भुसभुशीत बर्फात त्याचे पाय मांडीपर्यंत बुडू लागले. त्या स्थितीत रॉयला अक्षरश: राक्षसी शक्तीची गरज होती. दर तीस पावलांवर थांबूनही तो मागे पडू लागला. मग पेरॅडो त्याच्यासाठी थांबला. तो जवळ आल्यावर चुचकारून, शिव्या देत, विनंत्या करीत पुढे येण्यास त्याला प्रवृत्त केलं. अतिरिक्त थकवा आणि निराशेमुळे रॉय वारंवार खाली कोसळे. तो रडत तर एकसारखा होता. 'मला सोडून तुम्ही पुढे जा, मी इथेच मरणार आहे,' या त्याच्या विनवणीला कोणीच दाद दिली नाही आणि इतक्या गलिच्छ शिव्या त्यानं पूर्वी कधीच खाल्ल्या नाहीत.

काही काळ त्या दडपणाखाली तो चालत राहिला; पण एका ठिकाणी तर कोणताही उपाय चालेना. पेरॅडो मागे वळून त्याच्यापाशी गेला. त्याला मृदू आवाजात म्हणाला, 'हे बघ, आता काही फार अंतर राहिलं नाही आणि तुझ्या आई-वडिलांना पुन्हा भेटण्यासाठी तू अगदी मामुली कष्ट घेऊ शकणार नाहीस?'

त्याचा हात धरून पेरॅडोनं उठवलं. रॉय त्याच्या खांद्यावर हात ठेवून लंगडत, स्वत:ला ओढत-खुरडत अखेर चालू लागला. सायंकाळी साडेसहा-सातच्या दरम्यान चौघेही फेअरचाइल्डमधे एकदाचे शिरले. थंड वारे वाढले, हिमतुषार उडत होते. तेराजण आधीच आत जाऊन पडले होते. खचलेल्या मनानं त्यांनी चार मुलांचं स्वागत केलं. कॅनेसाला त्याचंही काही विशेष वाटलं नाही; पण आपल्या मित्रांची झालेली दशा पाहून, मनात तो चरकला. सगळे जादा अशक्त झालेले, दाढ्या वाढलेले उतरलेले चेहरे आणि डोळेही निस्तेज.

विमानात इतस्तत: पडलेले मानवी शरीरांचे सांगाडे, डोकी आणि घाणेरडी हवा–ही अवस्था बघवत नव्हती. सुटकेच्या प्रयत्नाआधी तिथेच काही तरी करण्याची कधी नाही एवढी गरज त्याला वाटली.

[क्रमश:]

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

१३-९-७५ ते १९-९-७५

**काँग्रेस व विरोधी पक्ष यांच्यात वैचारिक जवळीक निर्माण होणार आहे.**

या आठवड्याची सुरुवात धनूराशीच्या चंद्रावर होत आहे. गुरू पुन्हा मीनराशीत प्रविष्ट झाला आहे. रवी व मंगळ हे दोन ग्रह अनुकूल वळणावर आहेत. काँग्रेसच्या मूळ कन्याराशीतच रवी दि. १७ सप्टेंबरला येणार आहे. या सर्व राशींचे गुणधर्म लक्षात घेता भारताच्या बौद्धिक व राजकीय आघाडीवर बुद्धिमत्ता, रसिकता व उदारमतवाद यांचा प्रभाव पडण्याची प्रक्रिया या आठवड्यापासून सुरू झाली तर मुळीच आश्चर्य मानू नये. विरोधी पक्ष व काँग्रेसपक्ष हे अधिक जवळ येतील व अनेक प्रश्नांवर विचारविनिमय करू लागतील. काही राजकीय व काही शासकीय म्हणजेच सत्तावादी असे बदल घडण्याची चाहूल या वेळी लागेल. सर्व पक्षांत उदार धोरणाचा वारा वाहू लागेल. बाजाराची पातळी व परिस्थिती लोकांना समाधान देणार नाही. लोकात नैराश्य येणार नाही; पण उत्साह कमीच राहील. आंतरराष्ट्रीय क्षितिजावर बड्या राष्ट्रांत संशयी वातावरण राहील. भारताबद्दल जास्त कुतूहल निर्माण होईल. महाराष्ट्रात अनपेक्षित बदल होणार आहेत.

---

## मेष : जागेचा प्रश्न सुटेल

आज धनू राशीत चंद्र असताना या आठवड्याची सुरुवात होत आहे ही एक शुभ घटनाच होय. प्रामुख्याने जागेचा वर्दळीवर आलेला प्रश्न सुटणार असून भाडेकरू असो की घरमालक असो दोघेही या वेळी समाधानी होणार आहेत. गुरू बारावा आहे. त्याची दखल घेणे आवश्यक आहे. मंगलकार्यात, उपासनेत, धार्मिक कार्यात तात्कालिक असे अडथळे येण्याची शक्यता आहे; पण ते लगेच दूर होतील. बुधवार ते शुक्रवार या दरम्यान विद्यार्थ्यांची एखादी परीक्षा वा मुलाखत असेल तर त्यात त्यांना भरपूर यश मिळणार आहे. परदेशी शिक्षणासाठी जाण्याची संधी देखील लाभू शकेल. नोकरी-व्यवसाय यात प्रगतीचा नवा टप्पा गाठला गेला नाही तरी फारसा त्रास नाही. व्यापारात भांडवल गुंतवणूक किंवा भागीदारी याचा व्यवहार असला तर मात्र थोडा पुढे ढकलावा. बेकारांना या वेळी आश्वासनापलीकडे फारसा फायदा होणे कठीण आहे. महिलांनी आपले ठरलेले काम करावे. धाडस करून कोणतेही बेत ठरवू नयेत.

## वृषभ : प्रेमात यश

प्रेम व प्रेमविवाह हा तुमचा आवडता धंदा आहे. रसिकता व लहरीपणा हे तुमच्या स्वभावाचे दोन गुण या वेळी प्रकर्षाने प्रत्ययाला येणार आहेत. त्रास गेल्या आठवड्यापर्यंत होता. गुरू आता अकरावा झाला आहे. त्यामुळे अनेक प्रश्नांना चालना मिळणार असून बरेच दिवस रेंगाळत राहिलेले प्रश्न व ज्यासाठी तुमचा वेळ व पैसा निष्कारण वाया जात होता ते सारे प्रश्न मार्गी लागण्यासाठी या वेळचे ग्रहमान मदत करणार आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रेमात मोठा रस घेतील, अधिक जवळ येतील. त्यात कित्येकांना मोठे यश लाभणार आहे. सर्वसामान्यपणे नोकरीच्या लोकांना कामातील बंधने पाळावी लागतील; पण विशेष गुणांचा बढती व प्रमोशनसाठी उपयोग होणार आहे. बदली होण्याची शक्यता आहे. सौंदर्यप्रसाधने व कंगण, कापडव्यापार तेजीत चालणार आहे. चांगला नफा कमावता येईल. महिलांनी या वेळी फिरत्या एजन्सीची अगर स्वतःचे दुकान वगैरे काढण्याची योजना आखावी. ती फायदेशीर ठरेल.

## मिथुन : संसारात शुभ घटना

आज चांगला चंद्र आहे व अशा वेळी आठवड्याची सुरुवात होत आहे. तुमच्या संसारातील त्रास वा अडचणी संपलेल्या आहेत याची खात्री बाळगा. घरात पाळणा हालण्याची शक्यता असून दोघा नवरा-बायकोंना विलक्षण आनंद वाटावा असे या वेळी घडेल. शनिवार ते बुधवार पाहुणे व नातेवाईक यांची घरी झुंबड उडेल. नोकरीत तुमच्या कामाचे चीज होईल. मालक अगर वरिष्ठ तुमची जी मागणी आजवर मान्य करीत नव्हते तिचा या वेळी सहानुभूतीने विचार करू लागतील. बेकारांना बँक, रेव्हेन्यूखाते, शाळा, कॉलेजे या ठिकाणी नोकरी मिळेल. शुक्रवारचा त्यांनी उपास करावा. त्यांना पैशाची ददात कधी पडणार नाही. लेखकांना काही तरी नवे लिहिण्याची स्फूर्ती मिळू शकेल. मात्र प्रसिद्धीचा योग थोडा लांबणीवर पडणार आहे. महिलांना अकस्मात माहेरची वारी होईल. नोकरी करणाऱ्या महिलांना पगारवाढ होईल.

## कर्क : नोकरीत प्रमोशन

या आठवड्याची सुरुवात उत्साहवर्धक वातावरणात होईल. एक अशी घटना घडेल की त्यामुळे तुम्ही आश्चर्यचकित होऊन जाल. ही घटना तुमच्या नोकरीविषयक असेल व त्यामुळे तुमचे भवितव्य घडण्याची सुरुवात होईल. विज्ञान, वाणिज्य, इतिहास व कला यापैकी तुम्ही अभ्यासक असाल तर तुम्हाला सरकारी वा खाजगी उत्तमपैकी नोकरी मिळणार आहे. चालू नोकरीत तुम्हाला एकदम पुढे येण्याची संधी मिळणार असून तुम्ही अनेकांच्यावर आघाडी मारणार आहात. तब्येतीचा त्रास नाही; पण वाहन हाकताना अगर वाहनाने प्रवास करताना थोडी काळजी घ्या. सोमवार ते गुरुवार उपासनेने एखादे काम होईल. अध्यात्माकडे मन वळेल. खते, लोखंडी उद्योग व सौंदर्यप्रसाधने यांच्या व्यापारात थोडाफार फायदा होईल. विद्यार्थी व विद्यार्थिनींना पैशाची मदत मिळेल. महिलांना काही आर्थिक व वस्तूंची मदत मिळणार आहे. माहेरची मदत देखील मिळेल.

## सिंह : समाधानी सप्ताह

चंद्र व गुरु हे दोन ग्रह या आठवड्यात तुम्हाला अत्यंत अनुकूल आहेत. त्यामुळे काही तरी महत्त्वपूर्ण असे स्थित्यंतर तुमच्याबाबतीत घडणार आहे. राजकारण व सामाजिक कार्य यात तुमचा प्रभाव पडणार असून तुमची प्रतिष्ठा तर उंचावेलच; पण तुमच्या सहाय्याची अनेकांना गरज भासेल. या आठव-

ड्यातील मंगळवार ते शुक्रवार हे दिवस फारच महत्त्वाचे आहेत. अचानक प्रवास घडून त्यात तुमची शान वाढेल. वाहनखरेदीचा योग आहे. मात्र पैसा जास्त खर्च होईल. हौसेला मोल नाही असेच काही तरी घडेल. नोकरी-धंद्यात बदलीची शक्यता आहे. नोकरीत चालू नोकरी सोडून तुम्ही दुसऱ्या नोकरीच्या प्रयत्नाला लागणार आहात. मात्र यात काळजी घ्या. कोणत्याही विषयाचे पदवीधर असले-ल्यांना या वेळी तात्पुरती नोकरी व उद्योगा-साठी मदत मिळणार आहे. स्वतःचा धंदा सुरू करता येईल. विद्यार्थ्यांना परीक्षेत यश येईल. महिलांना संसारात समाधान लाभणार आहे. मुलांचे कौतुक करण्याची संधी मिळेल.

## कन्या : मानसिक स्वास्थ्य लाभेल

या वेळी तुमचे सुखस्थान फारच पॉवर-फुल झाले आहे. बरेच दिवस न भेटलेली माणसे भेटतील. नात्यातील व मित्र भेटून तुम्हाला प्रसन्नता देतील. सोमवारी महत्त्वाची घटना घडेल. वरिष्ठ तुमच्या मागण्यांचा सहानुभूतीने विचार करतील. कला, वाणिज्य, कायदा व शेती यापैकी तुम्ही संशोधक व अभ्यासक असाल तर सरकारी पुरस्कार लाभेल. मदत मिळणार आहे. राजकारणात तुमचे स्थान पक्के होईल. सरकारदरबारी तुमचे वजन वाढेल. चालू नोकरीत तुमच्या कामाचे चीज होऊन वरिष्ठांच्या मर्जीची सावली तुमच्याकडे वळेल. व्यापारात तुम्ही फारसे न पडणे हिताचे ठरेल. पत्रव्यवहारात थोडेफार यशही लाभेल. ज्या पत्राची तुम्ही आतुरतेने वाट पहात होतात ते पत्र येईल. मतभेद व भांडण मिटून समझोत्याचे वाता-वरण लाभेल. विद्यार्थ्यांना नवा कोर्स घेण्याची संधी मिळेल. महिलांना संततिसुख व प्रेम लाभेल. मन प्रसन्न राहील.

## तूळ : मित्राची मदत

सरकार व समाज या दोन्ही क्षेत्रात ज्यांचा प्रभाव आहे असा मित्र लाभणेही एक भाग्याचीच गोष्ट आहे. ही भाग्यकारक गोष्ट या आठवड्यात तुमच्या बाबतीत घडणार आहे. हा मित्र असा असेल की तुमचे आगामी व्यावसायिक जीवन त्यामुळे व्यवस्थित घडवण्याचे भाग्य तुम्हाला लाभ-णार आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी कलाक्षेत्रात प्रवेश मिळून गुणदर्शनाची नामी संधी मिळ-णार आहे. नोकरीच्या प्रयत्नात मोठे यश पदरी पडून आयुष्याचे हित होईल. नवी नोकरी सरकारी क्षेत्रात जास्त फायद्याची ठरावी. सोमवार व शुक्रवार तुमच्या हिताचे आहेत. कोणताही नवा उपक्रम या वेळी व या दिवशी करा. कापडव्यापार, सुगंधी द्रव्ये, सौंदर्यप्रसाधणे, स्टेशनरी, शेअर्स या व्यवसायात लाभ होईल. या आठवड्यात घरात नवी वस्तू येईल. तुम्ही वाद्य शिकू शकाल. सुरुवात करू शकाल. राजकारणात मात्र निराशेचे वातावरण तात्पुरते राहिले तरी निराश होऊ नका. कारण वातावरणात बदलही होऊ शकेल. महिलांना शारीरिक त्रास नाही; पण जास्त श्रमाने थकवा येईल. वृद्ध स्त्रियांना तीर्थयात्रा घडेल मंगलकार्यात मन रमेल.

## वृश्चिक : हितकारक बदल

आज चंद्र दुसरा असताना आठवडा सुरू होत आहे ही चांगली घटना आहे. कौटुंबिक वातावरण निवळणार आहे. घरात खूप दिवस चालू असलेले तंटेबखेडे थांबणार असून स्नेहाचे, सुखाचे नवे वातावरण निर्माण होणार आहे. पतिपत्नीत वाद होणार नाही. घट-स्फोटापर्यंत गेलेली प्रकरणे तडजोडीने निकाली निघतील. रविवारी व मंगळवारी जवळचा प्रवास होईल. व्यापारी व फिरते एजन्ट यांच्या दृष्टीने हा प्रवास फायद्याचा ठरावा. शेअर्स व दलालीचा धंदा करणाऱ्यांना भाग्याचे नवे लेणे लाभेल. नोकरीत बरेच महत्त्वपूर्ण असे स्थित्यंतर घडणार आहे. तुमचे वरिष्ठ एकदम बदलून जातील अगर नोकरीत त्यांचे काम बदलेल व ते काम तुमच्यावर सोपवले जाईल. तुमची ग्रेड बदलेल, प्रमोशनदेखील मिळेल. बांधकाम, रसायने, शेती, पोलाद, लोखंड या उद्योगांशी संबंधित असे नोकरीतील लोक मोठेच भाग्यवंत ठरतील. परदेशी प्रवास. शिष्टमंडळात समावेश असे काही तरी संभवते. बेकारांची बेकारी या वेळी संपली असे त्यांनी समजावे. विद्यार्थी व विद्यार्थिनींना चमकण्याची संधी मिळेल. महिलांचे मनोरथ पूर्ण होतील. नोकरीत स्थानांतर व अनुकूल स्थित्यंतर घडेल.

## धनु : विरोधकांचा डाव उधळेल

याच आठवड्यात रवि दहावा होत आहे तो तुमच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. आता सरशी होण्याचा काळ जवळ येत आहे. गुप्त शत्रूंनी व तुमच्या विरोधकांनी बराच उठाव केला होता, त्यांच्या कारवायांना ऊत आला होता; पण आता त्यांचे सारे डावपेच तुम्ही उधळून लावू शकाल. नव्हे ते उधळले जातील. एक उणीव मात्र या आठवड्यात आहे ती म्हणजे तब्येतीची कुरकूर होय. तुम्हाला अगदी झोपून रहावे लागणार नाही; पण सर्दी, पडसे, उष्णता, अंगातील कणकण याचा त्रास होईलच. इत्यर्थ डॉक्टरांसाठी काही तरी पैसा तुम्हाला द्यावा लागणार आहे; पण हा एक अपवाद सोडला तर एरवी अनेक बाबतीत आठवडा प्रगतीचा जाणार आहे. नोकरीधंद्यातील तुमचे जे आसन अस्थिर झाले होते किंवा होईल अशी तुम्हाला भीती वाटत होती ती आता बाळग-ण्याचे कारण नाही. रविवार ते मंगळवार अचानक धनलाभ होईल. लॉटरीमध्ये भाग घ्यायला हरकत नाही. वाङ्मयीन प्रसिद्धी मिळेल. लेखन होईल. विद्यार्थ्यांनी पाण्या-पासून काळजी घ्यावी. महिलांना नोकरीत



कायम होता येणार आहे. चालू नोकरीत बदलाची शक्यता आहे.

## मकर : धीरोदात्तपणाचा प्रत्यय

मंगळ हा मकरराशीचा मित्र आहे. तो सध्या तरी वृषभराशीत पंचमस्थानी बसून तुम्हाला सर्व प्रकारे मदत करीत आहे. शिवाय आठवड्याच्या शेवटी रवि भाग्यस्थानी प्रवेश करीत आहे., त्यामुळे या वेळी तुमच्या जीवनाला कलाटणी देणारी एखादी घटना घडणार हे निश्चितच आहे. तुमच्या प्रतिष्ठेवर परिणाम करणारा एखादा वाद चालू असेल तर त्यात तुमची सरशी होणार असून तुमच्या धीरोदात्तपणाचे मोठे कौतुक होणार आहे. सोमवार ते गुरुवार नोकरीच्या दृष्टीने प्रगतीचे आहेत. चालू नोकरीत बढती–प्रमोशन मिळेल. एखादे जबाबदारीचे काम तुमच्यावर सोपवले जाईल. तुमच्यापैकी अनेकांना स्वतःचे खास गुण दाखवण्याची संधी मिळेल. शेती, औषधे, विज्ञान या क्षेत्रातील पदवीधरांना एकदम महत्त्व येईल. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मदत मिळेल. थांबलेले शिक्षण पुन्हा चालू होईल. व्यापारात मात्र जपून राहावयास हवे. हिशोबाच्या बाबतीत नियमाचे काटेकोर पालन करा. वाहनव्यवहारात फसवणूक होण्याची शक्यता आहे. महिलांनी संशयाच्या आहारी न जाता मन स्थिर ठेवून वागावे. नोकरीत कष्ट पडतील.

## कुंभ : मनात खळबळ

तुमचे व विरोधकांचे काय नाते असते कोण जाणे ! पण विरोधक तुमच्या चुकांचा पारवा करण्यासाठी तत्पर असतात. मात्र प्रत्येक वेळी तुम्ही या विरोधकांवर सहज मात करून जाता, हेच तुमच्या शनिप्रधान राशीचे वैशिष्ट्य आहे. या वेळीदेखील तुम्ही विरोधकांना हाच धडा शिकवणार आहात. मात्र तुमचे मन स्वस्थ राहील या भ्रमात तुम्ही राहू नका. मनात खळबळ माजत राहीलच. या आठवड्यात तुमच्या प्रतिष्ठेला उत्तुंगता लाभावी असेच काही तरी घडून येईल. सत्ता व राजकारण यात तुमची शान वाढणार आहे. तुमच्या सल्ल्याची गरज भासणार आहे. उच्च पदस्थांच्या क्षेत्रात तुमचे नाव गाजणार आहे. शनिवारी महत्त्वाचे पत्र येईल किंवा महत्त्वाची वार्ता कळेल. सोमवारी राजकारणात तुमचे नाव चमकेल. गुरुवार, शुक्रवार आर्थिक लाभ होईल. नोकरीत बदली होऊन बढती मिळेल. शिक्षित अगर पदवीधरांना नोकरी पहाताना इंजिनियरिंग उद्योग, खतकारखाने, औषधी कारखाने यात नोकरी लागेल. बँकेत असणाऱ्यांनी बदलीचा अवश्य प्रयत्न करावा. वकिलांना काम मिळेल. महिलांना स्वतःच्या मालकीची स्थावर प्रॉपर्टी मिळेल. त्याचप्रमाणे दुकानात भागिदारी मिळेल.

## मीन : मनोरथ पूर्ण होतील

गुरु राशिस्वामी आहे व तो आता पुन्हा राशीत येऊनच स्थिर झाला आहे. शनि पाचवा आहे तर मंगळ तिसरा आहे. रवि मात्र आठवड्याअखेर सातवा होणार आहे. संसार व कुटुंब याविषयीची सारी कामे पहिल्या दोन–तीन दिवसातच उरकून घ्या. नोकरीच्या दृष्टीने फार मोठे बदल संभवत नाहीत; पण चालू नोकरीत बदल करावा असे तुमच्या मनात विचार येऊ लागणार आहेत. मात्र या आठवड्यात हा बदल नाही. करू नये. शेतीचा व्यवसाय प्रगतीकडे जाईल. शेतकरी लोकांना खूप फायदा होईल. घराचा प्रश्न सुटेल. भाडेकरू व घरमालक यांच्यातील वाद तडजोडीने मिटेल. व्यापारीवर्गापैकी बुकसेलर्स, स्टेशनर्स, मिठाईवाले, कागदवाले, प्लॅस्टिक, खते, लाकडी फर्निचर्सचे खरेदी-विक्रीवाले यांना हा आठवडा उत्तम आहे. संशोधक, लेखक, इतिहासकार, पत्रकार, कलावंत यांच्या गुणांना व विद्वत्तेला प्रोत्साहन मिळेल. विदेशी प्रवासाची संधी मिळेल. विद्यार्थ्यांना खास मदत मिळेल. शिकता शिकता कमावण्याचीही संधी त्यांना मिळेल. महिलांचा धार्मिक व मंगल कार्याकडे जास्त ओढा लागेल. नोकरीत मन रमणार नाही. □

---

# बांगला देश

पृष्ठ १३ वरून


सैनिकांनी मुजीब यांच्या घराला वेढा देऊन त्यांच्या मुक्ततेची मागणी केली. यापैकी काहीही घडले असो, दुसऱ्या दिवशी काही लष्करी अधिकारी व सैनिकांनी मुस्ताफांच्या घरावर हल्ला केला. मुस्ताफांनी मुजीबला कळविले तेव्हा मुजीब यांनी दलील व इतर हल्लेखोर अधिकारी आणि सैनिकांना बडतर्फ करण्याचा हुकूम दिला.

आपण केलेल्या या अन्यायाचा सूड एक वर्षाने घेतला जाऊन त्यात आपली व आपल्या सर्व कुटुंबियांची कत्तल होणार आहे याची त्या वेळी मुजीबना कल्पनाही नसेल. चौदा ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतर बेंगॉल लान्सर्सचा एक रणगाडा मुजीब यांच्या घराच्या वागेपुढे थांबला. अधिकारी व सैनिकांनी वाहनातून उड्या टाकून घरात प्रवेश केला. मुजीब व ते सैनिक यांच्यात काही काळ बोलाचाली झाली. मुजीबनी लष्कराच्या गुप्तहेर विभागाच्या प्रमुखास फोन केला. तो लागलीच आला. त्याने सैनिकांना विरोध करून मुजीब यांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला घराबाहेर गोळी घालून ठार करण्यात आले. त्यानंतर थोड्या वेळाने मुजीब, बेगम मुजीब आणि त्यांचा बारा वर्षांचा मुलगा रसेल यांना घराच्या जिन्यात गोळ्या घालून ठार करण्यात आले. सैनिकांनी नंतर मुजीब यांचा मोठा मुलगा कमाल व त्याच्या पत्नीस ठार केले. मुजीबचे दोन पुतणे शेख फजलूल हक मोनी आणि शेख शहीदुल इस्लाम यांनाही दुसऱ्या सशस्त्र सैनिकांनी ठार केले.

डाक्क्यापासून पंधरा मैलांवर सावर येथे रक्खी वाहिनीचे मुख्य ठाणे आहे. बंडखोरांचे काही रणगाडे व सैनिक तिकडे गेले; पण त्यांना तेथे प्रतिकार झाला नाही.

मुजीबना ठार करणारे सैनिक एवढ्याजवळ येऊ शकले याचे कारण मुजीबवर हल्ल्याचा संभव असण्याची बातमी आधी पसरली होती. डाक्का विद्यापीठात एका सभेपुढे मुजीब यांचे भाषण व्हावयाचे होते. त्या वेळी त्यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न होणार असल्याच्या बातम्या होत्या म्हणून त्यांच्या नेहमीच्या शरीररक्षकपथकाच्या जोडीला जादा सैनिक-पथके पाठविण्यात आली. या जादा सैनिकांत मेजर दलीम व त्यांचे सहकारी होते. म्हणजे संरक्षक म्हणून आलेल्यांनीच मुजीबचा बळी घेतला; पण लष्करात मुजीब यांच्याविरुद्ध असंतोष नसता तर हे शक्य झाले नसते हे उघड आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे. आपल्याकडे संशयाने पाहिले जात आहे अशी लष्कराची भावना झाली होती.

बांगलादेशामधील क्रांतीसंबंधी बरीच नवी माहिती देणारी ही बातमी दि गार्डियन पत्राचे डाक्क्यामधील वार्ताहर लॉरेन्स लिफशुल्ट्झ आणि बँकॉकमधील वार्ताहर मार्टिम वूलकांट यांनी त्या पत्रास पाठविली व ती त्या पत्रात प्रसिद्ध झाली आहे. ही सर्व माहिती कितपत विश्वसनीय व खरी आहे हे सांगणे कठीण आहे; पण मुजीबविरोधी सैनिकांची बाजू त्यात आलेली आहे. या सैनिकांवर झालेला अन्याय खरा आहे असे गृहीत धरले तरी त्यांनी घेतलेला भीषण सूड समर्थनीय ठरत नाही. चोरटा व्यापार करणाऱ्या आपल्याच पक्षाच्या गाझी मुस्ताफासारख्या नेत्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याचा कणखरपणा मुजीब यांनी दाखविला नाही. त्यांचे नेतृत्व तेथे उणे पडले असे या हकीकतीवरून दिसते. □



# महानिर्वाण

## एक चर्चा

अवधूत परळकर

रुइया कॉलेजातल्या एका वर्गात फळ्यावर ' महानिर्वाण-एक चर्चा ' असं भल्या मोठ्या अक्षरात लिहून तो परिसंवाद भरवण्यात आला होता. प्लॅटफॉर्मवर मध्यभागी नाट्य-समीक्षिका प्रा. पुष्पा भावे होत्या. त्यांच्या उजव्या हाताला संगीतज्ञ अशोक रानडे, त्यांच्या शेजारी धों. वि. ऊर्फ नानासाहेब देशपांडे, डाव्या हाताला प्राध्यापक अनंत भावे, त्यांच्या शेजारी नाट्यदिग्दर्शक आणि कलावंत अमोल पालेकर असा ' रूपवेध ' च्या या परिसंवादाचा छोटेखानी थाट होता.

' महानिर्वाण ' संबंधीचं आपलं टिपण वाचून दाखवून अनंत भावेंनी परिसंवादाची सुरुवात तर मोठी खुमासदार केली. अनंत काणेकरी पद्धतीनं कोणालाही फारसं न दुखवता बोचक बोलण्याची कारागिरी अनंतरावांकडे आहेच; पण याखेरीज काणेकरांजवळ नसलेली उच्च दर्जाचा शब्दनिष्ठ विनोद करण्याची कला त्यांच्याकडे आहे. महानिर्वाणावर भाष्य करताना त्यांनी आपलं सर्व ' सोलकढी ' कौशल्य पणाला लावलं.

आपण भाषण करायचं सोडून टिपण वाचून का दाखवीत आहोत याचा खुलासा करताना ते म्हणाले– कित्येक वेळा बोलताना मला बोलायचं असतं ते राहून जातं आणि बोलायचं नसतं ते मी बोलून जातो म्हणून हे वाचून दाखवत आहे. ' भावेंच्या खुमासदार लेखणीचे हे खास नमुने—

' मिकी आणि मेमसाबला बक्षीस मिळालं नाही. सहानभूती मिळाली.– वालंसकट सगळे कुलकर्णी, जोशी आळेकरांच्या नाट्य-लेखनाचा विचार करू लागले.–' पुणेकरांनी महानिर्वाणला खांद्यावर घेतलं. मुंबईकर भिडवून घेत आहे.–' एक तेवढं बंदीचं सोडलं तर इतर वाजल्या–गाजल्या नाटकाचं झालं तसं या नाटकाचं झालं आहे–' ' नाटकाचं राजकीय आणि सामाजिक नाटक असं वर्णन ,करता आलं तर माझ्या जिवाला गोड वाटतं. समीक्षकांच्या मते तिसऱ्या अंकात नाटककार फसतात म्हणून आळेकरांनी नाटकात दोन अंक ठेवले आहेत.'

अनंतरावांनंतर गंभीर चेहऱ्याच्या आणि प्रकृतीच्या धों. वि. देशपांडयांनी बोलायला सुरुवात केली–' मित्रांनो ! ज्या विषयात मला काही कळत नाही त्या विषयावर मी बोलत नाही असा माझा आजवरचा लौकिक आहे. आज त्या लौकिकाला तडा जाईल की काय असं वाटत आहे. या नाटकात काही तरी अमर्याद सांगायचा प्रयत्न आहे इतकं तरी मला कळतं. ' हे नाटक विडंबन असल्याचं सांगून ते पुढे म्हणाले, ' मरणविधीचं हे विडंबन आहे असं म्हणून चालणार नाही. आपण जे जगतो त्याचं हे विडंबन आहे. हा विनोद असा की जो दुःखावर आधारलेला आहे. ज्या विनोदाला कारुण्याची झालर आहे तो सर्वश्रेष्ठ विनोद आहे. मरणाच्या वेळी पांडित्य दाखविणाऱ्यांची आळेकर (पहिल्या अंकात) चेष्टा करतात आणि आळेकर मला क्षमा करतील असं वाटतं. त्यांचं नाटक त्याच ठिकाणी संपलं. पहिला अंक संपला तिथंच नाटक संपलं. लहान नाटक झालं तर लोक दंगा करतील म्हणून तर आळेकरांनी दुसरा अंक लिहिला नाही ना अशी शंका मला येते. '

' फॅन्टसी असली तरी त्याला काही तरी संगती लागते. माणूस मेल्यानंतर स्वतःबद्दल बोलू शकतो ही सुसंगती पहिल्या अंकात दिसते ती दुसऱ्या अंकात नाही. कदाचित मला त्यातली फॅन्टसी कळली नसावी; पण फॅन्टसीला तर्कशास्त्र असतं. '

हा प्रयोग होत असताना या ठिकाणी

काही बीभत्स चाललंय असं मला वाटलं नाही अशी कबुली देऊन ते म्हणाले–' दुखःमूल विनोद हे यातलं नाटय. मात्र दुःखमूल विनोद म्हणजे ब्लॅक कॉमेडी असं आपल्याला वाटत नाही–' नाटकातल्या हरिदासी पद्धतीच्या संगीताबद्दल ते म्हणाले, ' या हरदासी पद्धतीच्या निवेदनामुळं हा विनोद अधिक पकड घेतो, यापलीकडे या नाटकाबद्दल अधिक बोलणं आज मला शक्य नाही. जितके तर्काचे दुवे लागले तितकं बोललो. काही बोलल्यानंतर क्षमस्व बोलण्याची आपली पद्धत नाही; पण लेखकाला जे अभिप्रेत आहे ते न समजण्याइतकं अज्ञान माझ्याकडे असल्यामुळं काही चुकलं तर क्षमा करा असं म्हणतो. '

धों. वि. देशपांडयांनंतर संगीतज्ज्ञ अशोक रानडे महानिर्वाणमधल्या संगीतावर चांगलं पंचवीस-तीस मिनिटं बोलले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांनी हे संगीत प्रत्यक्ष ऐकलं नव्हतं. कारण ' महानिर्वाण ' नाटकाचा प्रयोगही त्यांनी पाहिला नव्हता. टी. व्ही. वर नाटकाची जी थोडी दृश्यं दाखविण्यात आली होती ती मात्र त्यांनी पाहिली होती; पण ती देखील तुटकतुटक. ' नाटकं लिहिली जातात हा अपघात असतो. ती जगतात ती प्रयोगात जगतात. संहितेच्या आधारे प्रयोगाची बीजं किती दिसतात हे पाहून नाटकातल्या संगीतात्मकतेवर मी बोलतो. आळेकरांची शैली ही बोलण्याची शैली आहे, लिहिण्याची शैली नाही. बोलला जाणारा शब्द आळेकरांना महत्त्वाचा वाटतो हे त्यामागचं कारण असू शकेल. ' संहितेत संगीताच्या ( आळेकरांनी ) सूचना दिल्या आहेत त्याचा निर्देश करून संगीतज्ज्ञ रानडेंनी त्यात अनेक चुका दाखवल्या आणि कोणत्या प्रकारचं संगीत, वाद्य तिथं योग्य ठरलं असतं ते सांगितलं. पेटी कुठं शोभली असती कुठं खटकली असती, तंबोरा कुठं खटकला त्याऐवजी तंबोरी कशी शोभली असती हे स्पष्ट केलं. आरती वगैरे सोडलं तर बऱ्याच गोष्टी बटबटीत झाल्या आहेत असं सांगून ते म्हणाले, ' नाटकात संगीताचे साचे अधिक अर्थपूर्ण वापरता आले असते. ' तबला वाजवावा पण शिष्टसंमत तबला वाजवू नये यासारखी सूचना करून शेवटी त्यांनी नाटक लिहिलं जातं हे वाईट. नटक लिहिता कामा नये असं विधान केलं.

रानडयांनी ' महानिर्वाण ' का पाहिलं नाही याचा इथं थोडासा उलगडा झाला. संगीत ऐकलं जातं हे वाईट. संगीत ऐकता कामा नये. ते वाचलं जावं असं त्यांना वाटत असावं.

अशोक रानडेंच्या वैचारिक विवेचनानंतर अमोल पालेकरांसमोर माईक सरकवण्यात आला. आता जे बोलणार आहे ते थोडयाफार प्रमाणात ' लाऊड ' असेल अशी कबुली देऊन पालेकरांनी सुरुवात केली. (भाषणाच्या सुरुवातीला काही तरी कबुली द्यावी अशी वक्त्यांची धारणा झालेली दिसली.) ' आतापर्यंत जे बोललं गेलं त्याच्या आधारे आणि प्रयोगसंदर्भात जे विचार सुचले त्यावर बोलतो. मी हे नाटक दोनदा पाहिलं. दुसऱ्यांदाही गुदमरवून अस्वस्थ करून टाकणारा अनुभव आला. माझ्या दृष्टीनं हे महत्त्वाचं. दुसऱ्यांदा नाटक बोथट होणं संभवते; पण महानिर्वाण दुसऱ्यांदा पाहतानाही अंगावर आलं. ' पहिल्या आणि दुसऱ्या अंकातली विसंगती वगैरे विचार माझ्या मनात उभेही राहिले नाहीत. असहायता ही जर या नाटकाची थीम ठरली तर हे (विसंगतीचे) सगळे प्रश्न चटकन मागे जायला सुरुवात होते. मेल्यावर जे काही घडतंय त्याबद्दल तो (मृत माणूस) असहाय आहेच; पण आजूबाजूची माणसंही असहाय आहेत. ही असहायतेची थीम नाटकाच्या व्हिज्युअल लेव्हलवर जाणवत राहिली. व्हिज्युअल लेव्हल म्हणजे सेटस् कॉम्पोझिशन यावद्दल मी म्हणत नाही. पहिलं मनात घर करून राहिलेलं दृश्य म्हणजे नानाची एंट्री. दुसरं–आळेकर नाटकातून टारझन होण्याची कल्पना बोलून दाखवतात ते. या एका शब्दातून प्रचंड मुक्ततेची इमेज आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. असहायतेची जाणीव नाटकात पदोपदी होत राहिली. वेगवेगळ्या लेव्हलसवर वेगवेगळ्या एज ग्रुप्समधून ब्लॅक कॉमेडीमुळं आणखी जास्त अंगावर आली. सुसंगती आहे किंवा नाही हा प्रश्नच कळेनासा झाला. असहायतेची थीम मला सुसंगतपणे दिसली. आळेकरांनी मॉर्बीड होऊ न देता, ओरखाडे न काढता आणि तरीदेखील अंगावर येणारी थीम दिली. यावद्दल हा अनुभव दिल्यावद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. '

वक्त्यांची भाषणं आटोपल्यावर प्रेक्षकांनीही चर्चेत सहभागी व्हावं या इच्छेनं पुष्पा भावेंनी प्रेक्षकांना हवे ते प्रश्न, शंका विचारण्याची विनंती केली. दीर्घ शांततेनंतर एक प्रेक्षक पुढं झाला. त्यानं विचारलेल्या प्रश्नानं संपूर्ण परिसंवादाची विकेट गेलीच; पण नवनाटय आणि सामान्य प्रेक्षकवर्ग तसंच बुद्धिवादी समीक्षक आणि सर्वसाधारण पारंपारिक प्रेक्षक यातलं भीषण अंतर स्पष्ट झालं.

' महानिर्वाण.' हे हिंदुधर्माच्या अंत्यसंस्काराचं विडंबन असल्याचं सांगून हा प्रेक्षकप्रतिनिधी म्हणाला, ' हिंदुधर्मातल्या अंत्यसंस्कारात वाईट गोष्टी आहेत हे खरं; पण त्यात चांगलंही काही तरी असलं पाहिजे. चांगली बाजू का दाखवली जात नाही ?'

स्वतः सतीश आळेकरांनी पुढं सरसावून या प्रश्नाला उत्तर दिलं–' हिंदुधर्माचा मी एक्स्पर्ट नाही. सामान्य माणूस म्हणून जे काही वाटलं ते मी लिहिलं. त्याचा अर्थ हिंदुधर्माची त्याच्या अंत्यसंस्काराविषयी मला पूर्ण माहिती आहे असं नाही; पण भोघे नावाचे भटजी आहेत. त्यांचा मुलगा माझा मित्र. त्यांना विचारून मी सांगू शकेन. ' □


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# सतीश आळेकर

## एक मुलाखत

### सुभाष सोनवणे

सतीश आळेकर, ' महानिर्वाण ' मधला ' भाऊराव '–चंद्रकांत काळे, ' महानिर्वाण 'चा संगीतनियोजक आनंद मोडक, मी आणि माझे काही मित्र असे आम्ही एकत्र बसलेलो आहोत. एखाद्या समवयस्काची आणि त्यातल्या त्यात मित्राची ' मुलाखत ' घेणे हा प्रकार मला खूप ऑक्वर्ड वाटतो. मुलाखत ह्या शब्दात अंतर्भूत असलेला औपचारिकपणा दोस्ताशी बोलताना कसा काय दाखवावा हा पेच असतो; पण त्याबरोबरच अनुभव असा आहे की, मुलाखत जेवढी औपचारिक रीतीने घेतली व दिली जाईल, तेवढा तीमध्ये वस्तुनिष्ठपणा येतो. प्रश्नांचे आणि उत्तरांचेही स्वरूप जेवढे मुद्देसूद, रोखठोक असेल तेवढी मुलाखत अधिक बंदिस्त होऊ शकते. एका किंवा काही विशिष्ट दृष्टिकोनातून एखाद्या व्यक्तीचे विचारदर्शन वा व्यक्तिमत्त्वदर्शन घडवणे हा मुलाखतीचा हेतू असतो; निदान तो तसा असावा. त्यामुळे मुलाखतीत अन्य पाल्हाळिक आख्यान शक्यतो नसावे, आणि म्हणूनच सतीश आळेकरच्या मुलाखतीच्या वेळीसुद्धा, ऑकवर्ड होत असूनही प्रश्नोत्तरांमधे औपचारिकताच अंगीकारावी लागली. तर सुरुवातीलाच लावलेले हे प्रास्ताविक पाल्हाळ आवरते घेऊन आता प्रत्यक्ष मुलाखतीकडे वळतो.

–' जीवरसायनशास्त्र घेऊन तू एम्. एस्. सी. झाला आहेस. वैद्यकीय महाविद्यालयात संशोधनअधिकारी आहेस. जीवरसायन-शास्त्रातला संशोधन-अधिकारी आणि नाटककार ह्या दोन पराकोटीच्या टोकांची सांगड कशी घालावी, मित्रा ?'

–' प्रत्येक जण आपला अनुभव, आपले विचार सांगत असतो. सांगण्याची प्रत्येकाची स्वतःची खास पद्धत असते. कोणी कथा हे माध्यम वापरतो, तर कोणी नाटकाचे माध्यम वापरतो. मी नाटकाचे माध्यम निवडले आहे. अर्थात् आर्थिक गरजेसाठी नोकरी करावीच लागते.'

–' तू नाटक हेच क्षेत्र का निवडलेस ?'

–' तेंडुलकरांचे ' शांतता, कोर्ट चालू आहे–' हे नाटक बघितले. त्यांचे मी पाहिलेले ते पहिलेच नाटक. त्या नाटकाने मी विलक्षण अस्वस्थ झालो. तसे काही मी पूर्वी कधीच बघितले नव्हते आणि नाटक ह्या माध्यमाकडे माझी ओढ वाढू लागली. मग नाटक हेच एक्स्प्रेशन बनून गेले.'

–' मग थिएटरबद्दलची तुझी कन्सेप्ट काय आहे ?'

–' थिएटरबाबत कन्सेप्ट असण्याएवढा मी मोठा नाहीय. मला जाणवणारे काही तरी, खूप लोकांना एकाच वेळी आणि जास्त जिवंतपणे नाटचमाध्यमातून सांगता येते असे मात्र मला वाटते.'

–' तू स्वतः थिएटरशी तीन रूपांनी संबंधित आहेस–नाटककार, दिग्दर्शक आणि नट म्हणूनही. ह्यापैकी नाटककार सतीश आळेकरचा विचार प्रथम करू या. तुझ्या नाटचलेखनामागील प्रेरणा कोणती ?'

–' आतापर्यंत मी फक्त दोनच नाटके लिहिली आहेत. ' नाटककार ' म्हणजे काय हे मला माहीत आहे असे वाटत नाही. प्रेरणा वगैरे म्हणशील तर माझ्या नाटकांचे विषय मी अनुभवलेल्या घटनांतून मला मिळालेले आहेत. ' मिकी आणि मेमसाहेब ' हे माझे पहिले नाटक मला वास्तव व्यक्तिरेखेवरूनच सुचले. ' महानिर्वाण ' विषयी सांगायचं, तर मी पुण्याला शनवारात ओंकारेश्वराजवळ राहतो–त्यामुळे मी रोजच प्रेतयात्रा बघत आलोय. त्यातूनच हे मृत्यूच्या विषयावरचे नाटक लिहायचे सुचले.'

– ' ते नाटक तू कीर्तनाच्या फॉर्ममधे लिहिले आहेस. आपल्या नाटकात काही तरी नवीन, वेगळे असावे हाच त्या फॉर्ममागला हेतू होता का ?'

– ' फॉर्मचा असा स्वतंत्र विचार मी करीत नाही. नाटकाची गोष्ट मला आविष्काराच्या पद्धतीसकटच सुचते. ' महानिर्वाण 'च्या बाबतीत, माणूस मेल्यावर कथाकथन करेल तो कीर्तनाच्या पद्धतीमधेच, असे मला वाटले. कीर्तनाचे असे आकर्षण असण्याचे कारण बहुधा, मी लहानपणापासून कीर्तने ऐकत आलो आहे हे असेल. मी रहातो त्या भागात बारा-तेरा देवळे, मंगल-कार्यालये आहेत– '

– ' अजूनही मला वाटतंय की तू केवळ फॉर्मसाठी फॉर्म घेतला असला पाहिजेस. तुझ्या नाटकात कीर्तनाची धाटणी चपखल बसलीय ह्यात शंका नाही; पण तुला फॉर्मचा हव्यास नक्कीच असला पाहिजे. हे पहा, काही तरी नवीन करणे हा विजय तेंडुलकरांचा विशेष आहे. ' घाशीराम ' निमित्ताने तेंडुलकरांशी तुझा संबंध-संपर्क वाढला असेल आणि तेंडुलकरांच्या व त्यांच्या लेखनाच्या प्रभावाखालीच तू ' काही तरी नवे ' म्हणून कीर्तनाचा फॉर्म अवलंबला असशील– '

– ' घाशीराम हा भारतीय रंगभूमीवरचा महत्त्वाचा टप्पा आहे हे आता मान्य झाले आहे. अशा टप्प्यांचे परिणाम इतर नाटकांवर होत असतात. उदाहरणादाखल ' तुज आहे तुजपाशी ', ' आधेअधुरे ', ' हयवदन ' इत्यादि नाटके घे. ' घाशीराम 'पासून अनेक नाटकांत समूहदृश्ये, समूहनृत्ये, लयीत चालणे, रिदम् पकडणे, हमिंग करणे, लोककलांचा वापर करणे हे प्रकार सुरू झाले. आम्ही तर ' घाशीराम ' करणारे, शिवाय मी ' घाशीराम 'चा सहदिग्दर्शकच होतो. त्यामुळे माझ्यावर परिणाम होणे अपरिहार्यच होते; परंतु ' महानिर्वाण 'च्या लिखाणापेक्षा त्याच्या प्रॉडक्शनवर ' घाशीराम 'चा परिणाम जास्त असावा. आम्ही ' घाशीराम 'ची जुळवाजुळव करीत असताना ' महानिर्वाण 'चा पहिला अंक लिहिला जात होता– '

– ' अच्छा; पण तेंडुलकरांच्या निकट संबंधात आल्यामुळे तुझ्यामधल्या नवोदित

नाटककारावर त्या जबरदस्त नाटककाराचे काही ना काही तरी संस्कार नक्कीच झाले असतील, नाही का ?'

–'तेंडुलकर हे मोठे आणि परिपक्व नाटककार आहेत. त्यांच्याविषयी मला आदर आहे. माझ्यासारख्या नव्याने लिहिणाऱ्या तरुणावर त्यांचे नकळत संस्कार होणे स्वाभाविक आहे–'

–'लेखक म्हणून तेंडुलकरांना मानतोस, तसाच दिग्दर्शक म्हणून जब्बार पटेलांना तू मानत असशील. दिग्दर्शनाच्या बाबतीत जब्बार पटेल तुझे गुरु आहेत का ?' तुझ्या त्यांच्याविषयीच्या भावना काय आहेत ?'

–'गुरु ही भानगड मला माहीत नाही. जसा जब्बारचा स्वतःवर विश्वास आहे, तसा माझा माझ्यावर विश्वास आहे. जब्बारची आणि माझी गेल्या आठ-नऊ वर्षांची मैत्री आहे. मी नाट्यक्षेत्रात टिकलो तो जब्बारमुळे. त्याने आजवर बसवलेल्या प्रत्येक नाटकाशी मी कुठे ना कुठे संबंधित आहे. नाट्यमाध्यमावर अतिशय जबरदस्त पकड असलेला, नाट्यविषयक सर्वांगीण अभ्यास असलेला तो एक मोठा दिग्दर्शक आणि नट आहे आणि हो–जब्बार गाण्यांना चालीदेखील देतो–'

या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

**आनंदाच्या**
**दाही**
**दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**

–'तुझ्या दोन्ही नाटकांचा दिग्दर्शक तू स्वतःच होतास. नाटकाच्या अगदी लिखाणाच्या अवस्थेपासूनच हा तुझ्यातला दिग्दर्शक तुझ्यामधील लेखकाला सहाय्य देत असतो का ?'

–'लिहीत असताना मी कोठल्या भूमिकेतून लिहितो, हे मला माहीत नाही; पण हे नाटक स्टेजवर नक्की कसे दिसेल हे मात्र माझ्या मनात पक्के बसलेले असते.'

–'म्हणजेच, तुझ्यातला दिग्दर्शक आपल्याला हवे ते, हवे तसे लेखकाकडून लिहून घेत असतो. लेखकाच्या प्रांतामध्ये दिग्दर्शकाची अशी लुडबूड चालावी का ? ' मिकी आणि मेमसाहेब ' किंवा ' महानिर्वाण 'च्या वेळी तू स्वतःच लेखक– दिग्दर्शक होतास. समजा, तुझ्या एखाद्या नाटकाचा दिग्दर्शक तुझ्याऐवजी दुसराच कोणी असला, तर तुझ्या लेखनातून डोकावणारा तुझ्यामधला दिग्दर्शक आणि तो दुसरा दिग्दर्शक ह्यांच्यात मतभेद होणार नाहीत का ? तो दिग्दर्शक गोंधळून जाणार नाही का ?'

–'मला वाटते ते त्या दिग्दर्शकाच्या कुवतीवर आणि माझ्या नाटकाच्या संहितेच्या दर्जावर अवलंबून आहे. आजवर हे कळू शकले नाही. कारण माझी दोन्ही नाटके मीच बसवली होती; पण आता खानोलकरांच्या ' चाफा ' कथेचं मी केलेलं नाट्यरूपांतर जब्बार बसवणार आहे तेव्हा हे स्पष्ट होईल; पण मला वाटते की माझी आणि जब्बारची थॉट प्रोसेस नाटकाबाबत बरीचशी एकसारखी आहे–'

–'जब्बार पटेलांची गोष्ट सोड. तुझ्या एकांकिकांच्या वा नाटकांच्या पुस्तकांवरून कोणीही, कोठेही तुझ्या एकांकिकेचा वा नाटकाचा प्रयोग करेल. तुझ्यामधल्या दिग्दर्शकानं लेखनाच्या बाबतीत नको एवढी ढवळाढवळ केलेली असेल, तर त्यामुळे एक तर तू अन्य दिग्दर्शकांच्या कल्पकतेला अजिबात वावच न देता पार खच्ची करून टाकलेले असेल किंवा दुसरी शक्यताही आहे की त्या दुसऱ्या दिग्दर्शकाने पूर्णतः आपल्या कल्पनाशक्तीनुसार नाटक बसवले तर तुझ्यातल्या दिग्दर्शकाच्या मूळ संकल्पनेला तडा गेलेला असेल. त्यामुळे मूलभूत प्रश्न उरतो की नाट्यलेखनात दिग्दर्शकाने चमचेगिरी करावी का ?'

–'लेखक आपल्या लॉजिकने लिहीत असतो. एखाद्या बुद्धिवान दिग्दर्शकाने त्या लॉजिकबरोबर एका पर्यायी पण सुसंबद्ध लॉजिकने जर ते नाटक बसवले तर त्यात काहीच वावगे नाही–'

–'तू खानोलकांच्या ' चाफा ' ह्या कथेवर नाटक लिहिलं आहेस ना ? एका नाटककाराच्या कथेवर दुसऱ्या नाटककारानं नाटक लिहिण्याची कल्पना मजेदार वाटतेय.'

–'त्या कथेच्या गाभ्याला धक्का न लावता मी कथेचे फक्त नाट्यरूपांतर केले आहे. कसे झाले आहे बघायचे. असा प्रकार मी प्रथमच करतो आहे.'

–'मागच्या वर्षीच्या राज्य-नाट्य स्पर्धेत ' महानिर्वाण 'च्या लेखनाबद्दल तुला नाट्यलेखनाचे पहिले पारितोषिक मिळाले. सध्याच्या नव्या नाटककारांमधला सर्वोत्कृष्ट नाटककार म्हणून तुझा गौरव झाला, तेव्हा तुला काय वाटले ?'

–'एक दाद मिळाली म्हणून बरं वाटलं; पण आमच्या थिएटर अ‍ॅकॅडमीला, जास्तीत जास्त प्रयोग करून जास्त लोकांपर्यंत नाटक पोचवण्यात जास्त रस आहे– अर्थात् उच्च प्रयोगदर्जा राखूनच ! बक्षीस मिळाले की चार जास्त लोक तिकिटे काढून नाटकाला येतात आणि आमच्या ग्रुपची कामगिरी चार जास्त लोकांपर्यंत पोचते. हीच भावना बक्षीस मिळाल्यावर माझ्या मनात होती. आम्ही आतापावेतो ' महानिर्वाण 'चे बरेच प्रयोग केलेत, अजूनही चालूच आहेत–'

–'जास्तीत जास्त लोकांनी तुमची नाटके पहावीत ही तुझी किंवा तुमच्या ग्रुपची अपेक्षा असते, ती कशासाठी ?'

# एकसंध बांधेसूद निर्मिती



**सतीश**

–' त्यामुळे अनेक फायद होतात. जास्त प्रयोगांनी प्रयोगाचा दर्जा उंचावण्यास मदत होते, सुधारणा करता येतात. दिग्दर्शकाला विविध स्तरांतील प्रेक्षकवर्गाच्या प्रतिक्रिया आजमावता येतात. कलाकार आपापल्या कामात प्रगती करू शकतात. लेखकाला ( लेखकदेखील प्रत्येक प्रयोगाला हजर असतो. ) नाटकाची परिणामकारकता कळते. थोडक्यात म्हणजे, जास्तीत जास्त प्रयोग करून, नाट्यप्रयोग परफेक्शन्च्या जास्तीत जास्त जवळ नेण्याचा आमचा प्रयत्न असतो. '

–' पण हे सगळे करून तुम्हाला नेमके साधायचे तरी काय असते ? माझा प्रश्न असा आहे की, मुळात तुम्ही नाटके करताच कशासाठी ? जागरणे, पाठांतर, तालमी, नाटकाच्या इतर अंगांची जुळवाजुळव करताना होणारी यातायात–ह्या सगळ्या व्यापाला तुम्ही सुखासुखी सामोरे जाताच कशाला ? तुम्हाला नाटकाचा सोस का आहे ?'

–' हा सोस आम्ही करतो हे सत्य आहे, कारणमीमांसा काहीही असू शकेल. मला मात्र नाटक हा झिंग आणणारा नशेचा प्रकार वाटतो. आपण लोकांसमोर नाटक करून त्यांची दाद घेणे हे थ्रिलिंग आहे. हे थ्रिल अनुभवल्यावाचून चैनच पडत नाही–'

–' चैन पडत नाही, ठीक आहे; पण नाटकामुळे तुम्हाला चैन करता येते का ? म्हणजे असं की हौशी मंडळींना नाटकातून पैसा वगैरे काही मिळत तर नाहीच, उलट वेळप्रसंगी खिशातूनच पैसे टाकून नाटक उभे करावे लागते. उलट धंदेवाईक रंगभूमीवर थोडाफार पैसा मिळतो. जिवाची काही तरी चैन करता येते ! तू नाटककार म्हणून अल्पावधीतच सुस्थापित झाला आहेस. हे स्थान अजून तरी हौशी रंगभूमीपुरतेच मर्यादित आहे. नाटककार म्हणून व्यावसायिक रंगभूमीवर जाण्याचा तुझा विचार आहे का ?'

–' तशी गरज मला आज वाटत नाहीच; पण जर आर्थिक कारणासाठी धंदेवाईक नाटक लिहावे लागले तर मी ते लिहीन; परंतु माझ्या पद्धतीने लिहीन. धंदेवाईक नाटकाबद्दल प्रेक्षक ज्या अपेक्षा करणार, त्या अपेक्षांनुसारच नाटक लिहावे अशी नाट्यनिर्मात्याची इच्छा असणार. अर्थात त्यात त्या निर्मात्याचा काही दोष नाही. प्रश्न हा आहे की त्या निर्मात्याचा दृष्टिकोण आणि माझा व्यक्तिगत दृष्टिकोण ह्यांचा मेळ बसेल का ? अर्थात् ह्या सगळ्या पुढच्या गोष्टी आहेत; पण आज स्क्रीनप्ले लिहिण्यात मात्र मला रस निर्माण झाला आहे. '

–' बरं, नट म्हणून तू स्वतःविषयी काही...'
–' नट म्हणून मी काही विशेष केलेले नाही.'

इतका वेळ आमच्या दोघांचीच प्रश्नोत्तरे चाललेली असतात आणि एकदम मला उत्सुकता वाटते की सतीशबद्दल त्याच्या सहकाऱ्यांच्या मनातील भावना जाणाव्यात. ' महानिर्वाण 'मधील ' भाऊराव 'च्या भूमिकेबद्दल अभिनयाचं रौप्यपदक पटकावणारा चंद्रकांत काळे व त्या नाटकाचा यशस्वी संगीतनियोजक आनंद मोडक ह्यांना मी त्या भावना व्यक्त करावयास सांगतो आणि ते म्हणतात–

आनंद मोडक–' सतीश आळेकर ह्या लेखकाला त्याच दिग्दर्शकाची अशी काही सुरेल साथ मिळालेली आहे की त्यामुळे जी अचीव्हमेंट होते, ती जवळजवळ परफेक्ट असते. लेखक व दिग्दर्शक सतीश हे परस्परांना पूरक व पोषक ठरतात. '

चंद्रकांत काळे–' तडजोड हा प्रकार सतीशला अजिबात मंजूर नाही. कोणतीही गोष्ट स्वतःला हवी तशी, आणि हवी तशीच करवून घ्यावी ती सतीशनेच ? त्यामुळेच नाटक एकसंध–बांधेसूद होते. अर्थात इतरांच्या ज्या सूचना खरोखरच स्वीकृत करण्याजोग्या वाटतात, त्या तो दिलखुलासपणे स्वीकारतोसुद्धा ! ■ ■

# "जान हाजिर है"

मध्ये

प्रेमकिशन

निताशा

गोल्डीसाहेबांनी– जान हाजिर है नामे चित्रामध्ये एक धाडसी प्रयोग केला. दिग्दर्शक, संगीतदिग्दर्शक, कलाकार तमाम नवीन मंडळींचा ताफा घेऊन त्यांनी हे चित्र पेश केले. चित्र असे काही वाहून गेले की आचार्य ( नव्हे भगवान ! ) रजनीशांची मनः शांती देणारी सस्मित तसबीर कंठी रुळत असूनही खाशा स्वारीचे प्राण कंठाशी आले. साफ वाहून गेलेल्या चित्रातही एखाद-दुसरी चीज मागे राहतेच– जान हाजिर है च्या संदर्भामध्ये मागे राहिले प्रेमनाथ–बिना रॉय या जोडगोळीचे चिरंजीव प्रेमकिशन ! पहिल्या चित्राचा पतंग कापला गेला की पुन्हा उभारी घेताना कोण यातायात करावी लागते. प्रेमबाबूंना मात्र मद्रासच्या एल्. व्ही. प्रसादांपासून ते मुंबईच्या सुनिलदत्तपर्यंत अनेक मंडळींनी करार-बद्ध केले आहे; बिचारी निताशा सध्या तरी निष्प्रभ आहे. पण ही पोरगी पुन्हा येणार असा आपला आमचा विश्वास आहे.

• • •



या ना त्या कारणाने फिल्मी दुनियेमध्ये ज्या मंडळींचे नाव चर्चिले जाते त्यामध्ये संस्कारफेम गिरीशबाबू आहेत. एका सुप्रभाती ते अचानकपणे फिल्म इन्स्टटयूटचे संचालक झाले. हेमा त्यांच्या नावाने कुंकू लावणार असल्याची गप उठली आहे. तालेवार नवरा ही हेमाची गरज आहे. इन्स्टटयूट सोडल्यावर लाईनमध्ये घट्ट उभे राहण्याची महत्त्वाकांक्षा गिरीशबाबू बाळगून आहेत. कोणी सांगावे दोघांचीही अडजण दूर करणारी ही तडजोड मार्गीही लागेल. बाबूजी हेमाच्या मातोश्रींच्या चित्राचे नायक आहेत. चित्राचे नाव आहे– ‘स्वामी’ ( दक्षिण देशी ‘स्वामी’चा अर्थ ? ) पुण्याला आल्यापासून गिरीशबाबू मुंबईच्या दुनियेशी संपर्क ठेवतच असतात.

सई परांजपे यांनी ‘जादूचा शंख या आपल्या नाटयकृत्तीवरून जे बालचित्र चिल्ड्रेन फिल्म सोसायटीसाठी तयार केले ते चित्र यथातथा असले तरी बालचित्रे हा प्रकारच आपल्याकडे विरळा असल्याने सईबाईंचा हा जादूचा शंख वाजवण्यासाठी बाळगोपाळ एकत्र गिल्ला करून चित्रगृहावर गेले. थंड डोक्याने आणि छत्रपती स्टाइलने जलप्राशन करणारे बाबू गिरीश फिल्मी दुनियेमध्ये पडद्यावर आणि पडद्यामागेही खळबळ उडवणार अशा वार्ता आहेत. बघू आता काय होते ते.

–शरद गोखले

## “जादू का शंख”

मध्ये–
राहूल रानडे
नंदिता अरस
व
गिरिश कर्नाड



MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC-68



# चार्मिंग हेमा कुणाच्या पुजेसाठी